कर्तृत्ववान महिलांची ओळख ▪ महिलांसाठी योजना ▪ यशकथा

मार्च २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




## सशक्त, कर्तृत्ववान, महिलाशक्ती



# शिवजन्मोत्सव सोहळा

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील शिवरायांचे जन्मस्थळ शिवनेरी येथे १९ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. 'जय भवानी, जय शिवाजी','छत्रपती शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी शिवनेरीचा परिसर दुमदुमून गेला होता. दरम्यान मुख्यमंत्री श्री. ठाकरे व उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी शिवकुंज इमारतीतील जिजाऊ आणि बालशिवबाच्या पुतळ्यास अभिवादन केले. या वेळी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, खा. छत्रपती संभाजीराजे, खा. डॉ. अमोल कोल्हे, आ. अतुल बेनके, आ. विनायक मेटे आदी मान्यवर उपस्थित होते.



# अंतरंग


## निरंतरता हवी ६

महाराष्ट्रातील आणि भारतातील महिलांच्या चळवळींच्या संदर्भात काही आत्मचिंतन आणि त्याचे शाश्वत विकासाशी काय नाते आहे, याचा ऊहापोह केला तर हे स्पष्ट होते की, कायमच महिलांच्या न्यायाचा लढा हा सामाजिक न्यायाशी जोडला गेला आहे.

## ध्यास महिला सक्षमीकरणाचा १२

८ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या या वर्षीच्या महिला दिनाची संकल्पना 'चूज टू चॅलेंज' अर्थात 'आव्हानांना सामोरे जाण्याचा पर्याय निवडा' अशी आहे. आव्हानातूनच बदल घडतात हे पाहता आव्हाने स्वीकारली पाहिजेत. स्त्री-पुरुष समानतेसाठी महिला धोरण बनवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

## आर्थिक-सामाजिक सक्षमता १६

महिला व बालविकास विभाग हा महत्त्वाचा विभाग असून, आमचा राज्यातील माता-भगिनी व बालक यांच्या सर्वांगीण उन्नतीवर भर आहे. आम्ही प्रामुख्याने महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणावर विशेष लक्ष देऊन या विभागामार्फत त्यांना जास्तीत जास्त सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न करत आहोत.

## महिलांची सर्वांगीण प्रगती २२

'सक्षम महिला, सुदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्र' हे ध्येय घेऊन राज्याचा महिला बालविकास विभाग काम करत आहे. गेले संपूर्ण वर्ष संकटाचे असले तरी या विभागाने केलेल्या कामाची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे.





## उद्योजिका व्हा! २४

राज्याला सर्वात जास्त महिला उपक्रम असलेले राज्य बनवणे, महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे तसेच इतर योजनांमधूनही महिलांना आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी शासनाचे सहकार्य घेता येते. अवकाश आहे तो फक्त उद्योजिका म्हणून पुढे येण्याचा...

## कर्मयोगीनी २८

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला नागरी पुरस्कारांची घोषणा केंद्र शासनातर्फे झाली. यात पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या महाराष्ट्रातील दोन महिलांची नावे अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. एकीने समाजाशी लढा देत समाजात आपले स्थान निर्माण करत जगण्याची नवी दिशा निर्माण केली, तर दुसरीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी उद्योगाची निर्मिती केली.

## कारभारणी ३०

कोणत्याही समाजाच्या उन्नतीचे मापदंड त्या विकासक्षम समाजातील स्त्रिया किती सक्षम आहेत, यावर केले जाते. ज्या समाजात स्त्रिया सक्षम असतात, तो समाज अधिक सुदृढ आणि विकासशील असतो.

## शिक्षण अखंड सुरू ४७

कोरोना संकटात लॉकडाऊन काळात शाळा बंद होताच मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी प्रयोगशिल शिक्षकांनी विविध मार्गांचा अवलंब करून शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवली. कुणी ऑनलाईन शिक्षणाचे प्रयोग केले तर कुणी शिक्षण साहित्य वाटून फोनवरून संपर्क करत शिक्षण सुरू ठेवले. अशा प्रयोगशील शिक्षिकांची प्रातिनिधीक ओळख...

| | |
|---|---|
| निरंतरता हवी | ६ |
| ध्यास महिला सक्षमीकरणाचा | १२ |
| आर्थिक-सामाजिक सक्षमता | १६ |
| नवे पर्व | १७ |
| महिलांची सर्वांगीण प्रगती | २२ |
| उद्योजिका व्हा! | २४ |
| कर्मयोगिनी | २८ |
| कारभारणी | ३० |
| युद्ध आमुचे सुरू... | ३२-४६ |
| शिक्षण अखंड सुरू | ४७ |
| उंच माझा झोका... | ४९-५२ |
| स्वयंपूर्णतेचा मार्ग | ५३ |
| मंत्रिमंडळात ठरले ! | ५५ |

वर्ष ७२ वे | अंक ७ | मार्च २०२१

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर, गणेश रामदासी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., कोपरखैरणे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# ‘महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान’

**राज्यातील** ग्रामीण भागातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामविकास विभागामार्फत येत्या जागतिक महिला दिनापासून (८ मार्च) महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. या अभियान काळात शासनाच्या विविध योजना महिलांपर्यंत पोहोचवून त्याचा त्यांना लाभ मिळवून देण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महिला बचतगटांना प्रदर्शने, कॉप शॉप तसेच सहकारी आणि कॉर्पोरेट मॉलमध्ये उत्पादनांच्या विक्रीची संधी उपलब्ध करून देणे, महिलांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठी शेत दोघांचे (७/१२ वर पती व पत्नीचे नाव लावणे) आणि घर दोघांचे (नमुना नंबर ८ वर पती व पत्नीचे नाव लावणे) या संकल्पनेंतर्गत मालमत्तेवर पती व पत्नीचे नाव लावणे, महिलांचे हिमोग्लोबीन व बीएमआय तपासणी करून त्यांना पोषणाबाबत मार्गदर्शन करणे, महिलांमधील तंबाखुमुक्ती, मशेरीमुक्ती, तपकीरमुक्ती आदीबाबत जनजागृती करणे, महिलांचे उपजीविकेचे स्रोत वाढवणे, महिलांना पायाभूत प्रशिक्षण व उद्योजकता विकासासाठी कौशल्य प्रशिक्षण देणे आदी विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.



गावपातळीवर राबवण्यात येणाऱ्या विकासाच्या विविध योजनांमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग वाढवणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ‘महासमृद्धी महिला सक्षमीकरण अभियान’ राबवण्यात येईल. शासनाच्या संबंधित सर्व विभागांचा यात सहभाग घेतला जाईल. अभियानात विविध उपक्रम राबवण्यात येतील. बचतगट, ग्रामसंघ आणि प्रभागसंघाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षम संस्था निर्माण करण्यात येतील. महिलांचे उपजीविकेचे स्रोत वाढवण्यासाठी निधी आणि कर्ज उपलब्धतेसाठी मदत करण्यात येईल. महिला बचतगटांच्या उत्पादनांचे मार्केटिंग करण्यासाठी आकर्षक ब्रँडिंग व पॅकेजिंगवर काम करण्यात येईल. यासाठी प्रशिक्षणे व अभ्यास दौऱ्यांचे आयोजन केले जाईल. शासनाचे विविध विभाग, कार्यालये, संस्था, पंचायतराज संस्था यांना आवश्यक असणाऱ्या विविध वस्तूंची खरेदी ही बचतगटांकडून होण्यासाठी सामंजस्य करार आदी प्रयत्न करण्यात येतील. शासकीय कार्यालये आणि आवारामधील उपहारगृहे बचतगटांना चालवण्यासाठी देणे, बचतगटांना उद्योग आधार व अन्न परवाना मिळवून देणे आदीसाठी प्रयत्न करण्यात येतील. बचतगटांना उपजीविकेचे स्रोत उपलब्ध करण्यासाठी घरकूल मार्ट सुरू करणे, महिलांचे गवंडी प्रशिक्षण आयोजित करणे, विविध स्वास्थ्य आणि विमा योजनांमध्ये महिलांची नोंदणी करणे, यासाठी कार्यक्रम घेतले जातील.

महिलांना कौटुंबिक हिंसाचार व कायद्यांबाबत मार्गदर्शन करणे व कायदेविषयक मोफत साहाय्य व सल्ला देण्यासाठी उपक्रम राबवण्यात येतील. महिला लाभार्थ्यांच्या बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुलांमध्ये गृहप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, तर घरकूल मंजूर झालेल्या महिला लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमिपूजन करून बांधकाम सुरू करण्यात येईल. अस्मिता योजनेंतर्गत सॅनिटरी नॅपकिनची उपलब्धता आणि विक्रीस चालना देण्यात येईल. यासोबतच नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या महिला सदस्यांना पंचायतराजविषयक विविध प्रकारची प्रशिक्षणे देण्यात येतील, असे विविध उपक्रम या अभियानांतर्गत राबवण्यात येणार आहेत.

# कर्तृत्ववान महिलांच्या देशा....

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी' हे आपण विविध भाषणांतून ऐकत आलो, लेखांतून वाचत आलो. पण आता त्याही पुढे जाऊन महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या आहेत. आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. विश्वनिर्मितीचे सूत्र 'स्त्री' तत्त्वात आहेच पण विश्व संचालनाचे सूत्रही 'स्त्री' तत्त्वातच आहे. असंख्य रूपांमध्ये त्याचे दर्शन घडत राहते. आई म्हणून, बहीण, पत्नी अशा अनेक नात्यांमध्ये ती कुठेही कमी पडत नाही किंबहुना सरस ठरते. मुलांना शाळेसाठी तयार करणे, मुले व पतीसाठी डबा तयार करणे येथपासून ते स्वत: ऑफिसची तयारी करण्यापर्यंत असंख्य कामे ती एकट्याने लीलया सांभाळत असते. तिच्यातील उत्तम व्यवस्थापक नेहमी जागृत असतो, ही मानवजातीसाठी मोठी देणगीच आहे. त्यामुळे ८ मार्च रोजी आपण जागतिक महिला दिन साजरा करतो; ती आपणा सर्वांसाठी तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची मोठी संधी असते.



समाजाला पुढे घेऊन जाणाऱ्या अनेक करारी, कर्तृत्ववान महिला देशाला, राज्याला लाभल्या हे आपले भाग्यच. मोगली जुलमातून रयतेची सुटका करणाऱ्या शिवरायांना घडवणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ असो की, समाजाचा विरोध झुगारून अपमान गिळून हाती पाटी घेऊन स्त्रीला साक्षर करणाऱ्या सावित्रीबाई फुले असो; यांनी समाज, देशाला दिशा दिली आहे. अशा असंख्य कर्तृत्ववान महिलांचा वारसा पुण्यभूमी महाराष्ट्राला लाभला आहे. कुटुंब, समाजाला पुढे घेऊन जाण्याचा वारसा अनेक महिला आजही राज्यात चालवताना दिसत आहेत.

राज्य शासनही महिलांनी पुढे येऊन नेतृत्व करावे, त्यांनी उद्योजिका बनावे, शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात प्रगती करावी यासाठी अनेक योजना व धोरणांची अंमलबजावणी करत आहे. या योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, शिष्यवृत्ती आदींच्या माध्यमातून त्या आपल्या पायावर उभ्या राहत आहेत. आत्मनिर्भर बनत आहेत. त्या केवळ सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नसून इतरांसाठी आदर्श बनून असंख्य महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

महिला जेवढ्या मृदू, संवेदनशील तेवढ्याच त्या करारी आणि धाडसीही असल्याचे त्यांनी वारंवार सिद्ध केले आहे. कोविड-१९ सारख्या महामारीच्या महासंकटातही त्याची प्रचिती आली. नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा तालुक्यातील चिमलखेडी गावच्या अंगणवाडी सेविका रेलू वसावे हे त्याचेच एक उदाहरण. एका बाजूस सातपुड्याच्या डोंगररांगा आणि दुसऱ्या बाजूस नर्मदेचे पात्र असल्याने गावाकडे जाण्यासाठी रस्ता नाही. पावसाळ्यात त्यांना मोलगी येथून गमनपर्यंत पोषण आहार वाहनाने आणावा लागतो. तेथून पायी चालत सिंदुरीनाला येथे होडीत बसून त्या नर्मदेच्या प्रवाहातून चिमलखेडीला पोहोचतात. आपल्या कर्तव्यात खंड पडू नये म्हणून त्यांनी बोट वल्हवणे शिकून घेतले. कोरोना काळातही जिवाची पर्वा न करता नर्मदेतून बोट वल्हवीत त्यांनी आदिवासी माता व बालकांना पोषण आहार नियमित मिळेल याची काळजी घेतली. अशा असंख्य प्रेरणास्रोतांनी महाराष्ट्र ओतप्रोत भरला आहे. अशा काही प्रेरणादायी यशकथांचा या अंकात समावेश केला आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने नेहमीच 'लोकराज्य' व इतर माध्यमांतून महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान केला आहे. महिला दिनानिमित्त आम्ही मार्च महिन्याचा 'लोकराज्य' महिला विशेषांक म्हणून प्रसिद्ध करत आहोत. यामध्ये कर्तृत्ववान महिलांच्या यशकथांबरोबरच त्यांच्यासाठी विविध योजनांची माहिती, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, राज्यमंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांची मनोगते, राज्याच्या विधिमंडळातील महिला लोकप्रतिनिधींची ओळख आदींचा समावेश केला आहे. हा विशेषांक आपणास आवडेल, अशी खात्री आहे.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)

**महाराष्ट्रातील आणि भारतातील महिलांच्या चळवळींच्या संदर्भात काही आत्मचिंतन आणि त्याचे शाश्वत विकासाशी काय नाते आहे, याचा ऊहापोह केला तर हे स्पष्ट होते की, कायमच महिलांच्या न्यायाचा लढा हा सामाजिक न्यायाशी जोडला गेला आहे. सर्व स्त्री चळवळ ही धारणा मानत आलेली आहे. याबरोबर जागतिक आणि देशस्तरावर मानवाधिकार म्हणजेच महिला अधिकार आणि महिलांचे अधिकार म्हणजेच मानवाधिकार या भूमिकेतून जगभर स्त्रियांच्या कायदेविषयक दर्जाचा आढावा घेतला आहे.**

**डॉ. नीलम गोऱ्हे,**
उपसभापती, विधान परिषद

# निरंतरता हवी



महाराष्ट्राच्या निर्मितीपासून ते आजपर्यंतच्या वाटचालीत स्त्रियांचे स्थान व सहभाग संमिश्र व द्वंद्वात्मक राहिला आहे. एकीकडे माध्यमांमधून प्रासंगिक झगमगते यश, तर कधी उच्चशिक्षण व शिक्षणाच्या क्षेत्रात उत्तुंग रेकॉर्डब्रेक यश, चित्रपट-नाटक, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्र, विज्ञान, संशोधन, क्रीडा, सामाजिक कार्य, बचतगट, आंदोलने अशा विविध क्षेत्रात एखाद्या विजेप्रमाणे उजळणारी व्यक्तिमत्त्वे,



तर काही वेळेस स्त्रियांचे मोठे समूह दिसून येतात. 'कोण म्हणतो महाराष्ट्रातील स्त्रिया पाठीमागे आहेत?' ऐतिहासिक नाटकात शोभेल असे वाक्य अगदी तंतोतंत वाटेल अशी परिस्थिती दिसते; तर त्याच वेळी दुसरीकडे, कुपोषण, शेतकरी आत्महत्या व लाखो एकल, गरीब, शेतकरी महिला, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, कोठेवाडी-काठोडा-पाथर्डी-वर्धा अशा अनेक ठिकाणी बळी गेलेल्या महाराष्ट्राच्या लेकी, सायबर क्राईमच्या जाळ्यात घालमेल होणाऱ्या स्त्रिया असे वास्तव आपल्याला दिसून येते. त्यामुळे स्त्रियांच्या विकासाचा सामूहिक व वैयक्तिक आत्मशोध अजूनही संपलेला नाही, असे सातत्याने जाणवते.

आजच्या संदर्भात, ज्या वेळेला समानतेकडून शाश्वत विकासाकडे जाण्याचा विचार आपण करतो आहोत, त्याची गरज का भासते यांचा विचार करणे महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. एकूण अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या गरजा किंवा दारिद्र्य निर्मूलनासारखे प्रश्न या सगळ्या मुद्द्यांच्या सर्व आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्नाचे नाते स्त्रियांच्या जीवनाच्या दर्जाशी जोडले गेले आहे.

जेंडर इक्वालिटी म्हणजेच स्त्री पुरुष समानता त्या मुद्द्याच्या पलीकडे जाऊन उरलेल्या सोळा उद्दिष्टांमध्येही महिला विकास आणि सामाजिक न्याय याचा अतिशय जवळचा संबंध आहे. २००० मध्ये सहस्रकाच्या उद्दिष्टांची मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स म्हणजे सहस्त्रकाची उद्दिष्टे या संकल्पनेत, मुख्यतः संख्यात्मक विकासाबद्दलची परिमाणे किंवा विकासाबद्दलचे जागतिक निकष ठरवले होते; त्याचा परिणाम म्हणून आपल्याला असे दिसते की, मानव विकास अहवाल, वेगवेगळ्या जेंडर ईक्वालिटी ईंडेक्स यांचे जसे जागतिक स्तरावर मोजमाप केले जाते, तसेच देश पातळीवरही वेगवेगळी परिमाणे तपासली जातात. त्याच्यात हे मुद्दे किंवा निकष अत्यंत महत्त्वाचे आहेत. म्हणून शाश्वत विकासाची उद्दिष्टे यामध्ये पाचवे उद्दिष्ट स्त्री-पुरुष समानता हे आहे.

आपण पाहतो आहे की, विशेषतः तापमान बदलामुळे गेल्या काही वर्षांत सगळीकडे नैसर्गिक आपत्ती मोठ्या प्रमाणात येत आहेत. २००३ पासूनच १७ वर्षे अनियमित होणारा पाऊस आणि वादळे, त्याचबरोबर भूकंप, २००० नंतर आलेली त्सुनामी, गुजरातमधील भूकंप, उत्तर काशीचा भूकंप, याबरोबर इराण, हवाई

बेटे यांसारख्या ठिकाणी झालेले भूकंप अशा नैसर्गिक आपत्ती एकामागून एक कोसळलेल्या दिसून येतात. आपत्ती किंवा प्रदूषण, नद्यांचे होणारे नुकसान या सगळ्याचा समाजावर परिणाम होतोच पण महिलांवर त्याचे विशेष विपरीत परिणाम जाणवतात. अशा संकटकाळात स्त्रियांचे जीवन अधिक कष्टप्रद होते. त्याबरोबर सर्वसाधारण परिस्थितीतही ज्या कुटुंबाच्या प्रमुख महिला आहेत, अशी कुटुंबे या संपूर्ण विकासाच्या परिघामधून बाजूला फेकली जातात. पुनर्वसनाचे किंवा मदतीचे फायदे महिलांना अग्रक्रमाने मिळावेत, असे धोरण असले तरीही काही वेळेला मदत आणि पुनर्वसन कार्यामध्ये स्त्रियांसमोर अनेक अडचणी येतात. म्हणजे एका अर्थानी संपूर्ण विकास प्रक्रियेमध्ये त्याचा पहिला फटका स्त्रिया आणि मुलांना बसतो.



विशेषतः २०१४ नंतर पॅरिस करार आणि पॅरिस करारानंतर सगळ्या जगामध्ये पर्यावरणविषयक काही ठरावीक देशांचा अपवाद सोडला तर बहुतेक सगळ्या देशांनी ग्लोबल डिक्लरेशन किंवा जागतिक करार केलेले आहेत. त्यामध्ये विकसित देशांनीही त्या-त्या उद्दिष्टाचे उपविश्लेषण, उपगट केलेले आपल्याला दिसून येतात.

रोजगारात स्त्रियांचे काय चित्र दिसत आहे. याचाही अभ्यास गेल्या काही वर्षात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात ज्या वेळी शाश्वत विकासाच्या उद्दिष्टावर काम करणाऱ्या संस्थांचा अभ्यास केला किंवा त्यांची भाषणे ऐकली की हवामान बदलावरती काही मुद्दे ठळकपणे समोर येतात. त्या वेळेस नेहमीच असे जाणवते की, आपण सुट्यासुट्या मुद्द्यांचा विचार करतो आहोत की काय? किंबहुना सरकारमध्ये जरी त्याच्यावर विचार व्हायला सुरुवात झालेली असली तरी समाजाच्या अनेक घटकांमध्ये पर्यावरण आणि हवामान बदल या एकाच मुद्द्यावर जास्तीत जास्त चर्चा, विचारमंथन, कृती कार्यक्रम आपल्याला होताना दिसतात.

### चळवळींचे बळ

विविध समस्यांवर उभ्या राहिलेल्या या आंदोलनांस अनेक दिशा व पैलू होते. उदा. महिलांचे महागाईविरोधी आंदोलन, शेतकरी व शेतमजुरांची आंदोलने, भूमिहीनांचे आंदोलन, मुंबईतील गिरणी कामगारांचे आंदोलन, साहित्याच्या क्षेत्रातील विद्रोही आंदोलन, आदिवासी आंदोलने उभी करणारे कार्यकर्ते, नेते यातच स्त्रियांच्या आंदोलनांचाही आवाज ठळकपणे व्यक्त होऊ लागला. विशेषतः हुंडाबळी, कौटुंबिक छळ, दलित महिलांवरील अत्याचार यासोबतच सर्व क्षेत्रातील स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. याकडे अनेक अभ्यास व अनुभव याद्वारे लक्ष वेधले जाऊ लागले. स्त्रियांच्या आणि सामाजिक न्यायाच्या चळवळींचा सर्वांगीण विचार व्हायला सुरुवात झाली. संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रामध्ये सुद्धा शेतजमिनीवरती मालकी असण्यासाठी गोरगरिबांची, भूमिहीनांची आंदोलने उभी राहिली. त्याचबरोबर जल, जंगल जमीन याची मालकी हा समाजाच्या सर्व घटकांचा अधिकार आहे ही भावना त्यांच्यापर्यंत पोहोचली. यासाठी गेल्या काही वर्षांमध्ये चळवळींनी फार मोठी जोरकस मुसंडी मारलेली दिसते. देशातसुद्धा विशेषतः वनाधिकारच्या प्रश्नावरती अनेक नेटवर्क उभी राहिली आणि जॉईन्ट फॉरेस्टचे प्रोग्राम, तसेच वनाधिकारांवरती सुद्धा महिलांचा अधिकार असला पाहिजे ही भावना जागी झाली. विशेषतः जगण्याच्या

### विचारांचा वारसा

भारतात आणि महाराष्ट्रात स्वातंत्र्यलढ्याच्यानिमित्ताने मोठ्या प्रमाणात जी राजकीय तसेच सामाजिक आंदोलने उभी राहिली त्यात महाराष्ट्रातील स्त्रीनेतृत्वाचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. सशस्त्र स्वातंत्र्यलढ्यापासून ते सूतकताईच्या गांधीवादी आश्रमांच्या केंद्राच्या व्यस्थापनात स्त्रियांच्या तीन ते चार पिढ्यांनी योगदान दिले आहे. महिलांच्या या सुधारकी व प्रागतिक विचारांना पुरोगामी - प्रबोधनकारी विचारवंत व नेत्यांची विचार आणि कृतीची जोड होती. त्याचा परिणाम म्हणून राजकीय-सामाजिक तर कधी साहित्यिक विचाराने पूर्णवेळ वाहून घेतलेल्या अनेक महिला नेत्यांनी विधवा -विवाह, कुटुंब नियोजन, बालविवाहास विरोध, शेतमजूर स्त्रियांचे लढे, कामगार महिलांचे लढे यात सहभाग दिलेला होता, इतकेच नव्हे तर नेतृत्वही केले. परिणामी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात व निर्मितीतही अनेक राजकीय विचारांच्या व सामाजिक क्षेत्रातील महिलांचा तेजस्वी सहभाग लाभलेला होता. सामाजिक व राजकीय अशी विभागणी अनेक वेळा केली गेली तरी स्वातंत्र्य लढा असो किंवा संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो यात ही सीमारेषा अस्पष्ट होऊन समाजाचे सर्व घटक त्यात सहभागी होऊन सर्व एकरूप झालेले दिसले. त्याचसोबत महाराष्ट्राची स्वतंत्र राज्य म्हणून निर्मिती झाली असली तरी अनेक प्रश्नांच्या विचारधारांचे नाते राज्यातही प्रभुत्व ठेवून होते, म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर व त्यातून स्वतंत्र राज्यांची निर्मिती झाल्यावरही १९६० ते १९७० तसेच १९७० ते १९८० या दशकात अनेक नवविचारांच्या चळवळी, आंदोलने उभी राहिलेली दिसली.

## व्यापक भूमिका

कुटुंबातील लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी, मध्यमवर्गीय चौकोनी चेहऱ्याच्या कुटुंबातही गृहिणीचे योगदान उपेक्षित राहिल्याने मध्यमवयीन स्त्रियांचा उभा राहिलेला भावनांचा कल्लोळ, राजकीय क्षेत्रातील स्त्रियांची पदाधिकारी व कार्यकर्ते म्हणून नगण्य संख्या, निर्णय प्रक्रियेच्या स्थानापासून स्त्रिया वारंवार डावलल्या जाणे, धर्माधिष्ठित वैवाहिक व कौटुंबिक कायदे व त्यांचा होणारा स्त्रियांच्या न्यायाबाबतचा दुजाभाव, एकूण संपत्तीत स्त्रियांचा किरकोळ वाटा असे प्रश्न दृश्य होऊ लागले. १९७० ते १९८० च्या दशकात अनेक नवीन स्त्रीमुक्ती विचारांच्या, स्त्रीवादी अभ्यासाच्या आधारे कार्य करणाऱ्या संघटना उभ्या राहिल्या. परिणामी राजकीय महिला नेत्यांच्या सोबतच आम्ही म्हणजे मी व विद्या बाळ, छाया दातार, डॉ. विद्युत भागवत, डॉ. सीमा साखरे, डॉ. विभुती पटेल, कुमुद पावडे, डॉ. रूपा कुलकर्णी, सुधा वर्दे, डॉ. शैला लोहिया, लता प्र. म, शारदा साठे, रजीया पटेल आदी अनेक कार्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या अनेक भागात योगदान द्यायला सुरुवात केली. महाराष्ट्रामध्ये राजकीय पक्षांमध्ये पारंपरिक चौकटीत अमुक एकाच प्रकारे विचार करत काम न करता व्यापक भूमिका घेणाऱ्या जशा कार्यकर्त्या उभ्या राहिल्या तशाच देश पातळीवर, ती राजकीय पक्षांच्या नेता व राज्यस्तरावरील काम करणाऱ्या नेत्या असतील त्यांनीसुद्धा १९६० सालापर्यंत जी विचाराची चौकट स्वीकारली होती. त्याच्यामध्ये हळूहळू आपल्याला बदल होताना दिसले. महत्त्वाचे म्हणजे पूर्वीच्या काळात स्त्रीचा उद्धार, किंवा स्त्रीच्या कल्याणासाठी जी भूमिका होती त्यामध्ये कुठेतरी स्त्री ही 'गरीब बिचारी' आहे, ती बिचारी म्हणजे कुटुंबातील रोजगाराला हातभार लावणे, कुटुंब नियोजनातील लाभधारक म्हणूनच तिचा विचार केला जात होता.

१९९४ ला लोकसंख्या शिक्षणावर कैरोला जागतिक परिषद झाली, तोपर्यंत महिला आरोग्यविषयक फार मर्यादित विचार होते. माता म्हणून स्त्री जेव्हा जबाबदारी पार पाडत असते तो कालखंड म्हणजे त्या काळामध्ये सोळाव्या वर्षापासून ते ४५ वर्षांपर्यंतच्या स्त्रियांना योजनांमध्ये केंद्रभूत धरले जात होते. हे जे उद्दिष्ट होते ते हळूहळू बदलले. १९६० ते १९९४ ही ३४ वर्षांची बदल प्रक्रिया जगभर फार मंदगतीने झाली .परंतु परिणामी देशांमध्ये नियोजन प्रक्रियेमध्ये स्त्रीच्या स्थानाचा मनुष्यबळ विकासाच्या अंगाने विचार सुरू झाला.



संघर्षामध्ये वने ही केवळ खासगी मक्तेदारी नाही, काही मूठभर धनिकांच्या ताब्यात नाही तर वनांची जोपासना करणे, त्याचे संवर्धन करणे आणि त्यामधून वनांची जपणूक होणे या सगळ्या कामाच्यावरती जसे सरकारचे लक्ष वेधले गेले त्याचबरोबर सामाजिक चळवळीमध्ये सुद्धा याच्यावर अनेक जणांनी अभ्यास केला. प्रत्यक्षात कामे केली त्यात 'झाडे वाचवा' या मोहिमेचा खास उल्लेख केला पाहिजे. यासाठी १९७०-८० च्या दशकामध्ये संपूर्ण भारतात जे आंदोलन गाजले ते म्हणजे 'चिपको आंदोलन'!

जेव्हा तेथील सरकारच्या विकासाच्या प्रक्रीयेमध्ये झाडे आडवी येत होती म्हणून झाडे तोडण्यात आली. तेव्हा झाडे वाचवण्यासाठी आंदोलन सुरू झाले. त्या वेळेस तेथील जनतेने, महिलांनी 'चिपको आंदोलन' म्हणजे झाडांना मिठी मारून उभे राहायचे आणि झाडे तोडू देऊ नका अशा प्रकारचे आंदोलन केले. आज आपल्याला दिसते की, अनेक राज्यामध्ये ही वृक्ष वाचवा मोहीम जशी चालू आहे तसेच प्राण्यांच्या संदर्भात असेल किंवा वनांच्या अधिकारामध्ये आदिवासींचे असे लढे आहेत की, त्याच्यांमध्ये वनसंवर्धन म्हणून त्यांना रोजगारसुद्धा मिळावा या दृष्टिकोनातून प्रयत्न झाला आहे.

या टप्प्यावर मी खास उल्लेख करेन तो म्हणजे कार्यकर्त्यांचा आणि स्त्रियांच्या चळवळींचा. त्यात विशेषतः उत्तराखंडमध्ये (त्या वेळेच्या उत्तर प्रदेशमध्ये) वंदना शिवा आणि अनेक पर्यावरणप्रेमी, महिला अभ्यासकांनी याच्याबद्दलची जी मांडणी केली, त्याचे जागतिक स्तरावर तर अभिनंदन झालेच. पण त्याचबरोबर शेती आणि महिला वेगवेगळ्या प्रकारचे शोषितांचे लढे आणि जमिनीची आंदोलने त्यामधून स्त्रियांच्या अस्तित्वाचे लढे अधोरेखित झाले.

## नवी पहाट

ऐंशीच्या दशकामध्ये महिलांच्या अपेक्षांवर एका वेगळ्या दृष्टिकोनातून विचार होण्यास सुरुवात झाली. त्याचबरोबर डेव्हलपमेंट अल्टरनेटिव्हज फॉर वुमेन ऑफ न्यु ईरा- 'डॉन' (Development Alternatives from Women of New Era (DAWN)) च्या विचारांची मांडणी करणे सुरू झाले. नैरोबीला १९८५ मध्ये जी परिषद झाली. त्याच्यामध्ये सुद्धा याबद्दल विकास म्हणजे काय, विकासाची व्याख्या काय, परिभाषा काय, विकास म्हणजे मोठमोठ्या इमारती किंवा मोठ्या स्वरूपाच्या वास्तू किंवा



महाराष्ट्रातीलच वडसा देसाईगंज पोलीस ठाण्यात आदिवासी महिलेवर बलात्कार होऊनही आरोपी सुटले व त्या विरोधात आंदोलन देशभर उभे राहिले. नंतर प्रत्येक दशकात विविध प्रश्न असेच राज्यव्यापी व देशव्यापी झाले. एका अर्थाने स्त्रियांचे बदलते वास्तव व त्यासाठी आवश्यक परिवर्तनासाठी महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय क्षेत्रातून समर्थन व बळच मिळाले. त्यात अनेक पुरुष नेते व कार्यकर्ते यांची सकारात्मक मदत झाली. हे घडताना आंदोलक आणि विचारवंतांचे सर्वांनीच लाल गालिचे घालून स्वागत केले असे म्हणता येणार नाही. वाद, संघर्ष, उपेक्षा, नकारात्मक प्रसिद्धी, हेटाळणी हीदेखील सहन करावी लागली. परंतु छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, राजर्षी शाहू छत्रपती, प्रबोधनकार ठाकरे, रमाबाई रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, र. धों. कर्वे यांच्यासारख्या अनेक प्रबोधनकारी, परिवर्तनशील विचारांच्या पायावर उभ्या असलेल्या महाराष्ट्राने स्त्रियांच्या या प्रगतीच्या आकांक्षांना हळूहळू स्वीकारले.

सगळी निसर्गाची तोडमोड असे विकासाचे स्वरूप असावे का, की निसर्गाचे संवर्धन, पर्यावरण आणि याचे मानवी मूल्य जपत विकास व्हावा हीच मध्यवर्ती विचारसूत्रे समोर आली. याच्याबद्दल भारतातल्या स्त्री-अभ्यासक डॉ. देवकी जैन, गीता सेन, यांच्यासोबत अनेक स्त्री अभ्यासकांचे गेली २५ वर्षे सातत्याने विचारमंथन चालले आहे.

ऐंशीच्या दशकात देशभरात विविध विद्यापीठांत स्थापन झालेल्या स्त्री-अभ्यास केंद्रांत अभ्यास करणाऱ्या संशोधक स्त्रियांनी या मंथनाला वैचारिक परिभाषा देण्यास मदत केली. त्यातून विशेषतः ग्रामविकासात अनेक प्रयोग झाले, त्या प्रयत्नांतून महिलांच्या प्रश्नाला व्यापक चौकट तर मिळालीच, पण नियोजनातही या कल्पना वैश्विक व स्थानिक पातळीवर यशस्वी ठरल्या. ज्याप्रमाणे इतर कायद्याच्या विषयामध्ये नवी आंदोलने झाली, त्याप्रमाणेच पर्यावरण आणि विकासाबद्दल सुद्धा अनेक आंदोलनांचा परिणाम परस्परांवरती झालेला आपल्याला दिसून येतो.

## समानतेकडे

नियोजनात स्त्रियांच्या प्रश्नांचा प्राधान्याने समावेश व्हावा, यासाठी बरेच वैचारिक मंथन व्हावे लागले, अनेक संशोधने झाली. ही संशोधने जशी केंद्र सरकारमध्ये झाली तशी राज्य सरकारमध्ये झाली. या सगळ्याचा जो पाया होता किंवा जो याचा एक मूळ स्रोत होता तो म्हणजे 'टुवर्ड्स इक्वालिटी' हा अहवाल. त्याच्याशी जोडून घेऊन आपण विचार करू शकतो.

महाराष्ट्रात स्त्रियांच्या प्रश्नाबाबत विविध घडामोडी घडत असतानाच 'टुवर्ड्स इक्वालिटी' (समानतेकडे) हा अहवाल भारत सरकारने १९७५ च्या सुमारास प्रकाशित केला. डॉ. बीना मुजुमदार, लोतिका सरकार, प्रमिला दंडवते, पद्मा सेठ आदी अभ्यासकांनी आकडेवारी व उपलब्ध संशोधनांच्या आधारे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शेतीविषयक, कामगार क्षेत्रात महिलांचे स्थान किती नगण्य आहे हे दाखवून दिले. त्याचसोबत निधी, धोरणे व मनुष्यबळ, कायदेबदल याबाबतही धारदार व प्रखर विश्लेषण केले.

## धोरणनिर्मितीत महिलांचा सहभाग

महाराष्ट्रातील अनेक महिला संघटनांनी १९८० ते १९९५ या १५ वर्षांत अनेक कायदे बदलांच्या मागण्या केल्या. नवविवाहित स्त्रियांच्या संशयास्पद मृत्यूबाबत कायदा बदलावा, यासाठी लाखो सह्यांची याचिका आम्ही केली. परित्यक्ता-एकल महिलांच्या प्रश्नांवर पोटगीविषयक, कायदेविषयक व कौटुंबिक न्यायालयांची मागणी समोर येऊ लागली. याचसोबत विकासाच्या परिभाषेत स्त्रियांच्या श्रमांचे मोजमापच होत नाही, यासाठी महिलांकडे फक्त विकासाच्या लाभधारक म्हणून न पाहता देशाच्या-राज्याच्या श्रमशक्तीचा भाग म्हणून त्यांच्याकडे पाहावे व त्यांच्या सहभागाला अधिक ठोस स्वरूप असावे हा विचार समोर मांडला गेला. सत्ताचक्राला वेगळे परिमाण देणारी भूमिका स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला आरक्षणाच्या निमित्ताने घेतली गेली. १९९३ मध्ये शरद पवार मुख्यमंत्री असताना पहिल्यांदाच राज्यात महिला आणि बालविकास हे स्वतंत्र खाते सुरू झाले. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर राज्य महिला आयोग तयार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य होते.

महिलांचे हक्क अबाधित राखून त्यांचे संवर्धन करण्यासाठी राज्याने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल होते. पुढच्याच वर्षी, म्हणजे १९९४ मध्ये महाराष्ट्राने महिलांसाठी स्वतंत्र धोरण तयार केले. असे धोरण तयार करणाराही महाराष्ट्र पहिलाच. या धोरणाच्या आखणीत महाराष्ट्रातील महिला संघटनांचा मोलाचा सहभाग होता.

## कोविड काळात नवे प्रश्न

विशेषतः महाराष्ट्रात व देशात कोविडचे संकट असल्याने स्त्रियांचे सर्वच जीवनाचे परिमाण बदलले आहे. घरकामात तुरळक मदत पुरुषवर्गाची होत असली तरी 'वर्क फ्रॉम होम' अंगवळणी पडू लागले आहे. जगभरात संयुक्त राष्ट्र संघाच्या महिला विभागाने स्पष्ट केले आहे की 'कौटुंबिक हिंसाचार' वाढला आहे. रस्त्यावरचे बलात्कार नोंदवण्याचे प्रमाण कमी झाले तरी तक्रार नोंदवायलाच जाता येत नाही, कोर्ट बंद असल्याने तारखाच मिळत नाहीत, सोसायट्यांत खटके उडत आहेत, अशा तक्रारी एकीकडे येत आहेत. त्याचसोबत असंघटित क्षेत्रातील महिला कामगार, बारा बलुतेदार, भाजीवाल्या, इस्त्रीवाले, डबेवाले सर्वांचे रोजगार ठप्प आहेत. रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या प्रश्नांवर मी अनेक स्वयंसेवी संस्थांना बरोबर घेऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांच्याकडे पाठपुरावा करत आहे. नुकत्याच आलेल्या १२ जून २०२० या तारखेच्या आकडेवारीत एकूण ५,३३,९७३ मजुरांपैकी ४५.९४ टक्के महिला मजूर दिसून आल्या. आजही अनेक महिला मजूर नवी जॉब कार्ड तसेच शिधापत्रिकांपासून वंचित आहेत म्हणून विशेष मोहिमेची गरज दिसून आली. या प्रयत्नाला अधिकारी वर्गाचे सहकार्य मिळत आहे. कोविडच्या परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील पूर्वीच्या मजुरांसोबत नव्याने शहरातून परत आलेल्या मजुरांची संख्या वाढलेली आहे. त्यात महिला मजुरांची संख्या मोठी आहे. शेती आणि त्यातील पारंपरिक व्यवसायातील रोजगार ठप्प झाल्यामुळे जगण्यासाठी रेशनसोबतच अल्प अनुदान, बियाणे, खते यांची मागणी येते आहे.

## अस्वस्थतेतून नवी मांडणी

या सर्व घडामोडींना व्यापक आणि अनेक वेगवेगळे संदर्भ होते असे आपल्याला म्हणता येईल. एकतर त्याच्या पूर्वी म्हणजे १९८० आणि ८५ च्या दरम्यान मेक्सिको आणि त्याचबरोबर कोपेनहेगन येथे दोन विश्व महिला संमेलने झाली होती. तिसरे संमेलन १९९० ला नैरोबीला झाले. १९७५ ते १९८५ च्या दशकानंतर जवळजवळ आठ वर्षे लोटली होती आणि त्यामुळे त्यापूर्वी पर्यावरणविषयक, आरोग्यविषयक त्याचबरोबर मानवाधिकारविषयक चाईल्ड राईट कन्व्हेंशन म्हणजेच बालक अधिकाराबरोबर श्रमविषयक आंतरराष्ट्रीय संस्था म्हणजे इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन यांच्याही अनेक परिषदा आणि कार्यक्रमांमध्ये महिलाविषयक अनेक ठराव झालेले होते. त्याच्यामध्ये समान कामासाठी समान वेतन किंवा त्याच्या आधी युरोपमध्ये 'इक्वल पे इक्वल राईट'सारखे आयोगाचे विषय गाजत होते. त्याचसोबत हे अधोरेखित करायला हवे की, जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरणाची सुरुवात झाली होती आणि त्यामुळे एका बाजूला जागतिक सगळे संदर्भ घेऊन दृष्टी व्यापक होत होती, तर दुसऱ्या बाजूला त्याच वेळेस भारतामध्येसुद्धा जे बदलणारे वास्तव होते, त्यामध्ये अनेक प्रकारची अस्वस्थता होती. एक अस्वस्थता होती की, समाजातील अनेक घटक विविध आरक्षणाच्या मागण्या करत होते. दुसरी अस्वस्थता म्हणजे शहाबानो खटल्याच्यानंतर संपूर्ण मुस्लीम समाजामध्ये एक अंतर्गत स्वरूपाचे विचारमंथन झाले होते. त्यातून मुस्लीम महिलांमध्ये एक जागृती होत होती आणि त्यांचे म्हणणे न्यायव्यवस्थेपर्यंत जाऊन धडकत होते.



विविध राजकीय पक्षांच्या चौकटीत काम करणाऱ्या महिलांकडून सातत्याने मागणी येत होती की, पक्षांतर्गत आणि लोकसभा, विधानसभा, विधानपरिषद राज्यसभेत महिलांचे ५० टक्के प्रतिनिधित्व असायला पाहिजे. त्याखेरीज वेगवेगळी मूलभूत अशी कामगार, शेतमजूर, महागाई, जमीनविषयक आंदोलनेही चालली होती; अर्थात याच्यामध्येही काही शक्ती सशस्त्र वा अतिआक्रमक विचारांचे आंदोलनात प्रतिनिधित्व करत होत्या. त्याचबरोबर बिहारमध्ये त्याच ठिकाणी बौद्ध भिक्खूंची काही आंदोलने झाली होती.

ऐरणीवर आलेल्या प्रश्नात राजस्थानमध्ये भंवरीबाई या अंगणवाडी सेविका भगिनीवरती झालेल्या बलात्काराच्या त्या वेळेला सगळीकडे गाजलेल्या केसमुळे बरेच मुद्दे समोर आले. खरेतर आता नवीन नियमांनुसार कायद्याने कोणाही फिर्यादींचे वा

पीडितांचे नाव घ्यायला बंदी आहे. परंतु भंवरीबाईच्या निमित्ताने सार्वजनिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या सगळ्या महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यातून सार्वजनिक कामासाठी बाहेर पडणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर लक्ष वेधले गेले. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत अनेक मार्गदर्शक तत्त्वे सुचवली.



## महिलांचे आरक्षण

असाच एक ऐतिहासिक बदल झाला तो पंचायतराजमध्ये महिलांना आरक्षण मिळाले. त्याला ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीचा महत्त्वाचा संदर्भ होता. परिणामी १९९० पासून ९५ पर्यंत बीजिंगला झालेल्या चौथ्या विश्व महिला संमेलनाच्या तयारीमध्येसुद्धा असे अनेक मुद्दे येत होते. या मुद्द्यांमध्ये राज्यनिहाय चर्चा होत्या.

महाराष्ट्रात १९९३ साली महिला धोरणाची तयारी चालू असताना १९९५ च्या चौथ्या विश्व महिला संमेलनाच्या तयारीसाठी देशपातळीवर सामाजिक क्षेत्रात एनजीओ सल्लागार कमिटी तयार झाली होती. या कमिटीमध्ये महाराष्ट्रातून सर्वच महिला संघटनांनी माझ्यावर जबाबदारी टाकली होती. परिणामी ९४ ते २०१० देशातील व दक्षिण आशियातील सर्व पूर्वतयारीच्या व पाठपुराव्याच्या सुमारे ३० बैठकांत मला सन्माननीय प्रतिनिधी म्हणून सहभागी होता आले, समजून घेता आले व मांडता आले. अर्थात १९९३/९४ च्या आधी राष्ट्रीय प्रक्रिया नव्हत्या असे नाही. त्यापूर्वी १९८८ मध्ये नॅशनल पस्पेक्टइव्ह प्लानमध्ये तपशीलवार मुद्द्यांचा अंतर्भाव होता. इतर राज्यांमधूनसुद्धा फार मोठ्या प्रमाणामध्ये या विश्व महिला संमेलनाशी महिला जोडल्या गेल्या होत्या. महाराष्ट्रातील महिला या अनुभवांचा आधार घेत विश्व महिला संमेलनामध्ये गेल्या त्याचा वेगळा आविष्कार तिथे दिसला. महिला धोरणकर्ते राज्य म्हणून एक महाराष्ट्र राज्याचे महत्त्व समोर आले.

## मानसिकतेतील बदल मंदगतीने

गेल्या ६० वर्षांत विशेष म्हणजे १९९० नंतर झालेल्या जागतिकीकरणच्या पार्श्वभूमीवर ९० ते २०२० पर्यंत अनेक बदल झाले आहेत. त्यात बँका, आयटी सेक्टर, पर्यटन, वैद्यकीय क्षेत्र, सौंदर्य सेवा व वेलनेस, बचतगट व कृषिपूरक उद्योग यांनी स्त्रियांचे रोजगाराचे क्षेत्र बदलले आहे. विशेष म्हणजे महिला उद्योजिकांसाठी धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य म्हणून नोंदवले गेले आहे. ना. सुभाष देसाई यांच्या जागरूकतेने त्याला गती मिळाली. पुढील काळात यावर अधिक वेग अपेक्षित आहे. गेल्या ६० वर्षांत जशा महिला बदलल्या तसेच स्त्रीपुरुषांचे दोघांचे विश्वही बदलले आहे. जगाच्या कानाकोपऱ्याशी जोडले गेल्यावर आपण सर्वच दुजाभावांचे-विषमतेचे समर्थन करू शकत नाही हे मध्यमवर्गच नव्हे, तर समाजाच्या सर्वच घटकांतील निदान काही लोकांनी ओळखले असले तरीही जातीय, गरीब, श्रीमंतीचे, सामाजिक विषमतेचे हिंसात्मक रूप आपल्याला पाहायला मिळते. रोजगार, घरकाम, बालसंगोपन यासोबत स्त्रीच्या इच्छेचा आदर करण्याबाबत मानसिकता फार मंदगतीने बदलते आहे.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना दिलेले पहिले निवेदन, निर्भया फंडाचा विनियोग कशा प्रकारे करता येईल आणि लोकांना कसा बजेटचा फायदा अधिकाधिक करता येईल याबद्दलचे होते. त्यात वन स्टॉप क्रायसिस सेंटर, कृती आराखडे, बचतगट भवने, असावीत असा प्रस्ताव होता. या आराखड्यात ग्रामीण भागातील महिलांना ग्रामपंचायत स्तरावरती त्यांना कशा पद्धतीने शाश्वत विकासाचे उद्दिष्ट पुढे नेणारे दूत म्हणून गावपातळीवर नेमता येईल का? या सगळ्या विषयांवर काम करणे अपेक्षित आहे.

चळवळीमधून चांगल्या गोष्टी झाल्या त्याचे प्रतिबिंब सरकारमध्ये असावे आणि सरकारचे अतिशय चांगले काम करत आहे आणि लोकाभिमुख पद्धतीने पुढे जात आहे. त्याचे प्रतिबिंब समाजामध्ये उमटावे आणि अप्रतिम असावे व संवेदनशील पद्धतीने एकमेकांची साथ एकमेकाला लाभावी. या दृष्टिकोनातून या सगळ्या संवादाचा उपयोग होईल, अशी मला खात्री वाटते. म्हणून या कामांमध्ये ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार मानतोच. तसेच पुढच्या काळासाठी काही संकल्पदेखील व्यक्त करून ठेवते. संयुक्त महाराष्ट्र उद्याकडे प्रवास करताना, आपला महाराष्ट्र समाजाच्या या विकासाला. अनेक दशकांना, शतकांना आशा देईल, न्याय देईल हा आत्मविश्वास आहेच आणि तेच आपले कर्तव्य व पूर्वसंचित आहे!

**आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या अस्मितेचा दिवस! जगभरातील महिलांना आपले हक्क मिळवण्यासाठी बऱ्यापैकी संघर्ष करावा लागला. ८ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या या वर्षीच्या महिला दिनाची संकल्पना 'चूज टू चॅलेंज' अर्थात 'आव्हानांना सामोरे जाण्याचा पर्याय निवडा' अशी आहे. आव्हानातूनच बदल घडतात हे पाहता आव्हाने स्वीकारली पाहिजेत. महाराष्ट्र शासन महिलांच्या सक्षमीकरणासाठीचे आव्हान अशाच पद्धतीने यशस्वीपणे पेलत आहे हे गेल्या वर्ष-दीड वर्षाच्या कालावधीतील निर्णयांच्या अनुषंगाने लक्षात येईल. स्त्री-पुरुष समानतेसाठी महिला धोरण बनवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.**

# ध्यास महिला सक्षमीकरणाचा

**ॲड. यशोमती ठाकूर**
मंत्री, महिला व बालविकास



लिंगभेदाला आव्हान देणे आणि स्त्री पुरुष समानतेसाठी प्रयत्न करणे याला आपण प्राधान्य दिले पाहिजे. त्या दृष्टीने स्त्री- पुरुष समानतेसाठी महिला धोरण तयार करण्यात आले आहे. १९९४ चे पहिले महिला धोरण, तर २००१ चे दुसऱ्या महिला धोरणाच्या अनुषंगाने महिलांना सामाजिक आणि संधीची समानता मिळवून देण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले, तर २०१४ मध्ये जाहीर झालेल्या महिला धोरणात मार्गदर्शक सूचनांवर भर आहे. तथापि, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होईल, या दृष्टीने त्यातील त्रुटी काढून अंमलबजावणीच्या उपाययोजना आणि कार्यपद्धतीत भर घालण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शिफारसी करण्यासाठी समिती नेमली असून विविध विभागांशी समन्वयाने सुधारित म्हणता येईल, असे महिला धोरण तयार करण्याची प्रक्रिया आम्ही सुरू केली आहे.

विविध विभागांकडील योजना, सेवा, पायाभूत प्रकल्प, सुविधांच्या आखणी प्रसंगी महिला केंद्रस्थानी राहतील. याचा नवीन धोरणात विचार करून तरतूद केली जाईल. अनेक विभागांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये व्यक्तिगत स्वरूपात महिला, महिलांचे बचतगट यांना प्राधान्य आहे. त्या प्रमाणात त्यांना लाभ मिळतो का तसेच योजनांची काटेकोर अंमलबजावणी होते का, याची खात्री करण्यासाठी आढावा घेण्याची व्यवस्था निर्माण केली जाईल.

## महिलांचा सन्मान व सहभाग

पीडित महिलांच्या तक्रारी, समस्यांच्या प्रकरणात मदत करण्यासाठी राज्य महिला आयोग, महिलांच्या उन्नतीसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), सामाजिक संरक्षणाच्या दृष्टिकोनातून महिला व बालविकास आयुक्तालय अनेक योजनांच्या माध्यमातून कार्यरत आहे. 'माविम'मार्फत राबवण्यात येणारा 'नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प' गरीब ग्रामीण कुटुंबांसाठी पुढील काळात क्रांतिकारी ठरणार आहे. महिलांना बँकिंग व्यवस्थेत आणणे, व्यवसाय, लघुउद्योग, वस्तू उत्पादन यासाठी उद्योजकता विकास आणि व्यक्तिगत तसेच बचत गटांना सामूहिक कर्जपुरवठा केला जाणार असून महिलांचा बँकिंग व्यवस्थेत सन्मान वाढवण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

## 'शक्ती' कायदा

समाजातील विकृत मानसिकतेमुळे बलात्कार, विनयभंग अशा दुर्दैवी घटना घडत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी कठोर असा 'शक्ती' कायदा करण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे.



माविमच्या साहाय्याने महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण.

### कर्तव्यतत्परता ठेवली

एकीकडे राज्यभरात कोरोना संकटकाळात उपाययोजना करत असताना अमरावतीची पालकमंत्री म्हणून तिकडेही लक्ष ठेवणे माझे कर्तव्य होते. काटेकोर नियोजन करत जिल्ह्यात कोरोना विषाणूच्या संसर्ग प्रतिबंधासाठी आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर दिला. स्पेशालिटी रुग्णालयासह विविध ठिकाणी व्हेंटिलेटरसह सुसज्ज कक्ष कार्यान्वित करण्यात आले. जिल्ह्याच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात १०० बेडचे सुसज्ज विलगीकरण कक्ष कार्यान्वित करण्याचे काम प्राधान्याने केले. कोरोना संसर्ग प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने चाचणी अहवाल तत्काळ प्राप्त होणे महत्त्वाचे ठरते. हे लक्षात घेऊन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सुसज्ज कोरोना विषाणू तपासणी प्रयोगशाळा सुरू करण्यात आली.

एकीकडे कोरोनाच्या रुग्णांसाठी औषधोपचार करण्याची सोय करत असतानाच या अभूपूर्व संकटाने निर्माण केलेल्या तणावाचे निर्मूलन करण्यासाठी वेगवेगळे प्रयोगही केले गेले. कोरोना संसर्ग प्रतिबंधासाठी अहोरात्र झटणाऱ्या कोविड वॉरिअर्सकरिता ध्यानधारणा शिबिरांचेही आयोजन करण्यात आले.

कोरोनाच्या प्रारंभीच्या काळात सर्वत्रच कोविडचा प्रसार, उपचार आदींबाबत अनेक गैरसमज होते. अशा वेळी अमरावतीमधील जिल्हा कोविड रुग्णालयात दाखल रुग्णांची स्थिती व तेथील सुविधांचा आढावा घेण्यासाठी थेट कोविड वॉर्डमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. पीपीई किट घालून कोविड वॉर्डमध्ये जाऊन कोरोना पॉझिटिव्ह असलेल्या व उपचार घेत असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला. त्याचबरोबर सातत्याने अमरावती जिल्ह्यातील कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांचा आढावा घेत होते. अमरावती ग्रामीणमध्ये १६८६ गावांपैकी ९९८ गावांनी काटेकोर सूक्ष्म नियोजन करून कोरोनाला वेशीवरच थोपवण्यात यश मिळवले होते. अंगणवाडी सेविका, आशा सेविका, आरोग्य सेविका आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांचे हे यश होते.

पण गेल्या काही दिवसात अमरावती तसेच राज्यभरातच वाढलेल्या कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येमुळे चिंता वाढली आहे. असे असले तरी मला खात्री आहे की, आपले सुजाण नागरिक याबाबतचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाला सहकार्य करतील आणि कोरोनाला पुन्हा हरवतील.



पीपीई किट घालून कोरोना रुग्णांशी संवाद साधताना महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर.

आरोपींवरील खटला द्रुतगतीने चालवून अत्याचारांना बळी पडलेल्या स्त्रियांना कमीत कमी वेळेत न्याय मिळेल अशी व्यवस्था यातून निर्माण केली जाणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सर्वसहमतीने हा कायदा पारित होईल, असा विश्वास आहे.

### घरकामगार कल्याण मंडळ

असंघटित क्षेत्रामध्ये घरकामगार महिला मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या कल्याणासाठी घरकामगार कल्याण मंडळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. घरकामगार महिलांच्या सामाजिक, आर्थिक सक्षमीकरणाच्या योजनांचा आराखडा तयार करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडून सूचना मागवण्यात येतील. महिलांच्या विकासासाठी विविध विभागांबरोबर अभिसरणाच्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

### बालविवाहाला प्रतिबंध

कोविड कालावधीमध्ये बालविवाहांची समस्या तीव्रतेने समोर आली. ते रोखण्यासाठी प्रभावी प्रयत्न केले. तथापि, बालविवाह निर्मूलनासाठी खूप काम करणे आवश्यक आहे. रोखलेले बालविवाह पुन्हा होऊ नयेत, यासाठी प्रत्येक प्रकरणावर लक्ष ठेवण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या आहेत. बालविवाह प्रतिबंध नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांची मसुदा समिती गठित करण्यात आली आहे.

### महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

अंगणवाडी सेविका या भावी पिढीचा पाया मजबूत करण्यासाठी अखंड कार्यरत असतात. कोविड कालावधीमध्ये अंगणवाडी सेविकांनी घरोघरी जाऊन पोषण आहार पुरवठा केला. कुपोषण निर्मूलनासाठी त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. महिलांना सक्षम केल्यास

कुपोषण निर्मूलनात त्या महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात या जाणिवेतून आम्ही काम करत आहोत.

राष्ट्रीय पाळणाघर योजना ही अर्थार्जनासाठी घराबाहेर पडू इच्छिणाऱ्या महिलांसाठी महत्त्वपूर्ण आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषदा या योजनेसाठी पुढे आल्यास बालकांना पाळणाघरात ठेवून महिला अर्थार्जनासाठी बाहेर पडू शकतील. त्यातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकेल. त्यासाठी आम्ही पुढाकार घेत आहोत.

## मनोधैर्य : पीडितांना तत्काळ मदत

मनोधैर्य योजना तसेच व्हिक्टिम कंपेन्सेशन स्किम (बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना) नुसार पीडितांना अर्थसाहाय्य गतीने मिळेल, यासाठी यंत्रणेने संवेदनशीलरीत्या कार्यवाही करावी; आवश्यक तेथे योजनेच्या शासन निर्णयामध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करावा असे निर्देश यंत्रणेला दिले आहेत. बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला तसेच अनैतिक कारणांसाठी मानवी व्यापार आदी गंभीर प्रकरणांतील पीडितांच्या पुनर्वसनासाठी तत्काळ मदत मिळेल, याकडे आम्ही विशेष लक्ष देत आहोत.

तांत्रिक कारणांमुळे कोणतीही मदत अडकून राहता कामा नये, यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, महिला व बालविकास अधिकारी, पोलीस विभाग तसेच या प्रकरणात बाजू मांडणारे सरकारी अभियोक्ता यांच्यात सुसंवाद राहील, यासाठी कार्यपद्धतीची पुनर्रचना करण्यात येणार आहे.

## कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला समुपदेशन केंद्रे, महिला आयोग तसेच महिला व बालविकास आयुक्तालय आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या साहाय्यातून चालवण्यात येणाऱ्या हेल्पलाईन, संरक्षण अधिकारी यांच्या माध्यमातून पीडित महिलांना मदत करण्यात येते. पूर्वी केवळ महिलांसाठीच समर्पित असलेली १८१ क्रमांकाची हेल्पलाईन पुन्हा केवळ महिलांसाठीच राखीव ठेवण्याच्या अनुषंगाने आमचे प्रयत्न सुरू आहेत.

## सावित्री उत्सव

महिला शिक्षणाच्या प्रणेत्या, आद्यशिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याच्या गौरवार्थ आणि भावी पिढीला त्यातून प्रेरणा मिळावी म्हणून ३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिवस महिला व बालविकास विभागाच्या वतीने 'सावित्री उत्सव' म्हणून साजरा करण्याचा आम्ही निर्णय घेतला.

याशिवाय शालेय शिक्षण विभागाने हा दिवस 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरा केला.

## फसवणूक झाल्यास तक्रार करा

विवाह हा महिलांच्या आयुष्यातील अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा असून वैवाहिक जोडीदाराची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. अशा प्रसंगी मॅट्रिमोनिअल साईट्सवर नोंदणी करताना त्या माध्यमातून आलेले विवाह प्रस्ताव महिलांनी अतिशय पारखून घेणे गरजेचे आहे.

सध्याचे युग हे डिजिटल युग आहे. दिवसेंदिवस सगळ्याच क्षेत्रातील तंत्रज्ञानामध्ये प्रगती होत आहे. परंतु, तंत्रज्ञानाच्या योग्य वापराचे जसे फायदे आहेत त्याचप्रमाणे गैरवापर केल्यामुळे तोटेही आहेत आणि याच गोष्टीचा फायदा गुन्हेगार घेत आहेत. फसवणुकीचे प्रकार लक्षात येताच महिलांनी गप्प न राहता पोलिसांकडे तक्रार करावी. पोलिसांची सायबर शाखा यामध्ये सर्व ते सहकार्य करते.

### कोरोनाशी दोन हात

कोरोना काळात महाराष्ट्रात, देशातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात महिलांनी डॉक्टर, परिचारिका, पोलीस, शिक्षिका, अंगणवाडी सेविका आदी भूमिका पहिल्या फळीत राहून प्रभावीपणे बजावल्या आहेत. कोविडयोद्ध्या बनून केलेल्या त्यांच्या या कार्याचा एक महिला म्हणून मला अभिमान आहे. यामध्ये मलाही सहभाग देता आला याचा आनंद आहे.

कोरोनाचे अभूतपूर्व संकट अजूनही संपलेले नाही. संकटाची तीव्रता कमी झालेली असल्याचे वाटत असतानाच आता पुन्हा कोरोनाने डोके वर काढले आहे. पुन्हा एकदा सगळ्यांनी एकत्रितपणे कोरोनाविरोधात लढण्याची वेळ आली आहे. राज्य शासनाने या संकटकाळात जनहितासाठी आणि सुरक्षेसाठी सर्वोतोपरी कार्य केले आहे.

### राष्ट्रीय पातळीवरही दखल

महिला आणि बालविकास विभागाने या काळात केलेल्या कामांची तर राष्ट्रीय पातळीवरही दखल घेतली गेली. या संकट काळात पोषण आहाराचे वाटप असेल, स्तनदा आणि गरोदर मातांची काळजी घेण्याचे काम असेल किंवा अंगणवाडी ताईंनी केलेले काम हे सर्व दखलपात्र ठरले. कोरोनाच्या या संकटकाळात या विभागाने अनेक कामे करत गरजूंना मदत केली.

'माविम'च्या बचतगटांच्या महिलांनी केलेली मास्क निर्मिती असो की, लोकसंचालित साधन केंद्रांमार्फत शिवभोजन केंद्रांचे संचालन, टाळेबंदीच्या काळात शहरांमध्ये अल्पदरात भाजीपाल्याचा पुरवठा, गरजू कुटुंबांपर्यंत धान्य व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा असे अनेक उपक्रम राबवले.



माविमच्या साहाय्याने महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण.

## विम्याचे लाभ वेळेवर

सेवानिवृत्त झालेल्या अंगणवाडी सेविका आणि मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांना लागू असलेले अनुक्रमे १ लाख आणि ७५ हजार रुपये विम्याचे लाभ वेळेवर मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. त्याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन यंत्रणेची संवेदनशीलता वाढवण्यावर भर दिला. त्यामुळे प्रलंबित असलेली बहुतांश प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

## महिला व बालविकास भवन

महिला व बालकांशी संबंधित सर्व योजनांचे लाभ आणि सेवांची माहिती यासाठी एकाच ठिकाणी संपर्क साधता यावा; लोकांचा पैसा, वेळ आणि त्रास वाचावा यासाठी उपाययोजना करण्याचा आमचा प्रयत्न होता. त्यातूनच गतवर्षी १५ ऑगस्ट रोजी सर्व जिल्ह्यात जिल्हा परिषदेतील एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालयात 'महिला व बालविकास भवन' सुरू करण्यात आली आहे. पुढील काळात सर्व जिल्ह्यात स्वतंत्र इमारती उभारून सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.

## विभागीयस्तरावर महिला आयोग

राज्य महिला आयोगाची कार्यालये सर्व विभागीय आयुक्तालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला. मुंबई हे राज्यातील मध्यवर्ती ठिकाण नसून राज्यातील पीडित महिलांना आपल्या समस्या, तक्रारी घेऊन मुंबईला येणे सोयीस्कर नाही. तक्रारींच्या प्रकरणात अंमलबजावणीचे अधिकार महिला आयोगाला नसल्यामुळे जिल्हाधिकारी, पोलीस यंत्रणा, आरोग्य विभागाची मदत घेऊन पीडितांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आयोग काम करते.

विभागीय पातळीवर हे काम झाल्यास पीडितांना अधिक गतीने न्याय मिळेल हा विभागीय पातळीवर आयोगाची कार्यालये सुरू करण्यामागील हेतू आहे. याच धर्तीवर राज्य बालहक्क आयोगाची कार्यालयेही विभागीय पातळीवर सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## उंच भरारीचा विश्वास

आकांक्षित जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आलेला 'तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस' हा प्रकल्प अतिगरीब व कर्जबाजारी कुटुंबांना बँकिंग सेवेद्वारे नवीन कर्ज आणि रोजगारक्षम बनवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. राज्यातील महिला कर्तबगारीच्या बाबतीत कुठेच कमी नाहीत. सामाजिक जाणिवा, औद्योगिक, व्यावसायिकवृत्ती त्यांच्यात असून कुटुंबांच्या उन्नतीसाठी त्या संघर्षशील आणि धडपड्या आहेत. त्यांना सक्षम साथ दिल्यास त्या आणखीन उंच भरारी घेऊ शकतील, असा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : सचिन गाढवे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**महिला व बालविकास विभाग हा महत्त्वाचा विभाग असून, आमचा राज्यातील माता-भगिनी व बालक यांच्या सर्वांगीण उन्नतीवर भर आहे. आम्ही प्रामुख्याने महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणावर विशेष लक्ष देऊन या विभागामार्फत त्यांना जास्तीत जास्त सोयीसुविधा देण्याचा प्रयत्न करत आहोत.**

**ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
राज्यमंत्री, महिला व बालविकास



महिला व बालविकास विभागातील एक दुर्लक्षित घटक म्हणजे दिव्यांग व निराधार तसेच अनाथ बंधुभगिनी, त्यांच्या उन्नतीसाठी देखील आमचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. केवळ शासनच नव्हे, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीला माझी विनंती आहे की, आपण म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दिव्यांग, निराधार, माता भगिनींकडे मानवतेच्या दृष्टीने, माणुसकीच्या भावनेने घरातील एक व्यक्ती असे समजून लक्ष दिले पाहिजे. वंचित घटकांना न्याय देण्याला आपण प्राधान्य दिले पाहिजे.

या विभागात काम करताना अधिकारी, कर्मचारी यांनी विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, दिव्यांग आणि निराधार घटकांच्या कल्याणाला प्राधान्य द्यायलाच हवे. संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा, राज्य निवृत्तिवेतन योजना, विधवा, परित्यक्ता आणि घटस्फोटिता महिलांसाठी स्वयंरोजगार योजना, यासाठी तुम्हाला जीव ओतून काम करायचे आहे. राज्यमंत्रीच नव्हे, तर मी आमदार असल्यापासून अनाथांच्या प्रश्नासाठी लढत आहे. तेव्हापासून शासनाने अनाथांच्या कल्याणासाठी जवळपास ३० नवीन शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

याशिवाय बालविवाह संदर्भात कडक कायदा आणि सामाजिक सुधारणा अशा बऱ्याच बाबी विभागामार्फत राबवून राज्यातील माता-भगिनींना शासन तुमच्यासाठीच आहे, असा दिलासा दिला. राष्ट्रीय पाळणाघर योजना, मनोधैर्य योजना, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी, महिला समुपदेशन केंद्र, महिला आयोग अशा सर्वच महत्त्वपूर्ण योजना, संस्थांच्या संदर्भात अत्यंत जागरूकतेने काम करणे सुरू आहे. अधिकारी कर्मचारी वर्गांनाही दक्ष राहून काम करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

### 'माविम'चे महत्त्वपूर्ण कार्य

माविमअंतर्गत सुमारे १ लाख ३९ हजार महिला स्वयंसाहाय्यता बचतगट निर्माण केले. त्यात जवळपास १७ लाख महिला सामील आहेत. तसेच ३६१ लोकसंचलित साधन केंद्र (सीएमआरसी) म्हणजेच बचत गटांचे फेडरेशन स्थापन झालेले असून, त्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे संघटन, त्यांची क्षमता बांधणी, उद्योजकता विकास यासाठी माविमकडून काम केले जाते. आमचे महिला आर्थिक विकास महामंडळ अर्थात 'माविम'महिलांच्या उन्नतीसाठी उत्तम काम करत आहे.

### 'ई-बिझनेस प्लॅटफॉर्म'

बचतगटाच्या महिलांच्या 'ई-बिझनेस प्लॅटफॉर्म' ॲपद्वारे

# आर्थिक-सामाजिक सक्षमता

### दिलासा

महिला व बालविकास विभागामार्फत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प हा ग्रामीण महिलांच्या उन्नत उपजीविकेकरिता मूलभूत बदलाचा कार्यक्रम दहा लाख कुटुंबापर्यंत पोहोचणार आहे. कोरोनाचा परिणाम साहजिकच विभागावर व लाभार्थींवर झालेला आहे. पण त्यातही आम्ही जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. अगदी पोषण आहार असेल तो घरपोच पोहोचण्याचा आमचा यशस्वी प्रयत्न झाला. त्याचप्रमाणे बालगृह, बालकांची सुरक्षा आणि त्यांची काळजी कोविड काळात समुपदेशनासाठी सुरू केलेला तरंग सुपोषित महाराष्ट्राचा हा डिजिटल प्लॅटफॉर्म, बालगृहाची नोंदणी, अनाथांसाठी प्रमाणपत्र, त्यांचे आरक्षण



**माविमच्या साहाय्याने भंडारा येथे ई-रिक्षा चालवणारी एक महिला**

शेतमालाची रिअल टाईम माहिती संकलित करून बाजारपेठेची मागणी आणि बाजारभाव पाहून त्यानुसार शासकीय व खासगी संस्थांसोबत व्यापार करण्यास मदत होणार आहे. २.५ लाखांपेक्षा जास्त महिला शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यांना याचा लाभ मिळत आहे. कोरोनासारख्या बिकट काळातही महिला व बालविकास विभाग राज्यातील माता-भगिनींसाठी, बालकांसाठी त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. आमच्या विभागाच्या विविध योजनांद्वारे तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**शब्दांकन : डॉ. राजू पाटोदकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याच्या विधिमंडळात म्हणजेच विधानपरिषद आणि विधानसभा या दोन्ही सभागृहात राज्याच्या विविध भागातील महिला त्या-त्या मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत. विधानपरिषद सभागृहात दोन, तर विधानसभेत २४ महिला प्रतिनिधित्व करत आहेत. या महिला लोकप्रतिनिधी आपापल्या कार्यक्षेत्रात आपल्या कामातून वेगळा ठसा निर्माण करून नवे पर्व निर्माण करत आहेत, अशा या महिला लोकप्रतिनिधींचा संक्षिप्त परिचय..**

# नवे पर्व



## ■ डॉ. नीलम दिवाकर गोऱ्हे

**पक्ष :** शिवसेना. **मतदार संघ :** महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित. **उल्लेखनीय कार्य :** संस्थापिका-अध्यक्षा, स्त्री आधार केंद्र व क्रांतिकारी महिला संघटना, १९८९-९१ चित्रपट सेन्सॉर बोर्डावर कार्य; १९९३-९४ नाट्य परीक्षण मंडळावर कार्य; १९९९-२००० अध्यक्षा, महिला आर्थिक विकास महामंडळ; महाराष्ट्र राज्याच्या १९९४, १९९८ व २००१ च्या महिला धोरण निर्मितीत सहभाग; १९९३-९५ सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग; २००२-०८, २००८-१४, २०१४-२० सदस्या, महाराष्ट्र विधानपरिषद; राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेतर्फे ५ जुलै २००९ रोजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते विधानपरिषदेतील उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्राप्त; २०२० मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर फेरनिवड; २४ जून, २०१९ ते २४ एप्रिल २०२० पर्यंत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती. ८ सप्टेंबर २०२० पासून उपसभापती पदी फेरनिवड. साहित्य समीक्षा विषयाची आवड, कथासंग्रह व विविध वृत्तपत्रांमधून लिखाण; 'उरल्या कहाण्या' या कथासंग्रहास १९९० चा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार प्राप्त. १९९९ मुंबई महानगरपालिकेतर्फे उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कार प्राप्त.

## ■ प्रा. वर्षा एकनाथ गायकवाड



**पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. **मतदार संघ :** १७८-धारावी (अनुसूचित जाती), जिल्हा - मुंबई शहर. **उल्लेखनीय कार्य :** अध्यक्षा, निर्मल महिला मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, विक्रोळी, मुंबई; रयत महासंघ व अभय शिक्षण केंद्र या संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सुरू केले; २००४-०९, २००९-१४, २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; २००४-०८ सदस्या, व २००८-०९ समिती प्रमुख, महिलांचे हक्क व कल्याण समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २००६-०७ साठीचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार प्राप्त; ७ नोव्हेंबर, २००९ ते १० नोव्हेंबर २०१० वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, पर्यटन व विशेष साहाय्य खात्याच्या राज्यमंत्री. ११ नोव्हेंबर, २०१० ते २६ सप्टेंबर, २०१४ महिला व बालविकास खात्याच्या मंत्री. ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, जानेवारी २०१९ पासून शालेय शिक्षण मंत्री.



## ■ ॲड. यशोमती ठाकूर (सोनवणे)

**पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. **मतदार संघ :** ३९-तिवसा, जिल्हा-अमरावती. **उल्लेखनीय कार्य :** १९८९ ड्युक ऑफ एडनबर्गचे ब्राँझ पदक प्राप्त; १९९३ ऑल इंडिया एन.सी.सी.च्या बेसिक लिडरशीप कॅम्पमध्ये नेमबाजीचे सुवर्ण पदक प्राप्त; ग्रामीण भागातील गुणात्मक शिक्षण विकासासाठी गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप व ग्रामीण भागातील २६२ माध्यमिक शाळांमधील ग्रंथालयांना विविध उपयुक्त विषयांवरील पुस्तकांचे वाटप; २००४ पासून सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग; २००९-१४, २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. ७ जानेवारी, २०२० पासून महिला व बालविकास विभागाच्या मंत्री.

## ■ कु. आदिती सुनील तटकरे



**पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदार संघ :** १९३ - श्रीवर्धन, जिल्हा रायगड. **उल्लेखनीय कार्य :** २००८-०९ प्राध्यापिका, जयहिंद कॉलेज; २००८-०९ यु.पी.एस.सी. परीक्षेच्या पर्यवेक्षिका; २०१७-१९ सदस्या, मार्च २०१७ ते नोव्हेंबर २०१९ अध्यक्षा, जिल्हा परिषद रायगड, २०१७ मध्ये हिरकणी पुरस्काराने सन्मानित. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. जानेवारी २०१९ पासून उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या राज्यमंत्री.

## ■ डॉ. मनीषा श्यामसुंदर कायंदे



**पक्ष :** शिवसेना. **मतदार संघ :** महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा. **उल्लेखनीय कार्य :** आजीव सदस्या, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, कुलाबा, मुंबई; सदस्या, बोर्ड ऑफ गव्हर्निंग कौन्सिल महाराष्ट्र सोसायटी, नेचर पार्क, धारावी, मुंबई; सदस्या, फोरम फॉर केअरनेस इन एज्युकेशन, दादर, मुंबई; २००३-०५ सदस्या, सबर्बन रेल युजर्स कन्सल्टेटिव्ह कमिटी; सदस्या, नॅशनल सोसायटी फॉर ब्लाईंडनेस, दादर, मुंबई; सदस्या, जिल्हा नियोजन समिती, मुंबई शहर; १९९६-२००० सदस्या, महिला दक्षता समिती (मुंबई पोलीस); १९९७-२००८ स्वीकृत सदस्या, शिक्षण समिती, महानगरपालिका, मुंबई; विश्वस्त, साई संस्थान, शिर्डी; संस्थापिका-अध्यक्षा, अवनी फाऊंडेशन, मुंबई; जुलै २०१८ मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित.



## ■ मंजुळा तुळशिराम गावित

**पक्ष :** अपक्ष, **मतदार संघ :** ०५ - साक्री (अनुसूचित जमाती), जिल्हा- धुळे. **उल्लेखनीय कार्य :** १९८७-९५ विजया बँकेत नोकरी. १९९६ पासून संचालिका, मंजुश्री गॅस एजन्सी, धुळे; २००१-०५ संचालिका, दिनदयाळ उपाध्याय आदिवासी सहकारी सूतगिरणी, उदयनगड-पिंपळनेर; खानदेश महोत्सवाचे आयोजन; आदिवासी कला, वाद्य व नाट्य पथकांचे संचलन; एप्रिल २०१४ मध्ये आदिवासी गरीब समाजातील १००१ जोडप्यांच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन; २००८-१३ नगरसेविका, जून २०११ ते डिसेंबर २०१३ महापौर, धुळे महानगरपालिका; नाशिक विभागीय उद्योजकता पुरस्काराने सन्मानित; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

## ■ लताबाई चंद्रकांत सोनवणे



**पक्ष :** शिवसेना. **मतदार संघ :** १०-चोपडा (अनुसूचित जमाती) जिल्हा-जळगाव. **उल्लेखनीय कार्य :** २०१० पासून संचालिका, सिद्धिविनायक फेडरेशन, जळगांव; २०१४-१९ नगरसेविका, महानगरपालिका जळगांव, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ श्वेता विद्याधर महाले

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** २३-चिखली, जिल्हा-बुलडाणा. **उल्लेखनीय कार्य :** अध्यक्षा, तोरणा महिला सहकारी संस्था मर्या.; आधार बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्या. बुलडाणा, या संस्थेमार्फत गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप, महिला मेळाव्यांचे आयोजन; सदस्या, बुलडाणा जिल्हा परिषद; सभापती, महिला व बालकल्याण समिती, बुलडाणा जिल्हा परिषद; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

## ■ सुलभा संजय खोडके



**पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. **मतदार संघ :** ३८- अमरावती, जिल्हा अमरावती. **उल्लेखनीय कार्य :** अध्यक्षा, स्व. प्रवीण खोडके मेमोरियल ट्रस्ट अमरावती, सिद्धिविनायक महिला सहकारी औद्योगिक संस्था अमरावती, सिद्धिविनायक ग्राहक भांडार अमरावती, सिद्धिविनायक महिला सहकारी पतसंस्था (बचतगट) मर्या. अमरावती; १९९८-२००२ अध्यक्षा, अमरावती जिल्हा महिला सहकारी बँक; संचालिका, महाराष्ट्र राज्य अर्बन बँक फेडरेशन मर्या. मुंबई, महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन मर्या, मुंबई, विदर्भ अर्बन बँकस् असोसिएशन नागपूर व विदर्भ सहकारी प्रिंटिंग प्रेस अमरावती; संचालिका व २००१-०२ पहिल्या महिला अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे; २००४-०९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ प्रतिभा सुरेश धानोरकर

**पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. **मतदार संघ :** ७५- वरोरा, जिल्हा-चंद्रपूर. **उल्लेखनीय कार्य :** प्रतिवर्षी महिला मेळाव्यांचे आयोजन, उप-जिल्हा रुग्णालय वरोरा येथे रुग्णांच्या नातेवाइकांसाठी मोफत भोजन व्यवस्था सुरू केली. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

## ■ मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर



**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** ९५- जिंतूर, जिल्हा परभणी. **उल्लेखनीय कार्य :** २०११ पासून उपाध्यक्षा, कै. वामरावजी कदम बोर्डीकर सेवा संस्था, जिंतूर, दीपस्तंभ प्रतिष्ठान संस्थेमार्फत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सुरू केले. २०१२-१७ सदस्य जिल्हा परिषद, परभणी, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ प्रा. देवयानी सुहास फरांदे

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** १२४-नाशिक (मध्य), जि.नाशिक. **उल्लेखनीय कार्य :** संस्थापिका-अध्यक्षा, वुमन फोरम, दुर्गा महिला बहुउद्देशीय संस्था, नाशिक या संस्थेद्वारे महिलांच्या सक्षमीकरणासाठी नाशिक शहरातील महिलांचे बचतगट तयार करून त्यांना विविध रोजगाराच्या संधी मिळवून दिल्या; १९९७-२०१४ या काळात तीन वेळा नगरसेविका, २००९ ते २०१२ उपमहापौर, नाशिक महानगरपालिका; २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, इतर मागासवर्ग समिती, उपविधान समिती, अंदाज समिती; डिसेंबर २०१५ ते मार्च २०१६ तालिका अध्यक्षा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## ■ सीमा महेश हिरे



**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** १२५ - नाशिक पश्चिम, जिल्हा-नाशिक. **उल्लेखनीय कार्य :** आजीव सदस्या, ग्रामोदय शिक्षण संस्था नाशिक; अध्यक्षा, समर्थ महिला मंडळ, नाशिक; सेवेकरी, श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरी; २०१४-१९ संचालिका, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; उपाध्यक्षा, इंडिपेंडन्स बँक; २००२-०७, २००७-१२, २०१२-१७ नगरसेविका, नाशिक महानगरपालिका; सभापती, पश्चिम प्रभाग, नाशिक महानगरपालिका; २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, विधानमंडळ महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ सरोज बाबुलाल अहिरे

**पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदार संघ :** १२६- देवळाली (अनुसूचित जाती), जिल्हा नाशिक. **उल्लेखनीय कार्य :** २०१७-१९ नगरसेवक, २०१७-१८ सभापती, महिला बालकल्याण समिती, नाशिक महानगरपालिका; समिती प्रमुख, महिला व बालकांचे हक्क कल्याण समिती. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.

## ■ गीता भरत जैन



**पक्ष :** अपक्ष. **मतदार संघ :** १४५ -मिरा भाईदर, जिल्हा-ठाणे. **उल्लेखनीय कार्य :** १५ वर्षे नगरसेविका, २०१५-१७ महापौर, मिरा-भाईंदर महानगरपालिका; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ मंदा विजय म्हात्रे

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** १५१-बेलापूर, जिल्हा-ठाणे. **उल्लेखनीय कार्य :** संस्थापिका, श्रीगोवर्धिनी शिक्षण संस्था गौरव इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नेरुळ, नवी मुंबई; संस्थापिका-अध्यक्षा, गोवर्धिनी सहकारी पतसंस्था, नवी मुंबई; १९९४-१९९५ सदस्या व १९९७ सभापती, बालकल्याण समिती, नवी मुंबई महानगरपालिका; २००४-१० सदस्या, महाराष्ट्र विधानपरिषद; समिती प्रमुख, महिला व बालविकास समिती; राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २००५-०६ चा 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार २९ जून २००९ रोजी महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव कार्यक्रमात राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते प्राप्त; २०१४-१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ मनीषा अशोक चौधरी

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** १५३-दहिसर, जिल्हा-मुंबई उपनगर. **उल्लेखनीय कार्य :** अध्यक्षा, वनवासी कल्याण केंद्र, तलासरी ; २००२-०६ संचालिका, ठाणे ग्रामीण बँक लि.; विश्वस्त, सावित्रीबाई फुले प्रबोधिनी; १९९७-२००७ नगरसेविका, १९९७-२००१ नगराध्यक्षा, डहाणू नगरपालिका; २०१४-२०१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-२०१७ समिती प्रमुख, महिला व बालहक्क विकास समिती; सदस्या, शक्ती कायदा संयुक्त समिती, ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ विद्या जयप्रकाश ठाकूर

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष, **मतदार संघ :** १६३-गोरेगाव, जिल्हा-मुंबई. **उल्लेखनीय कार्य :** १९९२-२०१२ सलग चार वेळा नगरसेविका, २००७ उपमहापौर, दोन वेळा आरोग्य समितीच्या अध्यक्षा; तसेच स्थायी समिती, उद्यान व बाजार समिती व सुधार समितीच्या सदस्या, मुंबई महानगरपालिका; ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड, डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ महिला व बालविकास, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या राज्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ डॉ. भारती हेमंत लव्हेकर

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** १६४-वर्सोवा, जिल्हा मुंबई-उपनगर. **उल्लेखनीय कार्य :** मुक्तांगण महाविद्यालय गंगापूर व एस.एन.डी.टी. विद्यापीठ मुंबई तसेच अनेक वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य; जनरल सेक्रेटरी, मराठवाडा लोक विकास मंच; अध्यक्षा, ती फाऊंडेशन; संस्थापिका, अध्यक्षा, 'आपली मोलकरीण' घरेलू कामगार संघटना, 'ती' मासिकाच्या संपादिका; २०१७ मध्ये कर्नाटक लेजिस्लेचर व फोरम फॉर चाईल्ड राईट्स यांच्या संयुक्त विद्यमाने विकास सौधा, बँगलोर येथील कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्र विधिमंडळाचे प्रतिनिधित्व केले. राष्ट्रपतींच्या हस्ते फर्स्ट लेडी २०१८ राष्ट्रीय पुरस्कार, २००१ च्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित; २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; २०१५-१७ सदस्या व २०१७-१९ समिती प्रमुख, महिला व बालहक्क कल्याण समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.



## ■ यामिनी यशवंत जाधव

**पक्ष :** शिवसेना. **मतदार संघ :** १८४ - भायखळा, जिल्हा-मुंबई शहर. **उल्लेखनीय कार्य :** विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन; गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप, रुग्णांना मदत, आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन, सार्वजनिक ठिकाणी बाल संगोपन केंद्र सुरू केले; २०१२-१७ बृहन्मुंबई नगरसेविका, २०१२-१७ अध्यक्षा, बाजार व कल्याण समिती; २०१२-१७ सदस्या, शिक्षण समिती, मुंबई महानगरपालिका; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ माधुरी सतीश मिसाळ

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** २१२-पर्वती, जिल्हा-पुणे. **उल्लेखनीय कार्य :** अध्यक्षा, ब्रिक कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, उंद्री, पुणे; विश्वस्त, शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे; संचालिका व अध्यक्षा, विद्या सहकारी बँक लि. पुणे; संचालिका, उद्यम सहकारी बँक लि. पुणे; २००७-१२, नगरसेविका, महानगरपालिका, पुणे; २००९-१४, २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, सार्वजनिक उपक्रम समिती, लोकलेखा समिती, महिला व बालविकास समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## ■ मुक्ता शैलेश टिळक



**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** २१५-कसबा पेठ, जिल्हा-पुणे. **उल्लेखनीय कार्य :** २०१२ पासून अध्यक्षा, आनंदवन मित्र मंडळ; २००७ पासून विश्वस्त, लोकमान्य टिळक विचार मंच; २०१५ पासून उपाध्यक्षा, इंटरनॅशनल लेप्रसी युनियन; कार्यकारिणी सदस्या, दृष्टी महिला विचारमंच; संस्थापिका, प्रेरणा महिला मंडळ; लोकमान्य दैनंदिनीच्या संपादिका; २००२-१९ नगरसेविका, २००९-१२, गटनेता; २००२-०७ सदस्या, वृक्ष प्राधिकरण समिती; २०१५-१९ सदस्या, स्थायी समिती, २०१७-१९ महापौर, महानगरपालिका, पुणे; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ मोनिका राजीव राजळे

**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** २२२-शेवगाव, जिल्हा-अहमदनगर. **उल्लेखनीय कार्य :** संस्थापिका-अध्यक्षा, यशोधरा महिला प्रतिष्ठान, पाथर्डी; विश्वस्त, आदि फाऊंडेशन, आदिनाथ नगर, पाथर्डी; २०१७ पासून संचालिका, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.; संचालिका, श्री. वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना; २०१२-१४ सदस्या, उपाध्यक्षा व चेअरमन, आरोग्य व शिक्षण समिती, जिल्हापरिषद अहमदनगर; २०१४-१९ सदस्या, महाराष्ट्र विधानसभा; सदस्या, ग्रंथालय समिती, आमदार निवास व्यवस्था समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## ■ नमिता अक्षय मुंदडा



**पक्ष :** भारतीय जनता पक्ष. **मतदार संघ :** २३२ केज (अनुसूचित जाती), जिल्हा-बीड. **उल्लेखनीय कार्य :** २०१६ पासून उपाध्यक्षा, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई, जिल्हा बीड; २०१५ पासून अध्यक्षा, वसुंधरा महिला सहकारी तालुका दूध उत्पादक व पुरवठा संघ लि., अंबाजोगाई; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.



## ■ कु. प्रणिती सुशीलकुमार शिंदे

**पक्ष :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. **मतदार संघ :** २४९-सोलापूर शहर (मध्य), जिल्हा- सोलापूर. **उल्लेखनीय कार्य :** संस्थापिका-अध्यक्षा, जाई-जुई प्रतिष्ठान, सोलापूर, या संस्थेद्वारे युवक, महिला, अपंग, वंचित यांच्या विकासासाठी विविध उपक्रमांतून सतत कार्यरत; अनेक सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल या संस्थेस 'नेहरू युवा पुरस्कार' प्राप्त; घरेलू कामगारांना शिक्षण देणाऱ्या सेतू संस्थेचे कार्य; मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी सहायक शिक्षिका म्हणून काम केले; २००९-१४, २०१४-१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## ■ सुमन आर.आर. पाटील



**पक्ष :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष. **मतदार संघ :** २८७-तासगाव-कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली. **उल्लेखनीय कार्य :** २०१५ पासून लोकनेते आर.आर.पाटील यांच्या कामाचा वारसा जपण्याचा प्रयत्न; जुलै, २०१५ पासून संचालिका, स्वामी रामानंद भारती सहकारी सूतगिरणी मर्या. तासगाव, जिल्हा सांगली; २०१५-१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१७-१९ सदस्या, विनंती अर्ज समिती; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

**संकलन :** ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

‘सक्षम महिला, सुदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्र’ हे ध्येय घेऊन राज्याचा महिला आणि बालविकास विभाग काम करत आहे. कोरोना संकटाच्या काळात विभागाच्या मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली या विभागाने केलेल्या अथक परिश्रमांच्या जोरावर लाभार्थ्यांपर्यंत सर्व योजना पोहोचवण्यात यश आले. गेले संपूर्ण वर्ष संकटाचे असले तरी माझ्या विभागाने केलेल्या कामाची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे.

# महिलांची सर्वांगीण प्रगती

**आय. ए. कुंदन**
प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग

महिला सक्षमीकरणाचे विशाल ध्येय घेऊन काम करत असताना महिलांना त्यांच्या पायावर उभे केले तर खऱ्या अर्थाने त्या सक्षम होऊ शकतील हे लक्षात घेत अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. एक महिला जेव्हा सक्षम होते तेव्हा तिचे बाळही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ होते. जर महिला सक्षम असतील, तर बालक सुदृढ होणार, असा आमचा विश्वास आहे. म्हणूनच गेल्या वर्षभरात महिला आणि बालविकास विभागाने सुपोषित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत.



## खात्रीशीर उत्पन्नाचे स्रोत

महिलांना सक्षम करायचे असेल तर आपल्याला त्यांना आर्थिक स्वातंत्र्य द्यावे लागेल. स्वत:ची काळजी घेण्यासाठी आणि परिवारासाठी स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना द्यावे लागेल आणि यासाठी आम्ही विविध पावले उचलली आहेत. यामध्ये आम्ही माविमच्या माध्यमातून गावांमध्ये बचतगटांद्वारे महिलांसाठी आर्थिक पर्याय उभे केले आहेत. त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असावा यासाठी आम्ही त्यांना खात्रीशीर उत्पन्नाचे नवनवीन स्रोत उभे करून देत आहोत. याव्यतिरिक्त माविमच्या अंतर्गत काम करणाऱ्या बचतगटांसाठी राज्य शासनाने ५६० कोटी रुपयांचे कर्जही उभे केले आहे. त्यामुळे या महिला केवळ सक्षम होणार नाहीत, तर त्या इतर महिलांना रोजगारही उपलब्ध करून देऊ शकतील.

## बालसंगोपन केंद्र

महाराष्ट्रातील बालसंगोपन केंद्रांची केंद्र सरकारच्या नियमांप्रमाणे नोंदणी करण्यात आली आहे. यामधील मुलांना पुरेपूर सुविधा आणि सुरक्षा मिळेल, याची काळजी आम्ही घेत आहोत. एक चांगला नागरिक त्यांच्यातून घडवण्याची खबरदारी आम्ही घेत आहोत. त्यांच्या हक्कांचे संरक्षण होईल, याचीही काळजी आम्ही घेत आहोत. एक सक्षम नागरिक म्हणून ते बाहेर पडतील यासाठी विभागातर्फे त्यांना मानसिक आधार देणे, कौशल्य विकास यांसारख्या गोष्टीही शिकवल्या जात आहेत. त्यांना दिल्या जाणाऱ्या सेवांचे आम्ही ऑनलाईन निरीक्षणही करत आहोत.

## कोरोना काळातही सक्षमीकरण

दरवर्षीप्रमाणे यंदाही आम्ही, कोरोना महामारीच्या मर्यादा असतानाही विविध उपक्रम राबवले. महिला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी ‘सावित्री उत्सव’ साजरा करत त्यांच्या स्मरणाने महिला सक्षमीकरणाच्या कार्याला गती देण्याचा निर्धार केला आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक महिला शक्ती केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोरोनामुक्तीसाठी काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा गट प्रवर्तक, आशा कार्यकर्त्या, अर्धवेळ स्त्री परिचर यांना नियमित मानधन, वेतनाव्यतिरिक्त दरमहा एक हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला. कोरोनामुक्तीसाठी

## ‘माविम’चे उल्लेखनीय कार्य

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत लोकसंचालित साधना केंद्राद्वारे (सीएमआरसी) १२ जिल्ह्यांमध्ये शिवभोजन केंद्रांच्या माध्यमातून शिवभोजन थाळ्यांचे वाटप करण्यात आले. माविमअंतर्गत अन्नसुरक्षेच्या दृष्टीने सामाजिक सहभागातून धान्य बँक स्थापित करण्यात आल्या. महिलांची डिजिटल फसवणूक होऊ नये म्हणून महिलांना डिजिटल साक्षर करण्याकरिता डिजिटल स्त्री शक्ती उपक्रम सुरू केला आहे. ८ हजार तरुणींना सायबर सखी म्हणून प्रशिक्षित करण्यात आले आहे व ५० हजार मुलींपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवून माविमच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे, त्यांच्या क्षमतांचा विकास करणे, महिलांचा आत्मविश्वास वाढवणे, महिलांना स्वयंरोजगाराच्या कोणत्या संधी आहेत आणि त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ यांच्यात सुसूत्रता आणणे, महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढवणे अशी उद्दिष्टे जोपासून हे महामंडळ कार्यरत आहे.

काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना दिवाळीपूर्वी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देत आम्ही त्यांची दिवाळी गोड केली. एवढेच नाही, तर सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकेला निवृत्तीच्या दिवशीच विम्याची रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला.

देहविक्रय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोविड-१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक महिन्याला कोरडे अन्नधान्य पुरवणे, तसेच या महिलांना प्रतिमहिना पाच हजार रुपये, तसेच ज्या महिलांची मुले शाळेत जातात अशा महिलांना अतिरिक्त २,५०० रुपये रोख स्वरूपात मुख्यमंत्री सहायता निधीतून ऑक्टोबर २०२० पासून अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेतला.

## अल्पसंख्याक महिलांचा बचतगट

अल्पसंख्याक महिला सक्षमीकरणाचेही कार्य विभागाने नेटाने सुरू ठेवलेले आहे. राज्य सरकारच्या अल्पसंख्याक विभाग व अल्पसंख्याक आयोगच्या मदतीने एकूण १० अल्पसंख्याकबहुल शहरांमध्ये (मुंबई-धारावी, चांदिवली, ट्रॉम्बे, ठाणे-भिवंडी, मुंब्रा, कौसा, नाशिक-मालेगाव, औरंगाबाद, परभणी, नांदेड, वाशिम-कारंजा, नागपूर, पुणे व सांगली-मिरज) २०११-१२ पासून आतापर्यंत ते २०१९-२० या कालावधीत तीन हजारांहून अधिक बचतगटांची निर्मिती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक योजनेंतर्गत असणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये 'मायक्रो लाईव्हलीहूड प्लॅन'(एमएलपी) चालू आहेत. यामध्ये शिवणकाम, शेळीपालन, तयार कपडे, मसाले बनवणे या उद्योगांचा समावेश आहे. जवळपास साडेनऊ हजार महिलांना या योजनेद्वारे रोजगार उलपब्ध झाला आहे.



पोषण आहाराचे वाटप करताना सेविका.

केंद्र सरकारतर्फे पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातही महिला आर्थिक विकास महामंडळ साहाय्यक म्हणून भूमिका बजावते व हा प्रकल्प राज्याच्या ३५ जिल्ह्यांतील २५९ शहरांत राबवण्यात येत आहे.

## महिला विकासाच्या योजना

मुली किंवा स्त्रियांच्या अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्यांतर्गत संकटात सापडलेल्या स्त्रियांच्या संरक्षण व पुनर्वसनासाठी संरक्षण गृहे स्थापन करण्यात आली आहेत. तसेच दुसऱ्या कल्याणकारी उपक्रमामध्ये निराधार, आर्थिकदृष्ट्या मागास, परित्यक्ता, विधवा महिलांच्या पुनर्वसनासाठी राज्य महिला गृहे (वसतिगृहे), आधारगृहे, देवदासी पुनर्वसन योजना, स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना व्यक्तिगत व्यावसायिक आर्थिक साहाय्यासाठी साहाय्यक अनुदान, व्यावसायाभिमुख शिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन देण्यासाठी अनुदान, अत्याचारग्रस्त पीडित महिलांसाठी सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र, मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याच्या हेतूने 'माझी कन्या भाग्यश्री' योजना, महिलांकरिता समुपदेशन केंद्र, शेतकरी, शेतमजुरांच्या मुलींच्या शुभमंगल सामूहिक विवाह योजनेकरिता स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान, अनाथालय, महिला स्वीकृती केंद्रे आणि संरक्षित गृहे यामधील निराधार आणि परित्यक्ता विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान आदी योजना राबवण्यात येतात.

एकीकडे महिला सक्षमीकरणाचे ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवत असतानाच अत्याचारपीडित महिलांसाठीही विभागाने योजनांच्या माध्यमातून आधार देण्याचे काम केले आहे आणि सुरू आहे. बलात्कार पीडिता आणि ॲसिड हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांना गंभीर शिक्षा दिली गेली पाहिजे पण त्याचबरोबर पीडित महिलेला मानसिकदृष्ट्या तसेच आर्थिक आधार देणेही गरजेचे आहे. त्यामुळे अशा महिलांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे, वित्तीय साहाय्य देणे, तसेच समुपदेशन, निवारा, वैद्यकीय व कायदेशीर मदत मिळावी, यासाठी मनोधैर्य योजना राबवण्यात येते.

ॲसिड हल्ल्यात एखाद्या महिलेचा चेहरा विद्रूप झाल्यास प्लास्टिक सर्जरी करायची असेल तर सरकारने ठरवून दिलेल्या रुग्णालयात करण्यात यावी. तसेच संपूर्ण खर्च मंजूर करण्याचे आदेश जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरण करेल असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

सक्षम महिला, सुदृढ बालक आणि सुपोषित महाराष्ट्राचे ध्येय गाठण्यासाठी हा विभाग सातत्याने कार्यरत आहे. पण यासोबतच समाजाच्या सर्व स्तरांतून या कार्यात सहकार्य अपेक्षित आहे, त्यातूनच महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य होऊ शकते.

**शब्दांकन : सचिन गाढवे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**केवळ महिलांसाठी धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्याला सर्वात जास्त महिला उपक्रम असलेले राज्य बनवणे, महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे, तांत्रिक, परिचलनात्मक व आर्थिक साहाय्य पुरवून राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सर्वंकष महिला उद्योजक धोरणासह इतर योजनांमधूनही महिलांना आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी शासनाचे सहकार्य घेता येते. गरज आहे ती फक्त उद्योजिका म्हणून पुढे येण्याची...**

अर्चना शंभरकर

# उद्योजिका व्हा!

राज्य शासनामार्फत महिलांसाठी सुरू असलेल्या योजनांची माहिती प्रत्येक महिला उद्योजकांनी घेतली तर इतर राज्यांच्या तुलनेत महिला उद्योजिकांचा आलेख वाढता राहील.

## महिलांसाठी औद्योगिक धोरण

महिला उद्योजिकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना म्हणून हे धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांतर्गत बाजारपेठ विकास व विपणनासाठी साहाय्य पुरवले जाते. व्यावसायिक जागांची उपलब्धता करून दिली जाते. स्पर्धात्मकता वाढवून महिलांच्या उपक्रमांना निधी पुरवला जातो आणि उद्योगवाढीसाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास साधण्यास मदत केली जाते. या योजनेंतर्गत सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना विविध प्रोत्साहनांसाठी सुमारे १०० घटकांनुरूप १९ कोटी एवढ्या रकमेचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.



## महिला उद्योजकांची व्याख्या

एकल मालकी घटकासाठी महिला उद्योजकाचे १००% भागभांडवल असावे. भागीदारी घटकासाठी भागीदारी घटक ज्यामध्ये महिला उद्योजकांचे १००% भागभांडवल असावे. सहकारी क्षेत्रासाठी सहकारी कायद्यानुसार त्या सहकारी संस्थेमध्ये १००% महिला उद्योजकांचाच समावेश असलेली संस्था पात्र राहील. खासगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक, ज्या घटकांमध्ये महिला उद्योजकांचे १००% भागभांडवल असेल अशी कंपनी पात्र राहील. स्वयंसाहाय्यता बचतगट जे नोंदणीकृत असतील आणि ज्यात वरीलप्रमाणे निकष पूर्ण केले असतील. त्याचप्रमाणे ज्या उद्योगांमध्ये किमान ५०% महिला कामगार असतील अशा उपक्रमांना योजनेंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र समजण्यात येते.

## ठळक वैशिष्ट्ये

● सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अतिरिक्त सवलती ● भांडवली अनुदान ● वीजदर अनुदान ● व्याजदर अनुदान ● साहस भांडवल निधी ● कौशल्य विकास ● सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत उच्चप्रमाणात सवलती ● कामगार कल्याण साहाय्य.

पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार कल्याण योजनेतील कंपनीच्या योगदानाच्या ५०% रक्कम अनुदानास पात्र आहे.

**प्रदर्शनांसाठी प्रोत्साहन :** प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपये किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५% रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी तीन लाख रुपये एवढ्या मर्यादेत सवलत देण्यात येते.

**जागांचे आरक्षण :** मॉल/व्यावसायिक केंद्र/बाजारपेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी तसेच रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, चित्रपटगृहे, मंडया इत्यादी ठिकाणी जागा आरक्षित ठेवणे. २५% अधिमूल्य घेऊन ते १० ते १५% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव ठेवण्यात येईल.

**इन्क्युबेशन सेंटर (उबवण केंद्र) :** सार्वजनिक, खासगी, भागीदारी तत्त्वावर

## प्रातिनिधिक यशकथा

### जपानला हातमोजेंची निर्यात

पयोद इंडस्ट्री ही गेली दहा वर्षे सांगली जिल्ह्यातील ग्रामीण अवर्षणप्रवण क्षेत्रामधे युवक व महिलांमध्ये रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढीसाठी काम करत आहेत. कंपनीची सर्व उत्पादने 'हॅण्डग्लोज' जपानमध्ये निर्यात होत असून



देशांतर्गत नामांकित कंपन्यांमध्ये ही उत्पादने पुरवली जात आहेत. उद्योग विभागाकडून 'महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना' (एमएसआय-सीडीपी) च्या अंतर्गत 'हॅण्डग्लोज ॲण्ड सॉक्स क्लस्टर' घोषित केले गेले असून 'ग्रामणी पर्सनल प्रोटेक्टिव्ह ॲण्ड हायजिन प्रोडक्ट फाऊंडेशन' या कंपनीची विशेष हेतू वाहन संस्था (एसपीव्ही) म्हणून नेमणूक केली आहे.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, जत, तासगाव व मिरज तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय प्रवर्गातील १०० महिलांच्या वस्त्रोद्योग, पर्सनल प्रोटेक्टिव्ह, पर्सनल हायजिन प्रॉडक्ट निर्मिती करत असलेल्या महिलांच्या कंपन्या स्टॅण्ड अप इंडिया, मुख्यमंत्री स्वयंरोजगार निर्मिती योजना अशा योजनांच्या सहकार्याने उभ्या राहत असून, त्यांच्या उत्पादनांचे मूल्यवर्धन करता यावे, विविध प्रकारची उत्पादने मार्केटच्या मागणीनुसार विकसित करता यावीत, त्यांच्या उत्पादनांना एकत्रित बाजारपेठेशी जोडता यावे, कच्च्या मालाची सुविधा व साठवण करता यावी यासाठी अद्ययावत समूह सुविधा केंद्र हिंगणगाव ता. कवठेमहांकाळ येथे उभारण्यात येत असून सांगली जिल्ह्यातील वस्त्रोद्योगाशी संबंधित सूक्ष्म व लघू व्यावसायिक या समूह केंद्राचा उपयोग त्यांच्या व्यवसायाच्या वाढीसाठी करतील त्यातून रोजगार निर्मितीबरोबरच ग्रामीण भागामध्ये व्यावसायिक वाढीसाठीचे उबवण केंद्र म्हणूनही या केंद्राचा उपयोग होणार आहे.

### स्वयंदीप : दिव्यांग महिला उद्योजिका

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील मीनाक्षी निकम या स्वतः दिव्यांग आहेत. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी शिलाईचे काम सुरू केले. व्यवसाय मोठा केला. त्यांना आलेल्या अडचणींवर मात केली. त्याच वेळी इतर दिव्यांग महिलांना एकत्रित करून त्यांना शिवण प्रशिक्षण दिले. या महिलांना रोजगार मिळावा म्हणून स्वतः ड्रेपरी व्यवसाय सुरू केला, त्यात काहीच महिलांना रोजगार मिळायचा, महिलांची संख्या वाढली तसे त्यांनी ४० दिव्यांग महिलांसाठी युनिफार्म युनिट सुरू केले, ग्रामीण भागातील अतितीव्र दिव्यांग मुलींसाठी निवासी व्यवस्था म्हणून निवासी केंद्र सुरू केले. या निवासी केंद्रात २० महिला राहू शकतात, त्यांना तिथे मोफत राहणे, खाणे सगळी व्यवस्था होते, तिथेच त्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार दिला जातो.

### शासनाच्या पाठिंब्यामुळे आम्ही खंबीर

जिल्हा उद्योग जळगाव, उद्योग समूहाकडून स्वयंदीपची दखल घेतली गेली आणि स्वयंदीप गारमेंट क्लस्टरला ९ फेब्रुवारी २०१९ रोजी मंजुरी मिळाली. तसेच उद्योगसमूहातील अनेक चांगल्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनही मिळाले. स्वयंदीप क्लस्टरसाठी चाळीसगावच्या एमआयडीसीत २५,००० चौरस मीटर जागा मिळाली. आता बांधकामाची



सुरुवात झाली आहे. आज १०० महिला स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. यात ६० दिव्यांग ४० विधवा महिला आहेत. शासनाच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले आहे.

**- मीनाक्षी निकम,**
अध्यक्ष, स्वयंदीप दिव्यांग
महिला गारमेंट क्लस्टर, चाळीसगाव

उबवण केंद्र स्थापन करण्यासाठी जमीन वगळून प्रकल्प खर्चाच्या ७५% रक्कम (कमाल पाच कोटी रुपये) पर्यंत प्रोत्साहन देण्यात येते.

**पुरस्कार व कौतुक :** माहिती तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्तमतेसाठी महिला उद्योजकांना वेगवेगळ्या संवर्गामध्ये पुरस्कार देण्यात येतात. लुबिना शहापूरवाला, सह-संस्था पिकामे. मस्तांग सॉक्स आणि ॲक्सेसरिज. अंकिता श्रॉफ, संस्थापक मे. एस.ए.व्ही. केमिकल्स प्रा. लि., पुणे. अर्चना गोविंद झा, प्रोप्रायटर मे. जी. एस. इंडस्ट्रिज सिन्नर, नाशिक. कल्पना संजय मलानी, प्रोप्रायटर मे. अक्षय उद्योग, औरंगाबाद. भावना जनबंधू, व्यवस्थापकीय संचालिका बीजेकलर एन पॅटर्न, नागपूर यांना कामगिरीबाबत राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

## ‘बांबू वुमन ऑफ महाराष्ट्र’

‘ती’ मूळची ग्रामीण भागातील, वीटभट्टी कामगाराच्या घरात जन्म, बारावीपर्यंत शिक्षण. लग्नानंतर पतीसोबत तीन वर्षाच्या बाळाला घेऊन चंद्रपूर शहरातल्या बंगाली कॅम्प झोपडपट्टीत राहत असताना राज्य शासनाच्या बांबू प्रशिक्षण योजनेची माहिती मिळाली. लहान बाळाला सोबत घेऊन चंद्रपूर येथील बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रात ७० दिवसांचे बांबू आर्टचे प्रशिक्षण पूर्ण केले. बांबूच्या पारंपरिक कलाकुसरीला कल्पनाशक्तीच्या जोरावर नवीन प्रयोगातून विविध वस्तूंच्या कलाकृती तयार होऊ लागल्या. हळूहळू बांबू कारागिरी आकार घेऊ लागली. शासनाच्या नागपुरातील महालक्ष्मी सरस प्रदर्शनात त्यांना १० दिवस संधी मिळाली. ‘ती’ने बांबूपासून बनवलेल्या पाईनॅपल लॅम्प, ज्वेलरी यांची विविध स्तरातून प्रशंसा होऊ लागली. इथून आयुष्याला एक वेगळे वळण लागले.

देशात बांबू राखी लोकप्रिय करून ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवली. बांबूपासून सौंदर्य स्पर्धेकरिता मुकुट बनवून दिले. देशातील विविध राज्यासह परदेशातही तिच्या कलात्मक वस्तूंना मागणी वाढू लागली. नायजेरिया, सिंगापूर, केमन आईसलॅन्ड, इंडोनेशिया, इजिप्त, व्हिएतनाम, इस्रायल, ब्राझिल, थायलॅन्ड, पेरू, चिली, इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान, सिंगापूर, सऊदी, कॅनडा या देशांमध्ये तिच्या कलाकृती पोहोचल्या आहेत. आज ‘महाराष्ट्राची बांबू वूमन’ म्हणून जागतिक स्तरावर मीनाक्षी मनोज वाळके यांनी नावलौकिक मिळवला आहे.

सुरुवातीला त्यांनी तयार केलेल्या वस्तूंची विविध प्रदर्शनीत प्रशंसा होऊन मागणी येऊ लागली, त्यामुळे ‘या व्यवसायात उतरायचे ठरवले. अभिसार इनोवेटिव्ह या स्वतःच्या गृहोद्योगाच्या माध्यमातून ‘ती’च्या वस्तू फेसबुक व इतर माध्यमांवर लोकप्रिय होऊ लागल्या. समाजमाध्यमाद्वारे देश-विदेशातून बांबू कलाकृतीची मागणी येऊ लागली. त्यातून आर्थिक प्रगतीसह प्रोत्साहन तर मिळाले शिवाय बांबू आर्ट वस्तूची मागणी वाढू



लागली. १८-१८ तास काम करूनही वेळ अपुरा पडू लागला. मदतीसाठी ७-८ मुलींना सोबत घेतले. स्वतःसोबत त्यांनादेखील रोजगार उपलब्ध करून दिला. एवढेच नव्हे, तर केई वूड नावाच्या ऑस्ट्रेलिया येथील एका विश्वस्तरीय पर्यावरणवादी महिलेने सौ. मीनाक्षी यांचे पाईनॅपल लॅम्पचे डिझाईन अमेरिकन बांबू सोसायटीच्या फेसबूक पेजवर शेअर करत, ‘बघा! जगभरातील स्त्रिया किती सुंदर काम करत आहेत’असा शेराही लिहिला होता. पर्यावरणाशी संबंधित दिल्ली येथील जागतिक दर्जाच्या ‘मिस क्लायमेट’ सौंदर्य स्पर्धेत बांबूचे १६ मुकुट बनवून दिले व एक इतिहास रचला.

दरम्यान जागतिक बांबू संघटनेच्या ब्रॅण्ड ॲम्बेसिडर रिबेका रिबन्स, निर्मला चोंगथाम आणि साउथ एशिया बांबू फाऊंडेशनचे कामेश सलाम, केफ्रीचे मुख्य संशोधक डॉ. इ.एम. मुरलीधरन, यांसारख्या मंडळींनी त्यांच्या कामाची दखल घेऊन प्रोत्साहन दिले. त्यातून आत्मविश्वास मिळाला आणि अवघ्या एका वर्षात त्यांच्या स्टार्ट अपला देशातील २० शिखर स्टार्टअपमध्ये नाव मिळाले. नवी दिल्लीच्या शक्ती फाऊंडेशनने हा सन्मान मीनाक्षी यांना दिला. महिला सक्षमीकरणासाठी दिल्ली येथील मानवाधिकार संघटनेने त्यांना ‘राष्ट्रीय नारी शक्ती सन्मान पूरस्कार’ देऊन गौरवले. दूरदर्शन केंद्रानेदेखील सखी सह्यांद्री कार्यक्रमात ८ डिसेंबर २०२० रोजी त्यांची एक तासाची मुलाखत प्रसारित करून त्यांचे कार्य जनसामान्यापर्यंत पोहोचवले आहे.

आपल्या परिश्रमाच्या जोरावर देश-विदेशात आपल्या नावाचा डंका वाजत असलेल्या ‘श्रीमती वाळके’ या नम्रपणे सांगतात की, बांबू कारागिरीची कोणतीही पार्श्वभूमी नसताना केवळ शासनाच्या बांबू प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतल्याने व ‘मी करू शकते’ हा आत्मविश्वास बाळगून काम करत असल्याने आज मी गरिबी आणि बेरोजगारीच्या खाईतून बाहेर निघाले. माझ्यासारख्या शेकडोंना शासनाच्या या प्रशिक्षण योजनेचा मोठा आधार मिळाला आहे. श्रीमती वाळके यांची आंतरराष्ट्रीय भरारी इतर महिलांनादेखील नक्कीच प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

**– गजानन जाधव,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर

## औद्योगिक समूह विकास

राज्यातील सूक्ष्म व लघू उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघू उपक्रम - समूह विकास योजना व राज्य शासनाच्या औद्योगिक समूह विकास योजना या दोन योजनांची अंमलबजावणी उद्योग संचालनालयामार्फत राज्यात केली जात आहे. या योजनांतून सूक्ष्म व लघू उपक्रमाचा सर्वांगीण विकास व वाढीकरिता क्षमता वृद्धी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायिक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्रांतर्गत (सीएफसी) संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामायिक जलनिस्सारण केंद्र, सामायिक प्रक्रिया केंद्र इ. बाबीचा समावेश होतो.

महिला उद्योजकांच्या पात्र उद्योगांची किमान १० समूह

विकास केंद्रे स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ९०% रक्कम अनुदान रूपाने साहाय्य म्हणून राज्य शासनामार्फत देण्यात येते.

राज्य औद्योगिकसमूह विकास योजनेंतर्गत मंजुरीप्राप्त १७४ औद्योगिक समूह प्रकल्पांपैकी १७ औद्योगिक समूह प्रकल्प हे १००% महिला प्रवर्गातील उद्योगघटकांचे असून, त्याचा लाभ सुमारे १२६६ सूक्ष्म उद्योग घटकांना होत असून, या प्रकल्पांना आजपर्यंत ३.४२ कोटी रुपये इतकी रक्कम राज्य शासनाने अनुदानाच्या स्वरूपात वितरित केले आहे.



यात रायगड जिल्ह्यातील म्हसाळे, ठाणे येथील भिवंडी, अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, जळगाव जिल्ह्यातील जामनेर, नाशिक जिल्ह्यातील तेहरे, उस्मानाबाद येथील भूम आणि बीड जिल्ह्यातील गारमेंट क्लस्टर लातूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील वडगाव येथे स्पाईसेस क्लस्टर, सांगली येथील ग्लोव्हज क्लस्टर आणि औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणी साडी क्लस्टर याचा समावेश आहे.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात होत असणाऱ्या व्यापक गुंतवणुकीमुळे सूक्ष्म व लघू उद्योजकांसाठी पूरक उद्योग व्यवसायाच्या अनेक संधी विविध क्षेत्रात उपलब्ध होत आहेत. यास अनुसरून राज्यातील होतकरू युवक/युवतींसाठी राज्याची सर्वसमावेशक स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमइजीपी) या योजनेस राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. याअंतर्गत सेवा क्षेत्रातील व कृषिपूरक उद्योग प्रकल्पांसाठी प्रकल्प मर्यादा १० लाख रुपये तसेच उत्पादन क्षेत्रांतील प्रकल्पासाठी प्रकल्प मर्यादा ५० लाख रुपये इतक्या गुंतवणुकीसाठी पात्र आहेत. राज्य शासनाकडून प्रकल्प मंजुरीच्या १५ ते ३५ टक्के इतके आर्थिक साहाय्य हे अनुदान स्वरूपात उपलब्ध करण्यात येते. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेत लाभार्थ्यांचे स्व:गुंतवणूक ५ ते १० टक्के, बँक कर्ज ६० ते ८० टक्के व राज्य शासनाने अनुदान १५ ते ३५ टक्के याप्रमाणे सहभाग असतो. यात किमान ३० टक्के महिला लाभार्थी असावेत, असे योजनेचे स्वरूप आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमास महिलांचा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. आतापर्यंत ६ हजार ६२३ एकूण मंजूर अर्जांपैकी सुमारे ५० टक्के अर्ज महिला उमेदवारांचे आहेत. यात फूड प्रोसेसिंग अ‍ॅण्ड बेव्हरेजेस, टेक्सटाइल इंडस्ट्रिज, ग्रो प्रोसेसिंग, फॅब्रिकेशन, पोलिमेर अ‍ॅण्ड कॅमिकल बेस, डेरी अ‍ॅण्ड बाय प्रोडक्ट, स्टिल/वुडन फर्निचर, प्लास्टिक प्रोजेक्टस/रबर प्रोजेक्टस, पेपर प्रोजेक्टस, इलेक्ट्रॉनिक/इलेक्ट्रिक बेस, प्रिंटिंग/डिजिटल प्रिंटिंग, फोरेस्ट अ‍ॅण्ड मिनरल्स, हॅन्डलूम, लेदर अ‍ॅण्ड फूट वेअर प्रोजेक्टस, ऑटोमोबाईल, ऑईल अ‍ॅण्ड सोलवेंट एक्सट्रॅक्शन, लाईट इंजिनिअरिंग प्रोजेक्टस, पॅकेजिंग, जेम्स अ‍ॅण्ड ज्वेलरी, फॅशन डिझायनिंग, हॅण्डीक्राफ्ट, फार्मासिटिकल, आयटी/आयटीइएस, इंटेरिअर डिझायनिंग, ब्युटी अ‍ॅण्ड वेलनेस, कॅटरिंग, मिसलेनिअस प्रोजेक्टस अशा विविध ३२ प्रकारच्या सेक्टर्सचा अंतर्भाव आहे.

## नवउद्योजकांना प्रशिक्षण

नवउद्योजकांना आणि नावीन्यपूर्ण स्टार्टअप्सना आवश्यक पायाभूत सुविधा आणि पूरक वातावरण मिळावे, यासाठी देशात प्रथमच राज्य शासन जागतिक दर्जाचे इन्क्युबेशन केंद्र स्थापन करणार आहे. यासाठी न्यूयॉर्क येथील कॉर्नेल विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय विद्यापीठासोबत करार करून इन्क्युबेशन केंद्र स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. यात महिला उद्योजकांसाठी ३० टक्के राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मदतीने उद्योजकीय प्रशिक्षणासाठी राज्याची शिखर संस्था अस्तित्वात येत आहे. या संस्थेच्या माध्यमातूनही राज्यातील उद्योजकांना प्रशिक्षण मिळणार आहे. राज्यातील सुमारे साडेतीन हजार महिला उद्योजकांना एकाच वेळी प्रशिक्षण देण्यासाठी ही संस्था सक्षम असणार आहे.

शासनाच्या वतीने महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येते. महिला उद्योग धोरणातून १०० उद्योग उभे राहिले आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून सुमारे साडेतीन हजार महिलांनी फायदा घेतला आहे. १७ समूह प्रकल्प महिला उद्योजिकांनी उभे केले आहेत. कोरोनासारख्या संकटामुळे अनेक उद्योगांवर परिणाम झाला आहे. यात महिला उद्योजिकांच्या व्यवसायावरही परिणाम झाले आहेत. महाराष्ट्र हे उद्योगांसाठी सातत्याने आघाडीवर असलेले राज्य आहे, असे असले तरी महिला उद्योजकांचा प्रतिसाद अजूनही अल्प आहे. महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी उद्योग धोरणात काही बदल प्रस्तावित करण्यात येत आहेत. प्रशिक्षणाचे प्रमाण वाढवण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती घेऊन जास्तीत जास्त महिलांनी पुढे येणे आवश्यक आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला नागरी पुरस्कारांची घोषणा केंद्र शासनातर्फे झाली. यात पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या महाराष्ट्रातील दोन महिलांची नावे अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. एकीने समाजाशी लढा देत समाजात आपले स्थान निर्माण करत जगण्याची नवी दिशा निर्माण केली, तर दुसरीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी उद्योगाची निर्मिती केली. सिंधुताई सकपाळ यांनी सामाजिक कार्यातून अनाथांना मायेचा आधार दिला, तर जसवंतीबेन जमनादास पोपट यांनी महिला गृहउद्योग स्थापन करून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा मार्ग दाखवला.**

# कर्मयोगिनी

**राजेंद्र सरग**

## 'अनाथांची माय'

लोकांसाठी जगले की संपूर्ण जीवनाचे सोने होते. माया, प्रेम दिले की परत माया आणि प्रेमच मिळते, याची शिकवण सिंधुताई सकपाळ यांनी आपल्या जगण्यातून दिली आहे. अनाथ म्हणून हिंडणाऱ्या मुलांवर मायेचा पदर धरणाऱ्या सिंधुताई या अनाथांची मायच बनून गेल्या आहेत. पद्मश्री या नागरी पुरस्काराने सन्मानित होत असलेल्या सिंधुताईंनी संघर्ष करता करता अलौकिक कार्य करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.



'अनाथांची माय' म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या माई उर्फ सिंधुताई सपकाळ यांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला. माईंना यापूर्वी अनेक पुरस्कार, सन्मान मिळालेत. पण 'पद्मश्री' पुरस्काराने गेल्या ४७ वर्षांतील सामाजिक कार्याची पोहोच मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सिंधुताई सपकाळ म्हणतात, पोटाची भूक आणि माझी लेकरं हे सारं आठवायला लागलं. कुठून कुठपर्यंत आले, मला बराच संघर्ष करावा लागला. या संघर्षाने मला जगायला शिकवले. मी कधीच स्वत:साठी जगले नाही. मी कधीही कल्पना केली नव्हती की मी इथपर्यंत पोहोचेन. पोटाची भूक माझी प्रेरणा होती. एवढी भूक लागायची की, रस्त्यावरचे दगड चावून खावेसे वाटायचे. तेव्हा माझ्याप्रमाणेच अवतीभवती अनेक भुकेलेले असल्याचे लक्षात यायचे. त्यांना मी घासातला घास दिला अन् माईचा प्रपंच सुरू झाला. त्यातूनच मी हजारो अनाथांची माय झाले. माझ्या लेकरांमुळेच मी जगू शकले. या लेकरांना आणि त्यांना जगवणाऱ्यांना मी हा पुरस्कार अर्पण करते.

२० वर्षांचे वय आणि हातात दहा दिवसांचे बाळ असताना बेघर झाले. या काळात भीक मागितली, रेल्वेत राहिले, रात्री भीती वाटली की स्मशानात जाऊन राहायचे. ते माझ्यासाठी सर्वात सुरक्षित ठिकाण होते. या काळात सगळ्या जगाचा फार राग आला होता. माझ्या वडिलांना रडत बसलेले कधीही आवडायचे नाही. ते नेहमी म्हणायचे, 'लढायला शिका, रडत बसू नका'. तीच ऊर्जा माझ्यामध्ये निर्माण झाली. अंगावर संकटे कोसळली, तर त्यावर पाय देऊन उभे राहा. एका रात्रीची वाट पाहा, उद्याचा दिवस तुमचा आहे.

### शिक्षण सुटले, विवाह झाला

सिंधुताई सपकाळ यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील नवरगाव येथे १४ नोव्हेंबर १९४८ रोजी झाला. नको असताना मुलगी झाली म्हणून तिचे नाव चिंधी ठेवले. त्यांचे वडील अभिमान साठे गुरे वळायचे काम करायचे. गाव लहान असल्याने तेथे सुविधांचा अभाव होता. घरची गुरे राखायला म्हणून रोज सकाळी बाहेर पाठवायचे आणि त्या शाळेत जाऊन बसायच्या. मुळच्याच बुद्धिमान असल्या तरी जेमतेम मराठी शाळेत चौथीपर्यंत शिकता आले. त्यांचा विवाह वयाच्या नवव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाला. घरी प्रचंड सासुरवास होता.

### पहिला संघर्ष

१८व्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता-काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. त्या हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. या लढ्यामुळे दुखावलेल्या दमडाजीने सिंधुताईंच्या नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण केला. त्यामुळे पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना तिच्या नवऱ्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांची कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली.

परभणी-नांदेड-मनमाड रेल्वे स्टेशनांवर सिंधुताई भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण 'लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल' म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. सिंधुताई दिवसभर भीक

## लज्जतदार उद्योजिका

जसवंतीबेन जमनादास पोपट हे नाव आहे महिलांना आधार देणाऱ्या उद्योजिकेचे. महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाच्या चवीला आणखी लज्जत आणणाऱ्या गृहउद्योजिकेचे. कमी भांडवलात उद्योग उभा करता येतो, दर्जाशी कायम प्रामाणिक राहून उद्योग वाढवता येतो हे सांगणाऱ्या एका कर्मयोगिनीचे. भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरव करून महिला उद्योगाचाच सन्मान झाला आहे. ज्या लिज्जत पापडाने गरीब-श्रीमंत असा भेदाभेद न करता सर्वांच्याच जिभेवर आपली चव रेंगाळून ठेवली आहे, त्या उद्योगाची सुरुवात अवघ्या ८० रुपयांपासून झाली आहे. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. महिला सबलीकरणात श्रीमहिला गृहउद्योगाने केलेले कार्य अतुलनीय असेच आहे.

एका सामाजिक कार्यकर्त्याकडून ८० रुपये उधार घेऊन जसवंतीबेन यांनी आपल्या सहा मैत्रिणींना एकत्र घेऊन हे साम्राज्य उभे केले आहे.



### मैत्रिणींची सुरुवात

श्री महिला गृहउद्योगाची सुरुवात १९५६ मध्ये झाली. जसवंतीबेन यांनी आपल्या गिरगाव परिसरात राहणाऱ्या सहा मैत्रिणींच्या साहाय्याने या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. या सर्वांना हवा होता आर्थिक आधार, घर चालवण्यासाठी हातात थोडे पैसे पण प्रामाणिक कार्य करणाऱ्यांना ऊर्जा मिळत राहते तसेच यांच्याबाबतीत झाले. त्यांनी केलेल्या पापडाला खूपच मागणी वाढली आणि मग त्याचा विस्तार होत गेला. आज हे पापड संपूर्ण देशात लोकप्रिय झाले आहेत.

७ मैत्रिणींनी सुरू केलेला पापड व्यवसाय आज ४२,००० स्त्रियांना रोजगार देतो आहे. लिज्जत पापडच्या ६० च्या वर शाखा आहेत. देशभर हा पापड विकला जातो. एवढंच नाही, तर इंग्लंड, अमेरिका, सिंगापूर, थायलंड, नेदरलँड आदी देशांमध्ये निर्यातही होतो.

मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. पण तिथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनीच २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याने त्यांच्या लक्षात आले की, तिथे कायम राहता येणार नाही.

### मुलांच्या बनल्या आधार

दरम्यान, सिंधुताईंनी समाजातील गरीब, कष्टकरी मुलामुलींची हलाखीची परिस्थिती पाहिली. मुळातच कनवाळू असलेल्या ताईंनी या अनाथ मुलांना आधार देण्यास सुरुवात केली. अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. येथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाते. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील, यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवकयुवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत.

### संस्थांचा विस्तार

सिंधुताईंनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत. बालनिकेतन हडपसर, पुणे, सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा, अभिमान बाल भवन, वर्धा, गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा (गोपालन), ममता बाल सदन, सासवड, सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे.

सिंधुताईंनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने परदेश दौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या वक्तृत्वाने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे, या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाऊंडेशन संस्थेची स्थापना केली आहे.

सिंधुताईंना असंख्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा 'कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा 'अहिल्याबाई होळकर पुरस्कार', मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, सोलापूरचा डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार, 'सह्याद्रीचा हिरकणी पुरस्कार', पुणे विद्यापीठाचा 'जीवन गौरव पुरस्कार', 'मदर तेरेसा पुरस्कार', 'नारीशक्ती पुरस्कार'.

### मोठ्या पडद्यालाही मोह

सिंधुताईंच्या जीवनावर आधारलेला 'मी सिंधुताई सपकाळ' हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला आहे. त्यात तेजस्विनी पंडित यांनी सिंधुताईंची भूमिका साकारली आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या जीवनावर भार्गव फिल्म्स ॲण्ड प्रॉडक्शनचा 'अनाथांची यशोदा' या नावाचा अनुबोधपट काढण्यात आला आहे. सिंधुताईंनी अनेक खडतर प्रसंगांना तोंड देत हजारो अनाथ मुलांचा सांभाळ केला आहे. त्यांचे हे कार्य प्रेरणादायी आहे.

जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

**कोणत्याही समाजाच्या उन्नतीचे मापदंड त्या विकासक्षम समाजातील स्त्रिया किती सक्षम आहेत, यावर केले जाते. ज्या समाजात स्त्रिया सक्षम असतात, तो समाज अधिक सुदृढ आणि विकसनशील असतो. सत्तेतील वाटा हा त्याचा प्रमुख एक मापदंड आहे. पंचायतराज व्यवस्थेने स्त्रियांना केवळ पुरुषांच्या बरोबरीने आणले नाही, तर त्यांच्यासाठी नेतृत्वाची संधी निर्माण केली.**

# कारभारणी

**इर्शाद बागवान**

पंचायतराज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण गावातील शेवटच्या घटकापर्यंत झाले आहे. राज्यातील ग्रामीण भागाकडे वळून पाहिले असता विकासविषयक अनेक देदीप्यमान घडामोडी आपल्याला दिसून येतात. पंचायतराजमुळे गावातील सामान्यातील सामान्य माणूस शासन प्रक्रियेत सहभागी होऊ लागला आहे. त्याला अधिकार प्राप्त झाले आहेत. पंचायत राज व्यवस्थेचे हे फार मोठे यश आहे. पण या सर्वांमध्ये प्रभावी निर्णय ठरला तो पंचायतराज व्यवस्थेत महिलांना देण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण स्थानाचा. महाराष्ट्रात पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के जागा राखीव आहेत. या माध्यमातून महिलांना शासन व्यवस्थेत आणि निर्णय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. महिला गावाच्या कारभारात सहभागी होऊ लागल्या. चूल आणि मूलमध्ये अडकलेल्या महिलांनी घराचा उंबरठा ओलांडला, त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि महिलांनी मिळालेल्या या संधीचे सोने करून आणि त्याच्याही पुढे जाऊन इतर विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. राज्यात आणि देशात यामधून महिला सक्षमीकरणाची क्रांती घडून आली असून याचे सर्वस्वी श्रेय पंचायतराज व्यवस्थेला जाते.



## लोकशाहीचे विकेंद्रीकरण

राज्यात मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता इतर ३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदा आहेत. तसेच ३५१ पंचायत समित्या असून, सुमारे २८ हजार ग्रामपंचायती आहेत. महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्यानंतर 'खेड्याकडे चला' हा मूलमंत्र देशाला दिला. ग्रामविकासाचा कळस गाठण्यासाठी देशात पंचायतराजची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीखाली आणि वसंतराव नाईक यांच्या संकल्पनेतून पंचायतराजची आखणी झाली. आज पंचायतराजमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. लोकशाहीचे विकेंद्रीकरण ही महत्त्वाकांक्षी संकल्पना महाराष्ट्राने स्वीकारली आहे. रयतेचे राज्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे राज्य अर्थात 'मिनी मंत्रालय' या नावाने हा कारभार प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक महत्त्वाचे अधिकार हस्तांतरित करण्यात आले आहेत. सरकारने विविध महत्त्वाच्या विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींकडे केले आहे. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सरपंचापासून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षापर्यंत विविध पदांवर काम करणाऱ्या महिला आपले प्रभूत्व, निर्णयक्षमता, कणखरपणा आणि विकासकामात आपली भूमिका सिद्ध करून दाखवत आहेत.

## खेड्यांच्या विकासाला चालना

'भारत हा खेड्यांचा देश आहे आणि ही खेडीच आपल्या देशाचे भविष्य आहे', असे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते. म्हणूनच त्यांनी नेहमीच ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेवर भर दिला. पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडवणे शक्य झाले. ग्रामविकासाला चालना मिळाली. राज्यातील ५० टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार महिला सक्षमपणे चालवत आहेत. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही प्रणाली राबवणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते. या सर्वात मोठ्या लोकशाहीला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाहीच्या लहानशा प्रक्रियेतून बळकटीच मिळाली आहे. यामध्ये राज्यातील महिला पदाधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय देशाच्या सामाजिक विकासात क्रांतिकारी ठरला आहे. चूल आणि मूलमध्ये अडकलेल्या महिलांनी घराचा उंबरठा ओलांडला आणि गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे धोरण ठरवण्यामध्ये त्यांचा सहभाग मिळू लागला. महिलांचे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरण होण्यामध्ये या निर्णयाने क्रांतिकारी अशी भूमिका बजावली आहे. आरक्षणातून पुढे आलेल्या अनेक महिला पुढे स्वकर्तृत्वावर निवडणुका लढवू लागल्या आहेत आणि खऱ्या अर्थाने त्या समाजाच्या मूळ प्रवाहात सहभागी होऊ शकल्या आहेत.

## पुरुषांची मक्तेदारी मोडीत

७३व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ जागा राखून ठेवण्यात आल्या होत्या. पण महाराष्ट्र शासनाने याच्याही पुढे जाऊन २४ मार्च २०११ रोजी पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, सरपंचापासून ते या त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमध्ये विविध समित्यांच्या सभापती, सदस्य म्हणून आज महिला सक्षमपणे काम करू लागल्या आहेत. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या विविध बैठका, सभा गाजवू लागल्या आहेत. या महिलांचा हुरूप इतर महिलांसाठीही स्फूर्तिदायी ठरला आहे. त्यामुळे राजकारणाबरोबरच

## महिलाच कारभारी

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमध्ये सदस्य संख्या १ हजार ९५५ इतकी आहे. त्यापैकी ९७८ महिला सदस्या जिल्हा परिषदांचे काम यशस्वीरीत्या चालवत आहेत. त्याच पद्धतीने ३५१ पंचायत समित्यांमधील ३ हजार ९१० सदस्यांपैकी १ हजार ९५५ महिला सदस्य आहेत. तसेच २७ हजार ८९६ ग्रामपंचायतींच्या १ लाख ९७ हजार ३३८ सदस्यांपैकी सुमारे ९८ हजार ६६९ सदस्य या महिला आहेत.

राज्यात नुकत्याच १४ हजार ग्रामपंचायतींमध्ये निवडणुका पार पडल्या. यामध्येही महिला मोठ्या संख्येने म्हणजे ५० टक्के जागांवर सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. आरक्षणानुसार अनेक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदी महिला विराजमान झाल्या आहेत. काही गावांनी तर स्वयंस्फूर्तीने सर्वच सदस्य पदांवर महिला निवडून आणल्या आहेत. गावाचा १०० टक्के कारभार महिलांच्या हाती देण्यात आला आहे. पुढील पाच वर्षात आता या महिला आपल्या गावचा गाडा सक्षमपणे हाकणार आहेत. निवडून आलेल्या या सर्व ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमान्वये सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांची जबाबदारी व कर्तव्ये, ग्रामपंचायतीचे कामकाज, ग्रामपंचायत लेखासंहिता, ई-पंचायत, जलसाक्षरता, वेळेचे व्यवस्थापन, शाश्वत विकासासाठी गावसंस्था नियंत्रण, शासनाची ध्येयधोरणे, ग्रामविकासाच्या विविध योजना इत्यादी विषयांचा प्रशिक्षणात समावेश आहे.

इतरही अनेक क्षेत्रांमध्ये, ज्यावर पूर्वी फक्त पुरुषांची मक्तेदारी होती, अशा अनेक क्षेत्रात आता महिला सक्षमपणे काम करताना दिसत आहेत. पंचायतराजमध्ये मिळालेल्या संधीचा लाभ घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात महिलांनी आपले कर्तृत्व स्वबळावर सिद्ध केले आहे. सुरुवातीला त्यांना प्रशासन समजून घेण्यासाठी पती, नातेवाईक किंवा पुरुष सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागत असे. पण आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला स्वबळावर प्रशासनाचा गाडा चालवताना दिसत आहेत. ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार, सामाजिक समस्या, शासनाच्या विविध योजना, महिला सबलीकरण, पंचायतराज कार्यपद्धती, ग्रामपंचायत कायदा, त्यातील नियम, ग्रामपंचायतींचे अर्थव्यवस्थापन अशा विविध विषयांवर महिला सदस्यांना प्रशिक्षणही देण्यात येते. या माध्यमातून ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणात एक सुप्त क्रांती घडून आली आहे. घराचा उंबरठाही न ओलांडणाऱ्या महिला आता गावाच्या, तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या कारभारणी झाल्या आहेत.

## महिला ग्रामसभांना महत्त्वाचे स्थान

ग्रामसभा हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभेला व्यापक अधिकार दिल्याने पंचायतराज व्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे. या सुधारणेचा मुख्य उद्देश हा अधिकाराचे विकेंद्रीकरण व ग्रामपातळीवर पंचायत आणि ग्रामसभा यांना जास्तीत जास्त अधिकार प्रदान करणे हा आहे. यामुळे महिलांसह गावकऱ्यांना विकासाच्या कामांमध्ये प्रभावीपणे सहभाग घेता येतो आणि गावाच्या कारभारावर नियंत्रण करता येते. गावाचा सामाजिक, आर्थिक विकास आराखडा बनवणे आणि गावपातळीवर राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्याची जबाबदारी ग्रामसभेची आहे. गावाच्या विकास आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी महिलासभा घेण्याची कायद्यामध्ये तरतूद केली आहे. ग्रामसभेत महिलांची उपस्थिती वाढावी, महिलांच्या विकासाचे प्रश्न चर्चिले जावेत ही महिला सभेच्या आयोजनामागची भूमिका आहे. त्यानुसार प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिलांची सभा बोलवण्यात येते. या सभेमध्ये महिलांनी घेतलेले निर्णय, चर्चा, विषय हे दुसऱ्या दिवशी होणाऱ्या मुख्य ग्रामसभेमध्ये प्राधान्याने चर्चेला घेतले जातात. महिला सभेनंतर होणाऱ्या मुख्य ग्रामसभेलासुद्धा महिलांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

## महिलांच्या सक्षमीकरणावर भर

राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींमध्ये निवडून आलेल्या महिला फार प्रभावीपणे काम करीत आहेत. नुकत्याच झालेल्या १४ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये महिला मोठ्या संख्येने निवडून आल्या आहेत. त्यांना ग्रामविकास विभागामार्फत प्रोत्साहन व ग्रामविकासविषयक विविध विषयांचे प्रशिक्षण देण्यात येईल. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटांचे उमेद अभियानही राज्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. यामधून अनेक महिला या यशस्वी उद्योजिका म्हणून पुढे येत आहेत. ग्रामविकास विभागाने नुकताच जिल्हा परिषद उत्पन्नातून महिला व बालकल्याण समित्यांमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी निवासाकरिता सात हजार रुपये, तर जिल्ह्याच्या ठिकाणी निवासाकरिता दहा हजार रुपये एकरकमी देण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुलींना देण्यात येणाऱ्या ज्युडो कराटे, योगा व जीवन कौशल्यविषयक प्रशिक्षणाच्या अनुदानामध्ये वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सातवी ते बारावी उत्तीर्ण मुलींना संगणकाबाबतचे ज्ञान, कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनेसही प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांना विविध साहित्य पुरवणे या योजनेंतर्गत पिठाची गिरणी, सौर कंदील, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन तसेच प्रचलित परिस्थितीनुसार पल्वराईझर (ओले/सुके दळण यंत्र), पशुधन संगोपन ज्यात शेळीपालन, कोंबड्यापालन, छोटे किराणा दुकान, मिनी दाल मील, घरगुती फळप्रक्रिया उद्योग, घरगुती मसाला उद्योग उत्यादी साहित्य पुरवण्यास मान्यता देण्यात आली आहे. अशा सर्व माध्यमांतून ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या विकासास राज्य शासनामार्फत चालना देण्यात येत आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

**अवघ्या जगाला विळखा घातलेल्या कोरोनाचा कहर आणि भीती आता काहीशी कमी झाली आहे. मात्र रुग्णदर आणि मृत्युदर वाढीच्या आणि लॉकडाऊन काळात भीतीच्या वातावरणातही महिलांच्या खंबीरपणाचे दर्शन पुन्हा एकदा महाराष्ट्राने जगाला दाखवून दिले. कोविड रुग्णालयातील परिचारिकेपासून ते प्रशासनातील महिला अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी तारेवरची कसरत करून 'ड्यूटी फर्स्ट' म्हणत कर्तव्याला प्राधान्य दिले. वेळप्रसंगी आपल्या कुटुंबापेक्षा त्यांनी रुग्णसेवेला प्राधान्य दिले. कोविड काळात कर्तव्य बजावणाऱ्या महिलांच्या प्रातिनिधिक यशकथा...**

# युद्ध आमुचे सुरू...

## उत्कृष्ट कामगिरी

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषदेने काटेकोर प्रयत्न केले. त्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव जिल्ह्यात नियंत्रणात राहिला. कोरोनाच्या संकट काळात नांदेड जिल्हा परिषदेने उत्कृष्ट कार्य करून दाखवले. यामागे परिश्रम होते जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती मंगाराणी सुरेशराव अंबुलगेकर यांचे. तर त्यांना साथ लाभली मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची.



**मंगाराणी अंबुलगेकर,**
अध्यक्षा, जिल्हा परिषद, नांदेड

जिल्हा परिषद व आरोग्य विभागाच्या यंत्रणेच्या सहकार्याने योग्य नियोजन केले. पालकमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कोरोनाच्या नियोजनासाठी वेळोवेळी विशेष ऑनलाईन बैठका, नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी श्रीमती अंबुलगेकर यांनी पुढाकार घेतला. सर्वत्र कोरोनाची भीती असतानाही त्या वेळोवेळी नागरिकांच्या मदतीसाठी धावून गेल्या.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात लॉकडाऊन घोषित झाल्यानंतर श्रीमती अंबुलगेकर यांनी सर्व यंत्रणेच्या समन्वयाने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. कोविड नियोजनासाठी जिल्हा, तालुका व गावस्तरावर कोविड टास्क फोर्स कमिटी व क्वारंटाइन सेंटर्सची स्थापना केली. तसेच प्रत्येक गाव, शहर व जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात आरोग्य तपासणी पथके तयार करून बाहेरून येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी करून त्यांना पुढील १४ दिवस विलगीकरण कक्षात ठेवण्यात येत होते. गरोदर माता, लहान मुले व ६० वर्षांवरील आजारी व्यक्ती यांची विशेष काळजी घेतली. याशिवाय दररोज रोजंदारीवर अवलंबून असलेले कामगार, प्रवासात अडकलेले प्रवासी यांच्या मानसिक स्थैर्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी योग शिबिरे आयोजित केली.

जिल्ह्यातील कोविड परिस्थितीची योग्य माहिती नागरिकांना मिळावी, यासाठी २४ तास हेल्पलाईन कक्ष सुरू करण्यात आले. तसेच माहितीचे बॅनर, डिजिटल बोर्ड, आकाशवाणी व विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात आली. फेसबुक लाईव्ह या समाजमाध्यमाचादेखील उपयोग करण्यात आला. गावोगावी स्थलांतरित व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात आले. ग्रामीण भागात आरोग्य विभागामार्फत कोविड-१९ अंतर्गत कोरोना, सारी, इन्फ्ल्युएन्झाच्या प्रतिबंध उपाययोजनांसाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षणाकरिता आशा, आरोग्य सेवक व समुदाय आरोग्य अधिकारी यांची ३ हजार ६२९ पथकांमार्फत ग्रामीण भागात दैनंदिन सर्वेक्षण करण्यात आले.

या चाचण्यांमुळे नागरिकांमधील भीतीचे वातावरण कमी झाले. श्रीमती अंबुलगेकर यांनी वेळोवेळी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व गावांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. कोविडच्या पार्श्वभूमीवर सर्व शासकीय आरोग्य संस्थांची विशेष मोलाची कामगिरी राहिली आहे. बाधित रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षित डॉक्टर, स्टाफ नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ तसेच सफाई कर्मचारी यांची भरती करण्यात आली.

दरम्यान मायेचा आधार म्हणून सामाजिक दायित्वाच्या नात्याने श्रीमती अंबुलगेकर यांनी लॉकडाऊनमध्ये अडकलेले मजूर तसेच त्यांचे कुटुंबीय यांना धान्यकिट वाटपासह सॅनिटायझर व मास्कचे वाटप केले. नांदेड जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये कोरोनाची परिस्थिती



मास्कचे वाटप करताना नांदेडच्या जिल्हा परिषद अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर व मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

रोखण्यासाठी 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या मोहिमेमध्ये गावस्तरावरील आशा वर्कर व अंगणवाडी कार्यकर्ती यांचा सक्रिय सहभाग मिळाला. जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती अंबुलगेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व उपाध्यक्षा तथा आरोग्य सभापती पद्मा सतपलवार यांनी यासाठी जिल्ह्यात योग्य नियोजन केले. सोशल डिस्टंसिंग, मास्कचा वापर करणे तसेच नियमित साबणाने हात धुणे किंवा सॅनिटायझर वापरणे या त्रिसूत्रीचा काटेकोरपणे अवलंब केला. त्यामुळेच नांदेड जिल्ह्यातील १६०४ गावांपैकी ८२५ गावे कोरोना संसर्गपासून मुक्त राहिली. ग्रामीण भागात जाऊन आपण अधिक जोमाने कोरोना प्रतिबंधात्मक जनजागृती करणार असल्याचे श्रीमती अंबुलगेकर यांनी सांगितले.

**मिलिंद व्यवहारे,** माहिती शिक्षण आणि संवादतज्ज्ञ, नांदेड

## प्रशासनातील संवेदनशील चेहरा

**विस्थापंताचे पुनर्वसन असो की, तंटामुक्त अभियानाची अंमलबजावणी... की संवेदनशील भागातल्या अटीतटीच्या निवडणुका असो... आपल्या कणखर बाण्याने वेगळी ओळख निर्माण केलेल्या, नियोजनपूर्वक प्रशासकीय कामामध्ये ठसा उमटवणाऱ्या ठाणे जिल्ह्याच्या अप्पर जिल्हाधिकारी वैदेही रानडे.**



**वैदेही रानडे,**
अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे

२२ वर्षांच्या प्रशासकीय कामांचा श्रीमती रानडे यांचा प्रदीर्घ आणि सर्वंकष अनुभव कोरोनाच्या जागतिक आपत्तीत जिल्हा प्रशासनाला कोरोना आटोक्यात आणण्यासाठी उपयोगी ठरला. राज्यात ठाणे जिल्ह्यात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडल्यापासून जिल्हा प्रशासनाची यंत्रणा सजग झाली होती. जिल्ह्यातील सहा महापालिका, दोन नगरपालिका, शिवाय ग्रामीण भाग आणि घनदाट लोकसंख्येच्या शहरात कोरोनाला हातपाय पसरायला भरपूर वाव होता. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या नियोजनाची कसोटी होती, जिल्ह्यातील महापालिका स्तरावर कोरोना रुग्णांसाठी चाचण्या, विलगीकरण केंद्रे, जनजागृती ही कामे सुरू होती. त्यासाठी लागणारी यंत्रणा, जागा महापालिकेच्या यंत्रणांकडे होती, मात्र जिल्ह्याच्या विविध भागांतून अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांची जा-ये, अन्य राज्यातील मजुरांची त्यांच्या राज्यात परत जाण्याने कोरोनाचा फैलाव मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता होती. त्यामुळे ग्रामीण भागात कोरोनाचा प्रसार व फैलाव झाला तर तिथे कोरोना उपचार केंद्रासाठी जागा, साधन - सुविधांची उपलब्धता करून देणे हे जिकिरीचे काम होते. त्यामुळे स्थानिक यंत्रणा आणि जिल्हा प्रशासन यांच्या नियोजनाची सांगड घालून आणि त्यात शासनाच्या आदेशानुसार वेळोवेळी सेवा - सुविधा अद्ययावत करण्याचे शिवधनुष्य श्रीमती रानडे यांनी यशस्वीरीत्या पेलले.

कोरोनाच्या काळात परराज्यातील स्थलांतरित मजुरांसाठी जिल्ह्यातून पहिली विशेष रेल्वे भिवंडीतून धावली. मात्र ही रेल्वे धावण्याआधी या मजुरांची नोंदणी, त्यांच्या जेवणाखाण्याची सुविधा, त्यांना आरोग्यविषयक संच देण्यासाठी ठाणे शहर आणि जिल्ह्यात लेबर कॅम्प सुरू करण्यात आले. या सगळ्या नियोजनात श्रीमती रानडे यांनी मोलाची भूमिका बजावली. याशिवाय ई-पास देण्याची जबाबदारीही प्रशासनावरच होती. त्यामुळे या ई-पासपासून खरा गरजू वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांत सुसूत्रता ठेवण्याचे कामही त्यांनी केले. या जबाबदाऱ्यांशिवाय श्रीमती रानडे यांच्यावर जिल्हा प्रशासनाने 'वंदे भारत मिशन' ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली होती. सुरुवातीला कोरोनाचा प्रसार हवाईमार्गे झाला, त्यामुळे 'वंदे भारत मिशन'मध्ये अगदी किरकोळ त्रुटीही अत्यंत महागात पडणारी होती. त्यामुळे प्रशासनात सक्षम असणाऱ्या श्रीमती रानडे यांनी ही जबाबदारी अत्यंत कुशलतेने हाताळली. मात्र, ही जबाबदारी केवळ त्यांनी प्रशासकीय अधिकारी म्हणून हाताळली नाही तर ती हाताळताना ठाणेकरांना त्यांच्यातल्या संवेदनशील अधिकाऱ्याचे दर्शन घडले. कोरोना आपत्तीमुळे परदेशातून येणारे अनेकजण बेरोजगार झाले होते, तर काहींची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. त्यांना त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार सोय करून देण्यासाठी हॉटेल संघटनांशी दरांबाबत चर्चा करणे, परदेशातून आलेल्या या प्रवाशांना साधे पण दर्जेदार जेवण मिळावे, यातही त्यांनी लक्ष घातले, या प्रवाशांच्या प्रत्येक भावनिक, मानसिक समस्येत त्यांना धीर देण्याचे, शक्य ती मदत उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. कोरोनाच्या टाळेबंदीपासून त्यांनी सुट्टी न घेता अव्याहत नियोजनबद्ध काम केले.

### महिला बनल्या उद्यमी

भिवंडीत शरीरविक्रय करणाऱ्या महिलांच्या उपजीविकेचा प्रश्नही कोरोना आपत्तीत त्यांच्या समोर आला. या महिलांना कौशल्य विकास योजनेंतर्गत मेणबत्ती, उदबत्ती यांसारख्या लघुउद्योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधला. या आपत्तीत या महिलांमध्ये सकारात्मक घडलेली बाब अशी की, प्रशिक्षण घेतलेल्या महिलांनी या व्यवसायातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यांचा बचतगटही स्थापन करण्यात आला आहे. आपल्या एका छोट्याशा कृतीने सकारात्मक बदल या महिलांच्या बाबत घडला, याचे मोठे समाधान श्रीमती रानडे यांना आहे.

**मनीषा पिंगळे,** जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

## कर्तव्याला प्राधान्य

**पुण्यात कोरोनाची रुग्णसंख्या अधिक होती. या काळात रुग्णदर व मृत्युदर कमी करण्याबरोबरच रुग्णांना आवश्यक त्या वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्याचे आव्हान प्रशासनासमोर होते. कोरोना प्रतिबंधासाठी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबतच पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त रुबल अग्रवाल यांनीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावत कर्तव्याला प्राधान्य दिले.**

पुण्यात कोरोनाचा पहिला रुग्ण ९ मार्च २०२० ला आढळल्यावर अधिकच्या उपाययोजना राबवण्यावर भर देण्यात आला. विमानतळावर तपासणी यंत्रणा, रुग्णांचा व रुग्णाच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचा शोध, विलगीकरण व अलगीकरण कक्षाची स्थापना, जम्बो कोविड हॉस्पिटलसह अन्य रुग्णालयांमध्ये दाखल रुग्णांना आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार औषधोपचार व प्रतिकारशक्ती वाढवणारा आहार देण्यासाठी प्रयत्न या सर्वांमध्ये श्रीमती अग्रवाल यांचा सक्रिय सहभाग राहिला.



**रुबल अग्रवाल,**
अतिरिक्त आयुक्त,
पुणे महानगरपालिका

कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असताना आणि मृत्युदर वाढत असताना विविध उपाययोजना करण्यात येत होत्या. या उपाययोजना प्रशासनाकडून प्रभावीपणे राबवण्यात आल्या. कोरोना प्रतिबंधासाठी संभाव्य रुग्णांचा शोध, तपासणी आणि उपचार (ट्रेस, टेस्ट आणि ट्रीटमेंट) या त्रिसूत्रीवर भर दिला गेला. त्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळवून देणे सोयीचे झाले. याबरोबरच प्रतिबंधित क्षेत्रे तयार करण्यात आली. या क्षेत्रांमध्ये स्वच्छतेची कडक अंमलबजावणी करण्यात आली. खबरदारीच्या अनुषंगाने १० लाखांहून अधिक मास्कचे नागरिकांना वाटप करण्यात आले.

रुग्णदर वाढत असल्यामुळे शासकीय दवाखान्यांबरोबरच खासगी रुग्णालयांमध्ये उपचार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. पुण्यातील ११ खासगी रुग्णालयांसोबत सामंजस्य करार करून रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये देखील कोरोनावरील उपचार मिळवून देण्यात आले. याबरोबरच खाटांची संख्या वाढवण्यात आली, या सर्व बाबींमुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळणे सोयीचे झाले. लॉकडाऊन काळात पुण्यात अडकलेल्या शेकडो स्थलांतरित मजूर व कामगारांसाठी महानगरपालिकेच्या वतीने तात्पुरती निवारागृहे तयार करून त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. कोणीही उपाशी राहणार नाही याची दक्षता घेण्यात आली. त्याचबरोबर शहरातील त्या-त्या भागातील रुग्णांची अद्ययावत आकडेवारी समजण्यासाठी तसेच रुग्णालयात उपलब्ध खाटांबाबत माहिती कळण्यासाठी संगणक प्रणाली विकसित केली गेली. त्याचबरोबर व्यापक जनजागृती केली गेली. कोविड रुग्णालयांमधील रुग्णांना महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. कोरोनाचा विळखा अधिक घट्ट होत असताना प्रत्येकाच्या मनात धास्ती होती; परंतु कोरोना प्रतिबंधासाठी शासकीय यंत्रणा आटोकाट प्रयत्न करत होती. लोकप्रतिनिधी व सर्वच प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी या कामी अग्रेसर होते. त्यामुळे कोरोना काळात उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेच्या वतीने 'कोविड वॉरियर' म्हणून सत्कार करण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत पालिका कर्मचाऱ्यांच्या साथीने हे सर्व करत असताना कुटुंबाचीही आपल्याला मोठी साथ लाभल्याचे श्रीमती अग्रवाल सांगतात.

'कोरोना परिस्थितीत सकाळी लवकर ते रात्री उशिरापर्यंत काम सुरू होते. त्यामुळे घरी फारसे लक्ष द्यायला वेळ मिळत नव्हता. अशा वेळी पती, आठ वर्षांचा मुलगा आणि ७५ वर्षांची आई या सर्वांनी आपापली भूमिका पार पाडत मला सर्वतोपरी मदत व भक्कम आधार देऊन पूर्णपणे सहकार्य केले. त्यामुळेच मी कार्यालयामध्ये निश्चिंतपणे काम करू शकले,' असे त्या सांगतात. महिला दिनानिमित्त महिला व तरुणींसाठी संदेश देताना त्या म्हणाल्या, 'महिला दिन केवळ एकच दिवस साजरा होण्यापेक्षा अधिकाधिक ज्ञान ग्रहण करून असे यश मिळवा की, येणाऱ्या प्रत्येक दिवशी तुमचा सत्कार व्हावा..येणारा प्रत्येक दिवस तुमचाच असावा!'

– **वृषाली पाटील,** माहिती अधिकारी, पुणे

## कायदा व सुव्यवस्थेबरोबरच जनजागृती

**गुन्हेगाऱ्हांचे वाढणारे प्रमाण कमी करणे, गुन्हेगारांना तडीपार करणे, महिला सक्षमीकरण करणे, गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या समस्या सोडवणे, इत्यादी कामे जोमाने सुरू असतानाच कोरोना परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेसोबतच पोलिसांची प्रतिमा उंचावण्याचे काम नागपूर ग्रामीणच्या अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका नंदकुमार राऊत यांनी केले. त्या सध्या अकोला येथे अपर पोलीस अधिक्षक म्हणून रुजू झाल्या आहेत.**



**मोनिका राऊत,**
अप्पर पोलीस अधीक्षक, अकोला

कोरोनाचा प्रादुर्भाव नागपूर शहर व ग्रामीण भागातही वाढू लागला होता. सुरुवातीला नागपूर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात संसर्ग वाढला. अशा प्रसंगी श्रीमती राऊत यांनी त्यांच्या अधिकारातील ग्रामीण भागातील २२ पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत लोकांमध्ये कोविडबाबत जनजागृतीचे काम सुरू केले. ग्रामीण भागात लोकांना या आजाराचे गांभीर्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागामध्ये प्रत्यक्ष लोकांमध्ये मिसळून जनजागृतीला सुरुवात केली. मास्क वापरणे बंधनकारक केले. नंतर सामाजिक अंतर ठेवणे व त्याचे पालन केले जाईल याची खबरदारी घेतली. तसेच ग्रामीण भागात असलेल्या कामगारांसाठी त्यांनी तीन शेल्टर हाऊस तयार केली आणि त्या शेल्टर हाऊसमध्ये साडेतीन हजार कामगारांच्या जेवणाची सोय केली, तसेच वेळोवेळी बँका, खासगी आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देऊन सामाजिक अंतर पाळले जात आहे की नाही याची खात्री करून घेतली. कोविड-१९ बाबतचे नियम न पाळणाऱ्यांकडून दंडाची वसुलीही केली.

शक्य होईल तेथे कोविडबाबत त्यांनी जनजागृती केली. त्याचाच परिणाम असा झाला की, नागपूर ग्रामीणमध्ये या आजाराचा प्रादुर्भाव खूप कमी राहिला. कर्तव्य बजावताना घड्याळाकडे न बघता समाजाची गरज बघून कायदा व सुव्यवस्थेबरोबरच सर्वसामान्यांची

मदत व जनजागृतीसाठी त्यांनी सदैव पुढाकार घेतला. शिवाय कोरोनाचा संसर्ग दुर्दैवाने कुटुंबीयांना होऊ नये, यासाठीही त्यांनी कटाक्षाने खबरदारी घेतली. कित्येक दिवस घराच्या वेगळ्या खोलीतच त्या एकट्या राहत होत्या. जवळपास वर्षभर त्या घरातील सदस्यांपासून दूर राहिल्या. मात्र घरातील सदस्यही तेवढीच खबरदारी घेत असल्याची खातरजमा केली. एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाला शिकणारी मुलगी व इयत्ता चौथीला असलेल्या मुलाकडेही त्यांना या काळात विशेष लक्ष देता आले नाही मात्र ही जबाबदारी नागपूर खंडपीठातील राज्य माहिती आयोगात कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलले पती नंदकुमार राऊत यांनी पेलली.

पोलिसांना २४ तास ड्युटी करावी लागते. ही नोकरी म्हणजे त्यांचे दुसरे घर. त्यामुळे जबाबदारीच्या पदावर असताना आपल्या सहकाऱ्यांना कोविडची लागण होऊ नये, म्हणून तशी खबरदारीही घेतली. सध्या अकोला येथे कार्यरत असताना हे काम त्या येथेही समर्थपणे पार पाडत आहेत.

**– योगेश वाघमारे**

## कठीण काळाचा सामना



**डॉ. आरती कुलवाल,**
वैद्यकीय अधीक्षक, अकोला

जस जसा कोरोनाचा संसर्ग अकोला जिल्ह्यात होऊ लागला तेव्हापासून आजतागायत जिल्हा स्त्री रुग्णालयात होणाऱ्या सर्व प्रसूती, माता आणि नवजात बालकांच्या आरोग्याचे रक्षण अकोल्याच्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. आरती कुलवाल आणि त्यांचे पथक करत आहेत.

कोरोना काळाता जिल्हा स्त्री रुग्णालयात १२ हजार ७९ प्रसूती झाल्या. प्रसूती झालेल्या मातांपैकी तब्बल १७५ माता या स्वतः कोरोना पॉझिटिव्ह आल्या. मात्र मातांवर कोरोनाचे उपचार होत असताना त्यापैकी एकाही बालकाला कोरोनाचा संसर्ग होऊ दिला नाही, ही अत्यंत मोलाची कामगिरी या खऱ्याखुऱ्या कोरोना योद्ध्या महिला डॉक्टरने करून दाखवली.

आपल्या या अनुभवाबद्दल डॉ. कुलवाल सांगतात की, 'कोरोनाचा काळ हा खूप कठीण काळ, असंच म्हणावे लागेल. हा काळ जसे जगणे कसे असावे हे शिकवून गेला तसाच तो रुग्णालय व्यवस्थापन याबद्दलही खूप शिकवून गेला. जिल्हा स्त्री रुग्णालयात जिल्ह्यातील तसेच संलग्न जिल्ह्यांतून आणि त्यातही विशेषतः ग्रामीण भागांतून, शहरातील निम्नमध्यम कुटुंबातील मातांच्या प्रसूती होत असतात. लॉकडाऊनमुळे शहरातील खासगी प्रसूती रुग्णालये बंद झाली. त्यामुळे तिकडची गर्दी याच रुग्णालयात होऊ लागली. कोरोनाविषयक सर्व नियमांचे पालन केले गेले. प्रसूती कक्षाची प्रत्येक प्रसूतीनंतर स्वच्छता व निर्जंतुकीकरण करणे, सर्व उपकरणे व अवजारांची स्वच्छता राखली गेली. त्यासाठी स्वच्छता कर्मचारी वर्गाने खूप परिश्रम घेतले. बालकांच्या देखभालीचे कक्ष, तेथे देखभालीसाठी असणारे डॉक्टर्स व नर्स, आया यांच्या ड्यूटीचे वेळापत्रक व स्वच्छता याबाबत खबरदारी घेतली. येणाऱ्या प्रत्येक मातेची प्रसूतीच्या आधी कोविड चाचणी होत होती. तिचा अहवाल येण्यासाठी लागणाऱ्या वेळेपर्यंत प्रतीक्षा करावी लागे. जर ती पॉझिटिव्ह आली, तर तिच्या बाळाच्या देखभालीची वेगळी काळजी घ्यावी लागे. पॉझिटिव्ह आलेली आई कोविड रुग्णालयात व बाळ जिल्हा रुग्णालयात. त्यामुळे बाळाचे स्तनपान आणि अन्य सर्व प्रश्न खूप काळजीपूर्वक हाताळावे लागले. त्यासाठी आमचे सर्व कर्मचारी, स्टाफ, डॉक्टर्स साऱ्यांनी अक्षरशः अहोरात्र काम केलं. स्टाफ आणि डॉक्टर्स यांना घरी जाता येत नसे म्हणून त्यांच्या राहण्याची व्यवस्थाही येथेच केली. रुग्णालयात १७५ मातांचे अहवाल पॉझिटिव्ह आले होते. मात्र त्यांच्या एकाही बाळाला संसर्ग होऊ दिला नाही, त्या सर्व बाळांना सुरक्षित ठेवू शकलो, याचे नितांत समाधान आहे.' असे डॉ. कुलवाल यांनी सांगितले. कोरोना काळात डॉ. कुलवाल यांनी घरच्यांचीही खूप काळजी घेतली. कुटुंबीय सुरक्षित राहावे, यासाठी त्या स्वतः व्हरांड्यात झोपत असत. जेवण वेगळे बसूनच घेत असत. यापुढील काळातही रुग्णालय व्यवस्थापन आणि व्यवस्था ही चोख असावी यासाठी प्रयत्नरत राहणार असल्याचे डॉ. कुलवाल यांनी सांगितले.

**– डॉ. मिलिंद दुसाने,**
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

## गावपातळीवरील सर्वेक्षणातून कोरोनावर मात

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्याच्या तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ज्योत्स्ना पोटपिटे-देशमुख या कोरोना महामारीच्या सुरुवातीपासून अखंड व अविरतपणे कार्यरत आहेत. साथीला प्रतिबंध म्हणून तिवसा तालुक्यात आरोग्य यंत्रणेची उभारणी, उपचार, गावपातळीवर जनजागृती आदी विविध कामांत त्या सुरुवातीपासून झटत आहेत. एक महिला अधिकारी असूनही आपल्या कुटुंबाची जबाबदारी पार पाडत त्यांनी आपले कर्तव्य संपूर्ण निष्ठेने पार पाडले आहे.

कोरोना साथीच्या काळात सुरवातीला सर्वच यंत्रणा नव्याने उभारावी लागली. तालुका आरोग्य अधिकारी म्हणून डॉ. देशमुख यांच्यावर मोठी जबाबदारी होती. एकाच वेळी जिल्हा प्रशासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करणे, सहकारी व नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे, उपचार यंत्रणा सतत सुसज्ज ठेवणे अशी अनेक कामे त्यांनी पार पाडली. गुरुकुंज मोझरी येथे कोविड हेल्थ सेंटर सुरू करण्यात आले. सगळी इमारत स्वच्छ करून तिथे खाटा, औषधे, रुग्णांना लागणाऱ्या सर्व आवश्यक सुविधा,



**डॉ. ज्योत्स्ना पोटपिटे-देशमुख,**
तालुका आरोग्य अधिकारी,
तिवसा अमरावती

लहानसहान गोष्टी, भोजन, लाँड्री, गरम पाण्याची सोय अशा कितीतरी गोष्टींची उपलब्धता त्यांनी स्वत: लक्ष घालून करून दिली.

स्वत:ची, कुटुंबाची काळजी घेत ही कामे करावयाची होती. सारेच नवीन होते. रोज नवी आव्हाने उभी राहत होती. त्यामुळे दडपण येत होते. मात्र, वरिष्ठांचे मार्गदर्शन व सहकार्य आम्हाला मोठे बळ देऊन गेले. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी आम्हा सर्वांना भेटून आमचे मनोबल उंचावले. जिल्हाधिकारी शैलेश नवाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल येडगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप रणमले यांचेही मार्गदर्शन सतत मिळत होते. त्यामुळे मोठी हिंमत मिळाल्याचे डॉ. देशमुख सांगतात.

### मॉरल सपोर्ट महत्त्वपूर्ण

रुग्णालयात दाखल होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात धाकधूक असते. त्यामुळे त्यांना मॉरल सपोर्टची गरज असते. हीच बाब हेरून डॉ. देशमुख यांनी कर्मचाऱ्यांचे एक छोटे प्रशिक्षण सुरू केले. डॉक्टर, सिस्टर, परिचर, स्वीपर यांच्या कामच्या वेळा दर १५ दिवसानंतर बदलायच्या. तेव्हा प्रत्येक वेळी डॉ. देशमुख या सर्वांचे एक ट्रेनिंग घ्यायच्या. त्यात त्या रुग्णांना मानसिक बळ देण्याबाबत सर्वांना आवर्जून सांगत असत. त्याशिवाय, स्वच्छता, चांगले जेवण, टीव्ही, मनोरंजनासोबतच ऑनलाइन योग प्रशिक्षणही दिले. तिवसा तालुक्यात शिबिरांची आखणीही डॉ. देशमुख यांनी अत्यंत नियोजनपूर्वक केली. त्यामुळे तिवसा तालुक्यातील ५८ गावांमध्ये ६६ टेस्टिंग कँप घेण्यात आले. गावपातळीवर जाऊन आरटीपीसीआर, ॲन्टिजन टेस्ट केल्या. एवढ्या मोठ्या प्रमाणात सर्वेक्षण व तपासण्या झाल्याने कोरोनाची साखळी तुटण्यात निश्चित मदत झाली. कोरोना संकटकाळात अहोरात्र झटणाऱ्या डॉ. देशमुख या जिल्ह्यात महिला कोरोना योद्धा ठरल्या आहेत.

**– हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती

## कर्तव्यतत्पर

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील सर्वांत मोठे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणजे कासारे. या केंद्रांतर्गत आठ उपकेंद्रे असून सुमारे ४० हजार नागरिकांचा या केंद्रात समावेश होतो. कासारे येथे डॉ. प्रीती गावित यांची प्रथमच वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. या केंद्राचे प्रमुख म्हणूनही त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. मात्र नियुक्त झाल्यानंतर आरोग्य केंद्राची जबाबदारी पेलताना काही अंतरावरच राहत असलेल्या आईला सहा महिन्यांपर्यंत त्यांना भेटता आले नाही.


तपासणी करताना डॉ. प्रीती गावित

जून २०२० मध्ये गावात पहिला रुग्ण सापडताच गावात लोकप्रतिनिधी, पोलीस आणि महसूल प्रशासनाच्या मदतीने त्यांनी कॉन्टॅक्ट ट्रेसिंगला त्यांनी सुरुवात केली. काही वेळेस दिवसांतून तीन-तीन वेळेस तपासणी केली. रात्री उशिराने अहवाल यायचे. रुग्ण आढळून आल्यास त्याच वेळेस नियोजन करावे लागत. संबंधित रुग्णास कोविड केअर सेंटर अथवा डेडिकेटेड कोविड केअर हेल्थ सेंटरमध्ये दाखल करावे लागत. त्यासाठी रुग्णवाहिकेचे नियोजन करावे लागत. त्यात कधी-कधी मध्यरात्र उलटून जात. या काळात त्यांच्याबरोबरच्या वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे अमूल्य असे सहकार्य त्यांना लाभले.

कोरोना विषाणूच्या रुग्णांची संख्या वाढत असतानाच एक दिवस पॉझिटिव्ह रुग्णाचा मृत्यू ओढवला. तोपर्यंत त्याचा अहवाल प्राप्त झालेला नव्हता. त्यानंतरही सर्व नियमांचे पालन करीत मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. कासारे प्राथमिक आरोग्य केंद्रात रोज दोनशे ते सव्वा दोनशे रुग्णांची तपासणी केली जात असे. कोरोना विषाणूमुळे रुग्णसंख्या रोडावली असली, तरी भीती कायम होती. अशा वेळी या केंद्रात कोरोना काळात ७७ मातांची प्रसूती केली गेली. जसजसा काळ जात होता, तशी चिडचिड, ताणतणाव वाढत होता. अशा काळात त्यांच्या मदतीला धावून आली त्यांची आई. त्यांची आई साक्री तालुक्यातच बसरावळ येथील आरोग्य केंद्रात आरोग्य सेविका आहे. कासारे ते बसरावळ दरम्यान फक्त ४० किलोमीटरचे अंतर आहे. मात्र, या माय-लेकींची प्रत्यक्ष भेट होण्यास तब्बल सहा महिन्यांचा कालावधी गेला. असे असले, तरी आई मोबाईलवरून वेळोवेळी सूचना करत होत्या. 'कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव सुरू होण्यापूर्वी माझा स्वभाव भिडस्त होता. मात्र, कोरोनामुळे मला प्रत्यक्ष नेतृत्व करण्याची संधी मिळाली. लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्याशी समन्वय साधत असताना आरोग्य केंद्रांतर्गतच्या कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य उंचावण्याचा प्रयत्न केला. लोकप्रतिनिधी, अधिकारी, रुग्ण आणि ग्रामस्थांशी संवाद साधत असताना मनातील भीती आपोआपच निघून गेल्याचे त्या सांगतात'.

**– गोपाळ साळुंखे,** माहिती सहायक, धुळे

## माणुसकीचे दर्शन

बुलडाणा जिल्ह्यात ३० मार्च २०२० च्या दरम्यान विदर्भातील सर्वात पहिला कोरोना रुग्ण आढळून आला. त्यानंतर जिल्हा प्रशासन सतर्क झाले. या रुग्णाचा मृत्यूही झाला. त्यामुळे कोरोनाने जिल्हावासीयांच्या मनात प्रचंड भीती निर्माण झाली.


**निवेदिता घार्गे,**
मुख्याधिकारी, नगरपालिका



**सारिका भगत,**
तहसीलदार, देऊळगाव राजा

नागरिकांमध्ये प्रचंड भीती पसरली होती. अशा वेळी प्रशासनाने चोख नियोजन करीत सर्वत्र कोरोना संसर्गावर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. या लढाईत महिला अधिकारीसुद्धा कुठेही कमी पडत नव्हत्या. तहसीलदार सारिका भगत, मुख्याधिकारी निवेदिता घार्गे व वैद्यकीय अधीक्षक डॉ. आस्मा शाहीन यांनी तर कोविडमुळे मृत झालेल्यांवर स्वतः अंत्यसंस्कार करून कोरोना काळात माणुसकीचे दर्शन घडवून दिले.

अशीच एक कोरोनाविरूद्धची यशस्वी लढाई. जिल्ह्यातील देऊळगांव राजा येथे प्रशासनाच्या तीनही महिला अधिकाऱ्यांनी लढली. तहसीलदार सारिका भगत, मुख्याधिकारी निवेदिता घार्गे व ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. आस्मा शाहीन देऊळगाव राजा तालुक्यात कोरोनाला हरवण्यासाठी काम करत होत्या. कोरोनाच्या उच्च काळात मानवता अगदी कमकुवत झाली होती. प्रेतालाही कुणी हात लावत नव्हते.. अगदी आप्तेष्टसुद्धा.. अशीच परिस्थिती जून महिन्यात देऊळगाव राजा शहरातही अनुभवयाला आली होती. कोरोना रूग्णाचा मृत्यू झाल्यानंतर प्रेत नातेवाइकांच्या प्रतीक्षेत होते. मात्र संपर्क करूनही नातेवाईक, आप्तेष्ट कुणीही प्रेतावर अंतिम संस्कार करण्यासाठी पुढे आले नाहीत. त्या वेळी या तिन्ही महिला अधिकाऱ्यांनी प्रेताला स्मशानभूमीमध्ये आणून अंत्यसंस्कार केले आणि प्रेताची होणारी अवहेलना थांबवत मानवतेची प्रचिती दिली.



**डॉ. आस्मा शाहीन,**
वैद्यकीय अधीक्षक,
देऊळगाव राजा

लॉकडाऊनची घोषणा होताच जिल्ह्यांच्या सीमा सील करण्यात आल्या. अशा वेळी जिल्ह्यांतील व परराज्यांतील नागरिकांना थांबवून त्यांची निवास, जेवणाची व्यवस्था केली.

तालुकास्तरावर काम करताना या अधिकाऱ्यांना वेळोवेळी परिस्थितीनुरूप निर्णय घ्यावे लागले. त्यात या तीनही महिला अधिकाऱ्यांनी आपले कसब पणाला लावत काम केले. कुठल्याही प्रकारे पुरुष अधिकाऱ्यापेक्षा प्रशासनात कमी न पडता अगदी स्पृहणीय काम या तिघींनी केले आहे.

**– निलेश तायडे,**
माहिती सहायक, बुलडाणा

## आधी कर्तव्य, मगच लगीनघाई

कोरोना काळात पोलीस विभाग रस्त्यावर उतरून 'फ्रंटलाईन वॉरिअर्स' म्हणून लढत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेसोबतच शासन आणि प्रशासनाने दिलेल्या कोरोनाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यासाठी नागरिकांना शिस्त लावणे आदी बाबींना पोलीस विभागाने प्राधान्य दिले आहे. यात महिला अधिकारीही मागे नाहीत. अशाच 'कोरोना योद्धा' म्हणून यवतमाळच्या उपविभागीय महिला पोलीस अधिकारी श्रीमती माधुरी बावीस्कर यांचे नाव अग्रस्थानी येते.



**माधुरी बाविस्कर,**
उपविभागीय पोलीस अधिकारी,
यवतमाळ

विशेष म्हणजे कर्तव्याला प्राधान्य देत श्रीमती बावीस्कर यांनी गत एप्रिल महिन्यात होणारा स्वतःचा साखरपुडासुद्धा पुढे ढकलला. कोरोना बऱ्यापैकी कमी झाल्यावर आणि स्वतःचे कर्तव्य प्राधान्याने पूर्ण केल्यानंतरच तब्बल नोव्हेंबर २०२० मध्ये त्यांनी साधेपणाने साक्षगंध आणि नोंदणी पद्धतीने विवाह केला.

२०१७ च्या बॅचच्या पोलीस उपअधीक्षक असलेल्या माधुरी बावीस्कर यांच्यावर यवतमाळ शहरातील कोरोना संसर्गित इंदिरा नगर, जाफर नगर, मेमन सोसायटी हा संवेदनशील भाग प्रतिबंधित केल्यानंतर त्याची संपूर्ण जबाबदारी माधुरी बावीस्कर यांच्याकडे आली. यादरम्यान स्टाफला प्रोत्साहन देणे, टप्प्याटप्प्याने २४ तास ड्युटी करून घेणे, प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर कोणी जाणार नाही, याची काळजी घेणे आदी कामात त्या अग्रेसर होत्या. विशेष म्हणजे इंदिरानगर व आजूबाजूचा परिसर हा जवळपास ७० दिवस प्रतिबंधित होता. या दरम्यान प्रशासन व विविध सामाजिक संघटनांच्या मदतीने या भागात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, रमजान महिन्यात साखर, दूध, मिठाई नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम पोलीस विभागाने अतिशय चोखपणे पार पाडले. प्रसंगी काही वेळा कठोर होऊन लोकांवर दंडात्मक कारवाई करण्याससुद्धा त्या कमी पडल्या नाही. शहरातील एकमेव प्रतिबंधित क्षेत्राची संपूर्ण जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना तेथील 'इनचार्ज' बनवण्यात आले. तत्पूर्वी त्यांचा १२ एप्रिल २०२० रोजी साक्षगंध ठरला होता. मात्र साक्षगंध आणि इतर वैयक्तिक कामे दूर सारून कर्तव्याला प्राधान्य देत त्यांनी स्वतःचा साखरपुडा पुढे ढकलला. 'आधी कोरोनाविरुद्धची लढाई, मगच लगीनघाई', असा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. कोरोना रुग्ण पॉझेटिव्ह असो अथवा निगेटिव्ह त्या व्यक्तीच्या जवळपासही कोणी जात नाही, अशाच संकट काळात कोरोनावर मात करणाऱ्या चिमुकल्याला कडेवर घेऊन आपुलकीच्या मायेने गोंजारणाऱ्या खाकी वर्दीतील अधिकाऱ्याच्या संवेदनशील मनाचा परिचयसुद्धा यवतमाळकरांनी घेतला.

**– राजेश येसनकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

## रुग्णसेवा महत्त्वाची

२१ मार्च २०२० रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मिरज येथील निवासी वैद्यकीय अधिकारी ऐश्वर्या रमाकांत गरुड यांनी इस्लामपूर येथील चार कोविड संशयित रुग्णांचे नमुने घेतले. त्यापैकी चौघेही पॉझिटिव्ह आले. काळजाचा ठोका चुकला. त्या वेळी मनात खूप भीती निर्माण झाली. तरीही खंबीर होत त्या रुग्णांना व नातेवाइकांना त्या धीर देत होत्या.



**डॉ. ऐश्वर्या रमाकांत गरुड,**
निवासी वैद्यकीय अधिकारी, मिरज

त्या चौघांच्या कुटुंबातील आणखी २१ जणांना कोरोनाची लागण झाली होती. त्यामध्ये २ वर्षांच्या लहान मुलापासून ते ६५ वयोगटातील रुग्ण होते. आता संपूर्ण राज्याचे लक्ष सांगली जिल्ह्याकडे लागले होते. इस्लामपूर हा कोरोनाचा हॉटस्पॉट ठरतो की काय? अशी स्थिती निर्माण झाली होती. या सर्व रुग्णांना उपचाराअंती सुखरूप घरी पाठवल्याचा आनंद अवर्णनीय होता, अशी भावना डॉ. ऐश्वर्या गरुड यांनी व्यक्त केली.

नंतरच्या काळात रुग्णांची संख्या वाढत गेली. कोविड-१९ हा आजार नवीन असल्यामुळे तसेच आजाराबद्दलची संपूर्ण माहिती नसल्यामुळे रुग्णांमध्ये संभ्रम व भीती होती. त्यामुळे उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांना त्या धीर देत होत्या. त्यांचे समुपदेशन करण्यात येत होते. याला रुग्णही चांगली साथ देत होते. याच काळात डॉ. ऐश्वर्या गरुड यांना स्वत:लाच कोविड-१९ ची लागण झाली. आवश्यक उपचार घेऊन त्या तत्काळ पुन्हा कामावर रुजू झाल्या. रुग्ण सेवा अखंडित ठेवण्यासाठी डॉक्टर, नर्स, पॅरामेडिकल स्टाफ यांनी केलेले कार्य नक्कीच अनमोल आहे.

या काळातच डॉ. गरुड यांच्या आईला किडनी स्टोनचा त्रास सुरू झाला. त्यांना खूप वेदनाही होत होत्या. मुलगी डॉक्टर असूनही कोरोना रुग्णांच्या सेवेत असल्याने तिला आईवर उपचार करता आले नाहीत. आईनेही मुलीने आपले कर्तव्य अर्ध्यावर सोडून आपल्याकडे यावे असा हट्टाहास धरला नाही. उलट या भयंकर महामारीच्या काळात व्यक्तिगत अडीअडचणी बाजूला सारून आपली मुलगी कर्तव्य बजावत आहे, याचा अभिमानच त्या माऊलीला वाटला.

कोरोनाच्या काळात कुटुंबीयांनी दिलेल्या मानसिक आधाराबरोबरच प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या साधनसामग्रीमुळे आम्ही कोरोना रुग्णांची सेवा करू शकलो, अशा भावना डॉ. गरुड यांनी व्यक्त केल्या.

**– रणजीत पवार,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सांगली

## वर्दीतील स्त्रीशक्ती

**कोरोनाच्या लढ्यात पोलीस दलातील स्त्रीशक्तीने कर्तव्यापलीकडे जाऊन सामाजिक जाणिवेतून उल्लेखनीय काम केले आहे. त्यापैकी काही प्रातिनिधिक महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याची थोडक्यात ओळख.**

### प्रिया गरुड



**प्रिया गरुड,**
पोलीस उपनिरीक्षक, मुंबई

मुंबई पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक प्रिया गरुड यांनी एका महिलेची फूटपाथवर प्रसूती झाल्याची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेऊन मोठ्या प्रयत्नांनी मातेसह बाळाला वेळेत रुग्णालयात दाखल केले. गरुड यांच्या समयसूचकतेमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित आहेत. कार्यतत्पर पोलीस उपनिरीक्षक प्रिया गरुड तसेच राज्य पोलीस दलातील स्त्री शक्ती ज्या आपल्या कर्तव्यापलीकडे जाऊन समाजासाठी आगळेवेगळे कार्य करतात, त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा अभिमान वाटतो. त्यांच्या कार्याचा पोलीस दलाचा कुटुंबप्रमुख म्हणून मला अभिमान आहे, असे उद्गार गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काढले.



**संध्या शिलवंत,**
पोलीस अंमलदार, शाहूनगर

### संध्या शिलवंत

शाहूनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या पोलीस अंमलदार संध्या शिलवंत यांनी एकाच दिवशी चार बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे उत्तरदायित्व पार पाडले होते. या काळात त्यांनी एकूण सहा अंत्यसंस्कार केले. त्यांच्या रूपाने वर्दीतील स्त्रीशक्तीचे दर्शन घडले.

### विद्या कोळेकर

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या पोलीस नाईक विद्या कोळेकर यांनी त्यांच्या पतीच्या मदतीने स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या परीक्षार्थींना मैदान तयार करून देण्यासाठी भरीव योगदान दिले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवक-युवतींसाठी कोळेकर यांनी केलेल्या या उल्लेखनीय कार्याचा गृह विभागाला अभिमान आहे.



**विद्या कोळेकर,**
पोलीस नाईक,
सोलापूर ग्रामीण



**स्वाती खाडे,**
सहायक पोलीस निरीक्षक, पुणे

### स्वाती खाडे

पुणे पोलीस दलातील संवेदनशील सहायक पोलीस निरीक्षक स्वाती खाडे यांनी पतीने सहा महिन्यांच्या बाळासह घराबाहेर काढलेल्या निराधार महिलेची परिस्थिती समजून घेत त्वरित ई-पास मंजूर करून दिला. तसेच नातेवाइकांनी ठरवलेल्या कारमध्ये बसवून दिले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून खाडे यांनी माणुसकीच्या नात्याने या महिलेला सर्वतोपरी मदत केली.

### रेहाना नासिर शेख

मुंबई पोलीस दलातील पोलीस नाईक रेहाना नासिर शेख यांनी पनवेलजवळील धामणी येथील ज्ञानाई माध्यमिक विद्यालयात शिकणाऱ्या ५० विद्यार्थ्यांचे दहावीपर्यंतचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारत दत्तक घेतले. हे सामाजिक जाणिवेतून केलेले उल्लेखनीय लोकाभिमूख कार्य आहे.



**रेहाना नासिर शेख,**
पोलीस नाईक, मुंबई



**रेखा काळे,**
पोलीस कॉन्स्टेबल, मुंबई

### रेखा काळे

मुंबई पोलीस दलातील पोलीस कॉन्स्टेबल रेखा काळे या प्रसूती रजेवर आपल्या गावी बेलवंडी, श्रीगोंदा येथे गेल्या होत्या. तिथे त्यांना प्राथमिक शाळेमध्ये क्वारंटाइन व्हावे लागले. काळे यांनी पतीच्या मदतीने क्वारंटाइन असलेल्या शाळेची साफसफाई केली आणि झाडांना पाणी घालून शाळेचा परिसर हिरवागार केला. हिरवा रंग हा निसर्गाशी, भूमीशी असलेले नाते दर्शवतो. काळे यांनी आपल्या या कार्यातून समृद्धीचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

**– डॉ. राजू पाटोदकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

## कोरोनाला रोखण्यात यश

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील कोरोना साथ नियंत्रणासाठी विशेष वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या डॉ. वैशाली वसंतराव बडदे यांनी कोपरगाव तालुक्यातील कोरोना साथ नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न केले.



**डॉ. वैशाली वसंतराव बडदे,**
विशेष वैद्यकीय अधिकारी,
कोपरगाव

टेस्टिंग, ट्रेसिंग आणि ट्रीटमेंट या तीनही आघाड्यांवर त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. कॉन्टॅक्ट झोन स्थापन करणे तसेच पॉझिटिव्ह रुग्णांची वेळेची कोणतीही मर्यादा न पाळता हिरिरीने सहभाग घेऊन कॉन्टॅक्ट ट्रेसिंग केले. एस.एस. जी.एम.कॉलेज, कोपरगाव येथील मुलींचे वसतिगृह येथे स्थापन करण्यात आलेल्या कोविड केअर सेंटरमध्ये त्यांनी अविरत सेवा दिली.

या कोविड केअर सेंटरमधे २ हजार ८५६ रुग्णांना दाखल करण्यात आले होते. त्यापैकी २ हजार ८११ रुग्ण बरे होऊन घरी गेले. रुग्णांना पुरवण्यात येणाऱ्या सर्व सुविधा उदा. येथील भोजन, स्वच्छता व उपचार इत्यादीबाबत स्वतः व सहकाऱ्यांच्या मदतीने लक्ष घातले. तेथे दाखल असलेल्या रुग्णांचे समुपदेशन व त्यांना मानसिक आधार देण्याचे महत्त्वाचे काम केले.

जुलै २०१९ मध्ये शेवटच्या आठवड्यापासून येथे रुग्णसंख्या वाढण्यास सुरुवात झाली. त्यातल्या त्यात अन्य शहरांमध्ये ऑगस्ट महिन्यात रुग्ण वाढण्यास सुरुवात झाली. त्या वेळी डॉ. बडदे यांच्या संकल्पनेतून शहरातील अतिजोखमीच्या भागांची विभागणी करून, तेथे आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले. सर्दी, ताप व खोकला लक्षणे असणारे तसेच कोमार्बिड व्यक्तींची रॅपिड ॲंटिजन टेस्ट प्रत्यक्ष स्थळी करण्यात आली. शहरातील एकूण पाच विभागातील २५ हजार लोकसंख्येचे चार दिवस सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणामध्ये ४६ रुग्णांचे त्वरित निदान करण्यात आले व पुढील संसर्ग रोखण्यात त्यांना यश आले. तालुका प्रशासन, ओम साई ग्रामीण शिक्षण संस्था, पारिख वाचनालय, कोपरगाव व इतर सेवाभावी संस्था यांच्याकडून कोरोना साथ नियंत्रणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. वैशाली बडदे यांचा गौरव करण्यात आला. कोरोना प्रतिबंध लसीकरण मोहिमेचे नियोजनही त्यांनी केले आहे.

**– जयंत कर्पे,**
माहिती सहायक, उप माहिती कार्यालय, शिर्डी, जि. अहमदनगर

## अशा लढल्या रणरागिणी

मार्च २०२० दरम्यान कोरोनाच्या थैमानाच्या बातम्यांनी समाजमन घाबरवून सोडले होते. या सर्व पार्श्वभूमीवर मिरज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे कोरोना चाचण्यांसंदर्भात प्रयोगशाळा एप्रिल २०२० पासून सुरू केली. कोरोनाची सुरुवात आणि भीती या दोहोंमुळे लॅबची उभारणी झाली तरी त्यामध्ये स्वॅबचे नमुने तपासणार कोण? अशी स्थिती निर्माण झाली. अशा वेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरजच्या सूक्ष्म जीवशास्त्र विभागाच्या प्रमुख

प्रा. डॉ. वनिता कुलकर्णी आणि डॉ. पंकज जोशी यांनी स्वत: अंगावर पीपीई किट चढवून कोरोना संशयितांच्या स्वॅब तपासणीला सुरुवात केली आणि बघता बघता येथून कोरोनाचे नमुने तपासण्याची प्रक्रिया सुरू झाली.

या प्रयोगशाळेच्या प्रमुख डॉ. वनिता कुलकर्णी असून, त्यांच्या सर्व महिला सहकाऱ्यांनी आजपर्यंत जवळपास १ लाख ४० हजार कोरोना संशयितांच्या स्वॅबची तपासणी या प्रयोगशाळेत केली आहे.




### तपासणी अहोरात्र

स्वत: स्वॅब नमुन्याची तपासणी करत असतानाच डॉ. वनिता कुलकर्णी यांनी प्रयोगशाळेसाठी नियुक्त केलेल्या मनुष्यबळालाही प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही पार पाडली. या काळात डॉ. कुलकर्णी आणि त्यांचे सर्व सहकारी रात्रभर प्रयोगशाळेत थांबूनच तपासणी करत होते. सकाळी सुरुवात झालेले काम दुसऱ्या दिवशी पहाटे ३ ते ४ वाजेपर्यंत अखंडपणे सुरू असे. ट्रेनिंग आणि टेस्टिंग अशा दुहेरी भूमिकेत या संपूर्ण पथकाने जिवाची पर्वा न करता रात्रंदिवस काम केले.

### कर्तव्य मोठे

या काळात या पथकामधील महत्त्वपूर्ण भूमिका असणाऱ्या डॉ. विशाखा शिखरे यांना कोरोनाची लागण झाली. त्यांचे सासरे, पती आणि त्या स्वत: असे एकाच कुटुंबातील तिघेजण कोरोनाबाधित झाले. यात डॉ. शिखरे यांच्या सासऱ्यांचे कोरोनाने निधन झाले. प्रयोगशाळेत प्रवेश करणाऱ्या स्टाफला बॅच संपेपर्यंत बाहेर पडता येत नव्हते. त्यामुळे त्याच परिसरात उपचार घेत असणाऱ्या डॉ. विशाखा शिखरे यांच्या सासऱ्यांचे निधन झाले तरी त्यांना प्रयोगशाळेतून बाहेर जाऊन सासऱ्यांचे अंत्यदर्शनही घेता आले नाही. आणि त्यांनीही कौटुंबिक हानी व झालेले दु:ख बाजूला सारून कर्तव्याला प्राधान्य दिले.

प्रयोगशाळेत जवळपास २५ जणांचा स्टाफ कार्यरत होता. त्यांच्याद्वारे प्रतिदिन सरासरी ८०० ते ९०० स्वॅब टेस्ट होत होते. कधीकधी हा आकडा १२०० ते १५०० पर्यंतही जात होता. यामध्ये डॉ. पंकज जोशी वगळता सर्व टेक्निकल स्टाफ महिला होत्या. या कामाचे पालकमंत्री जयंत पाटील, जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडून अत्यंत बारकाईने संनियंत्रण केले जात होते. केवळ सांगली जिल्ह्यालाच नव्हे, तर पश्चिम महाराष्ट्रासह कोकण व कर्नाटक सीमा भागातील रुग्णांना तत्पर सेवा देऊन अनेकांचे प्राण वाचवण्यात अत्यंत मोलाची कामगिरी त्यांनी बजावली.

**– वर्षा पाटोळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

## रुग्ण हेच माझे कुटुंब

'अलका नावाच्या आजींशी जणू काही नातेच जुळेले होते. त्यांना स्वत:च्या हाताने काहीच करता येत नव्हते. मुलाला जवळ येण्याची परवानगी नव्हती. एक महिना त्यांची सेवाशुश्रूषा केली. त्या बाळ म्हणूनच लेकीसारख्या बोलवायच्या. त्या कोरोनाच्या संकटातून बाहेर पडू शकल्या नाहीत, याची खंत आहे.' नंदुरबारच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातील परिचारिका श्रद्धा लोगडेला हा प्रसंग सांगताना अजूनही दाटून येते. कोरोनाचा पहिला रुग्ण कोविड कक्षात आल्यापासून तिचे सेवाकार्य अविरतपणे सुरू आहे.



**श्रद्धा लोगडे,**
परिचारिका, जिल्हा शासकीय रुग्णालय, नंदुरबार

श्रद्धा मुळची रत्नागिरीची. जनरल नर्सिंग मिडबायफरीचा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर तीन वर्षापूर्वी तिची जिल्हा रुग्णालयात परिचारिका म्हणून नियुक्ती झाली. राज्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला येऊनही अल्पावधीच आपल्या स्वभावाने आणि कामाने तिने सहकाऱ्यांना आपलेसे केले.

जिल्हा शासकीय रुग्णालयात कोविड हॉस्पिटल सुरू झाल्यानंतर तिची नियुक्ती कोविड कक्षात करण्यात आली. घरच्यांना काळजी वाटेल म्हणून तिने सुरुवातीस घरी सांगितले नाही. श्रद्धाने कोविड कक्षात रुग्णाचे जेवण, औषध देणे, त्यांची आरोग्य तपासणी आदी कामे केलीत. कुटुंबापासून काही दिवस दूर राहिल्याची जाणीव त्यांना होऊ नये म्हणून त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधून त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मनातील आजाराची भीती घालवण्याचे काम खुबीने केले.

अलका आजीच्या मृत्यूने कुटुंबातील सदस्य गेल्याची भावना तिच्या मनात निर्माण झाली. असा दुर्दैवी प्रसंग पुन्हा येऊ नये, यासाठी रुग्णांची जास्त काळजी घेण्याचा निश्चय तिने केला. कोरोनाबाधितांची संख्या वाढत असताना श्रद्धाला ६ महिने घरीदेखील जाता आले नाही. रुग्ण बरे होऊन जाताना त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य पाहण्यात आनंद मानणाऱ्या श्रद्धाने कुटुंबीयांपासून दूर असण्याची भावना बाजूला सारण्यासाठी रुग्णांनाच आपले कुटुंब मानले. कोरोना लसीकरण असो व कोविड कक्षातील जबाबदारी, तिने आपले कर्तव्य उत्तमरीतीने बजावले. त्यामुळे प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री ॲड. के.सी. पाडवी यांच्या हस्ते तिचा 'कोविड योद्धा'

म्हणून सन्मान करण्यात आला. आपला सन्मान हा सर्व सहकाऱ्यांचा सन्मान असल्याचे ती म्हणते. श्रद्धा लोगडे म्हणते, रुग्ण बरे होऊन जाताना आभार मानतात हीच आयुष्यातील खरी कमाई आहे. वरिष्ठांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिल्याने जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडणे शक्य झाल्याचे श्रद्धा सांगते. तर श्रद्धा अत्यंत प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडते. तिचा स्वभाव आणि संवाद कौशल्यामुळे कोविड रुग्णांवर उपचार करणे सोपे होत असल्याचे जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. रघुनाथ भोये यांनी सांगितले.

**– डॉ. किरण मोघे,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## भावनेपेक्षा कर्तव्य मोठे


**डॉ. शुभांगी अहिरे,**
सामान्य रुग्णालय, मालेगाव

संपूर्ण जगात थैमान घालणारा कोरोना विषाणूचा एप्रिलच्या प्रारंभी मालेगावात प्रवेश झाला आणि सगळ्यांनाच हादरा बसला. आरोग्य यंत्रणेसाठी खऱ्या अर्थाने युद्धकाळ सुरू झाला. येथे काम करणारी प्रत्येक व्यक्ती कोविडयोद्धा म्हणून झटत होती. अशा असंख्य कोविड योध्यांमधील एक आहेत मालेगावच्या सामान्य रुग्णालयात कार्यरत असलेल्या कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. शुभांगी सुमित अहिरे. कोरोनाच्या प्रचंड संसर्ग काळात डॉ. शुभांगी या आपल्या दोन चिमुरड्यांना घरी सोडून अहोरात्र रुग्णसेवेत झटत होत्या. भावनेपेक्षा त्यांनी कर्तव्याला महत्त्व दिले. डॉ. शुभांगी यांचा कोरोना काळातील अनुभव अनेकांना प्रेरणा देणारा आहे.

कोरोना संकट काळात आहे त्या परिस्थितीत काम करणे कठीण होते. कोरोनाबाबत मात्र सारेच अनभिज्ञ होते. त्यामुळे रुग्ण वाढत असताना दुसरीकडे त्यांच्यावर योग्य उपचार, औषध देणे या सगळ्यांचीच नव्याने तयारी करावी लागली. सुरुवातीला रुग्णसंख्या झपाट्याने वाढत होती. अशा वेळी डॉ. शुभांगी या घसा तज्ज्ञ असल्याने रुग्णांचे घशातील नमुने घेणे हे काम त्यांनाच पार पाडावे लागत असे. रुग्णांचे नमुने घेण्याचा अनुभव सर्वात भीतिदायक असायचा असे त्या सांगतात.

आयसोलेशन वार्डात रुग्णांवर उपचार करतानाचा अनुभवदेखील थरारक असायचा. संपूर्ण अंगावर पीपीई कीट घालून स्वतःच्या मनातील भीती दूर करून रुग्णांचे मनोधैर्य वाढवण्याचे काम त्यांनी केले. रुग्णांना उपचाराबरोबर मानसिक आधार दिला. कोरोनाच्या दहशतीखाली डॉ. शुभांगी कर्तव्य बजावत होत्या. कुटुंबातील सदस्य, नातेवाइकांसह सगळ्यांना काळजी वाटत असल्याने अनेकवेळा त्यांच्याकडून 'तू घरी परत ये' अशी भावनिक साद घातली जात होती. घरी पती सुमित, सासूबाई विजयालक्ष्मी व दोन चिमुरडी लेकरे रोज डॉ. शुभांगी घरी येतील याची वाट पाहायचे. अशा वेळी मुलांशी व कुटुंबाशी व्हिडिओ कॉलद्वारे बोलताना त्यांनी आपल्या भावनांना कित्येक वेळा आवर घातला. 'आई तू कोरोनाला संपवून घरी ये!' हे मुलांचे वाक्य ऐकले की, मोठे बळ मिळायचे असे त्या अभिमानाने सांगतात.

**– मनोहर पाटील,**
उप माहिती कार्यालय, मालेगाव

## नियोजनातून कोरोनावर मात


**लीना बनसोड,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
नाशिक

कोरोनासारख्या आजाराशी दोन हात कसे करायचे. सुरक्षित अंतर ठेवा, सॅनिटायझरचा वापर करा, मास्क लावा अशा नियमांचे पालन करण्याच्या सूचनांनी सगळे हैराण झाले. घराबाहेर पडू नका, आपल्यामुळे कुटुंबाला अडचणीत आणू नका असे मंत्र, उपदेश कानावर धडकत होते. मात्र अशा भयावह परिस्थितीतही 'त्या' घराबाहेर पडल्या. आपला जिल्हा, इथली लोक हाच आपला परिवार समजून मोठी उभारी घेत, कोरोना काळातही मागे हटल्या नाहीत, त्या आजतागायत. नाशिक जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड व अन्न औषध प्रशासन विभागाच्या सहआयुक्त माधुरी पवार यांच्यासह अनेक शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिला कर्तव्यासाठी बाहेर पडल्या अन् कोरोनासारख्या अदृश्य विषाणूशी लढा देऊ लागल्या. त्यांचा लढा अजून थांबलेला नाही.

### प्रतिबंधात्मक उपाययोजनावर भर

कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात होत होता. अशा वेळी ग्रामीण भागाची संपूर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड यांनी घेतली.


**माधुरी पवार,**
सहआयुक्त, नाशिक

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने ग्रामीण भागात कोरोनावर उपचार करण्यासाठी कोविड केअर सेंटर व डेडिकेटेड कोरोना हेल्थ सेंटर सुरू केले. तसेच आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार १४ लाख आर्सेनिक अल्बम-३० गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच राज्यातील पहिला क्लाऊड फिजिशियन व ई-साय क्लिनिक हा उपक्रम राबवण्यात आला. कोरोनाकाळात गावागावांत कोरोना ग्रामसमित्यांची स्थापना करून

श्रीमती बनसोड यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग वाढवला.

### ऑक्सिजन व रेमडिसिव्हरचे नियोजन

कोरोनासारख्या कठीण काळात रेमडिसीवीर इंजेक्शनचा काळाबाजार रोखून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने सहआयुक्त माधुरी पवार यांनी गरजूंपर्यंत इंजेक्शन पोहोचवण्याची मोठी यंत्रणा उभी केली. तसेच ऑक्सिजनची वाढलेली मागणी व पुरवठा यातील तफावत लक्षात घेऊन तातडीने उत्पादकांची बैठक घेतली. औद्योगिक क्षेत्रातील ऑक्सिजनचा पुरवठा बंद करून फक्त हॉस्पिटलमध्येच पुरवठा वाढवला. जिल्ह्याकरिता ऑक्सिजनच्या मुबलक उपलब्धततेची निकड लक्षात घेऊन उत्पादन व साठवणुकीची क्षमता दररोज ३० मेट्रिक टनपासून ते ८० मेट्रिक टनपर्यंत वाढवण्यात आली आहे. कोरोनाच्या काळात १७ स्थानिक उत्पादकांना हॅण्ड सॅनिटायझर बनवण्यासाठी विशेष परवाने देणे आदी कामांमध्ये श्रीमती पवार यांनी पुढाकार घेतला.

**– मोहिनी राणे,**
सहायक संचालक, नाशिक

## दुर्गम भागात सेवेचा आदर्श

संकटकाळी क्षमता आणि निर्णयक्षमतेची खरी कसोटी असते. त्या क्षणाला जे उत्तमरीतीने प्रतिसाद देतात तेच अनोखे कार्य करू शकतात. चिमलखेडी येथील २७ वर्षाच्या रेलू वसावे यांनी नेमके हेच केले. त्यांनी आपल्या कार्यातून क्षमतेचा परिचय दिला आहे. कोरोना संकटकाळात नर्मदेचा प्रवाह, सातपुडाच्या दुर्गम डोंगररांगा, मधूनच होणारा पाऊस आणि वादळही त्यांना कर्तव्यापासून दूर नेऊ शकले नाही. त्यामुळेच त्यांच्या कार्याची ख्याती देशभर गेली.



नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा चिमलखेडी येथील
२७ वर्षाच्या रेलू वसावे.

रेलूताईंनी कोरोना संकटातही मासेमारी करण्याच्या होडीने नर्मदेच्या पात्रातून आणि डोंगरावर पायी प्रवास करत परिसरातील ७ पाड्यांवर राहणारी बालके आणि गरोदर मातांपर्यंत पौष्टिक आहार पोहोचवला. बालकांचे वजन तपासणे आणि मातांना आरोग्यासंबंधी माहिती देण्याचे कार्यदेखील त्यांनी या काळात सुरूच ठेवले.

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा तालुक्यातील ६७२ लोकवस्तीचे चिमलखेडी गाव. याच गावातील अंगणवाडीत रेलूताई सेविका म्हणून काम पाहतात. एका बाजूस सातपुड्याच्या डोंगररांगा आणि दुसऱ्या बाजूस नर्मदेचे पात्र असल्याने गावाकडे जाण्यासाठी रस्ता नाही. पावसाळ्यात त्यांना मोलगी येथून गमनपर्यंत पोषण आहार वाहनाने आणावा लागतो. तेथून पायी चालत सिंदुरीनाला येथे होडीत बसून नर्मदेच्या प्रवाहातून चिमलखेडीला पोहोचता येते. पावसाळ्यानंतर सिंदुरी नाल्यापर्यंत वाहनाने आहार नेणे शक्य होते.

पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या रेलूताईंनी अंगणवाडी सेविका म्हणून काम स्वीकारल्यानंतर परिस्थितीची गरज लक्षात घेऊन होडी वल्हवणे शिकून घेतले. आपत्तीला तोंड देता यावे म्हणून त्या पोहणेदेखील शिकल्या. आपले कर्तव्य क्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व कौशल्य त्यांनी प्राप्त केले आणि सुरुवातीपासून प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडली.

एरवी परिसरातील पाड्यावरील माता आपल्या बालकांना घेऊन अंगणवाडीत येऊन पोषण आहार घेतात. मात्र कोरोनाचे संकटकाळात माता आणि बालक अंगणवाडी केंद्रात येणे बंद झाले. बालकांना कुपोषणापासून दूर ठेवण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोषण आहार पोहोचवणे आवश्यक होते. धैर्य असणारी माणसे संकटातही आपली भूमिका शोधतात, रेलूताईंनी नेमके तेच केले. त्यांनी स्वतः बालकांपर्यंत पोहोचण्याचा निर्णय घेतला.

पावसाळ्यात पाणी पातळी वाढलेली असते. अशाही परिस्थितीत न घाबरता रेलूताईंनी पाटीलपाडा, कामदारपाडा, पिरॅबारपाडा, अलिघाटपाडा, वलनीपाडा, दाबाडपाडा आणि गुऱ्हाळीपाडा या साधारण १० किलोमीटर परिसरातील पाड्यांवरील माता आणि बालकांपर्यंत आपल्या मदतनीस सोनूबाई वसावे आणि कुटुंबीयांच्या साहाय्याने पोषण आहार पोहोचवला. त्यांच्या आरोग्याची तपासणी केली. त्यापैकी अलिघाटपाडा आणि दाबाडपाडाला त्यांना बोटीने पोषण आहार पोहोचवावा लागतो. रेलूताईंच्या कार्याचे ग्रामस्थांनादेखील कौतुक आहे. त्यांच्या कामात त्यांचे पती रमेश वसावे आणि ग्रामस्थांनीदेखील सहकार्य केले. गेल्या ६ वर्षांपासून त्या आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. मात्र कोरोना काळात प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य विशेष ठरले आहे.

रेलूताईंच्या कार्याबद्दल माहिती मिळताच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांचे कौतुक केले आणि आपल्यावतीने त्यांचा सत्कार करण्यास सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भारुड यांनी संपूर्ण कुटुंबाला सन्मानाने बोलावून त्यांचा सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

'माझ्या जबाबदारीची मला कल्पना असल्याने भीती जाणवत नाही. काही वेळा होडी चालवताना हात दुखतात. पण त्यामुळे माझे काम थांबत नाही. माता आणि बालकांपर्यंत पोषण आहार पोहोचवणे गरजेचे आहे. त्यांच्या आरोग्यासाठी ते महत्त्वाचे आहे. हे काम करताना मला समाधान मिळते. एकदा पावसाळ्यात चिमलखेडीकडे जाताना वादळामुळे बोट बुडण्याचा प्रसंग आला. एका नावड्यामुळे मी आणि माझी सहकारी दोन्ही वाचलो. मात्र त्यानंतरही भीती वाटत नसल्याचे' रेलू वसावे सांगतात.

**– डॉ. किरण मोघे,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## आपल्या मुंबईसाठी सदैव तत्पर

देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि सतत धावत असणारी मुंबई कोरोना संकटात ठप्प झाली होती. मात्र त्याच वेगाने ती पुन्हा धावू लागली. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोरोनाचा संसर्ग मोठ्या प्रमाणावर वाढला होता तेव्हा प्रशासनाबरोबर महापौर किशोरी किशोर पेडणेकरही प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन रुग्णसेवा करत वैद्यकीय कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करताना दिसत होत्या.

जेथे अन्याय दिसेल, मदतीची गरज असेल त्या ठिकाणी भिडणे हा त्यांचा स्वभाव. नगरसेवक होण्यापूर्वीपासूनच त्यांचा सामाजिक कार्याचा पिंड असल्याने महापौर झाल्यानंतर त्या अधिक जबाबदारीने काम करत आहेत. पूर्वी वैद्यकीय क्षेत्रात नोकरी केली असल्यामुळे त्यांना कोरोना संकटात डॉक्टर, परिचारिका, वॉर्डबॉय यांच्यावरील ताणाचा त्यांना अंदाज असल्याने त्यांनी रुग्णलयांना वेळोवेळी भेटी देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण केली. त्यांच्या अडचणी सोडवल्या. स्वतःहून आयसीयूमध्ये जाऊन कोरोना रुग्णांच्याही भेटी त्यांनी घेतल्या.

नायर रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी परिचारिकांच्या मनात कोरोनाची भीती असल्याचे कळताच स्वतः परिचारिकेच्या वेशात जाऊन त्यांच्यासोबत संवाद साधला. त्यामुळे त्यांच्या मनातील भीती कमी झाली. जास्तीत जास्त लोकांमध्ये जाऊन जबाबदारीने काम केल्याने मोठ्या इतर शहरांपेक्षा मुंबईमध्ये कोरोनावर लवकर नियंत्रण मिळवणे शक्य झाले.

मुंबईत शहरात जेवढ्या झोपड्या आहेत तेवढ्याच उंच इमारतीसुद्धा आहे. येथे कोरोनाचा संसर्ग वाढल्यानंतर धारावीसारख्या दाटीवाटीच्या वस्तीत त्यावर नियंत्रण मिळवणे मोठे दिव्य होते, मात्र श्रीमती पेडणेकर यांच्या नेतृत्वात त्यावरही मात करत बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोरोनावर नियंत्रण मिळवले. जास्तीत जास्त रुग्णांचा शोध घेऊन त्यांना रुग्णालयापर्यंत आणणे, त्यांची तपासणी करणे तसेच त्यांच्यावर उपचार करणे या चतुः सूत्रीचा वापर केला. या चतुःसूत्रीमुळेच धारावीसारख्या लोकसंख्येच्या दाटीवाटीच्या भागातसुद्धा कोरोनावर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या धारावी पॅटर्नचे कौतुक जागतिक स्तरावर झाले. कोरोना नियंत्रणासाठी त्या विविध मार्गांनी प्रयत्न करत आहे. नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन समुपदेशन व जनजागृतीही करत आहेत. स्वतः भायखळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सांताक्रूझ असा लोकल ट्रेनने प्रवास करून त्यांनी विनामास्क लोकल ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मास्क वापरण्याचे आवाहन केले.



**किशोरी पेडणेकर,**
महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका

कोरोनाचा एक रुग्ण असंख्य नागरिकांना बाधित करू शकत असल्यामुळे विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून दंड वसूल करण्याचे निर्देशही दिले आहेत. त्याचबरोबर परदेशातून आलेले नागरिक हॉटेलमध्ये योग्यरीतीने 'क्वारंटाइन' होत आहे की नाही? याबाबत विविध पंचतारांकित हॉटेलांना भेट देऊन त्याची त्या खातरजमा करीत आहे. याविषयी नियम तोडणाऱ्या हॉटेलचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

कोरोनाच्या या काळात महापालिकेच्या कामांची माहिती रोज सकाळी मीडियाला देणे, त्यानंतर महापालिकेच्या सर्व यंत्रणांशी सकाळी ११ ते रात्री ११ पर्यंत दररोज बोलून सद्यःस्थिती जाणून घेणे, त्यांच्याशी समन्वय साधण्याचे काम त्या नियमित करत आहेत. सद्यःस्थितीत काही भागात कोरोना वाढत असला तरी पालिकेची यंत्रणा डोळ्यात तेल घालून कामाला लागली आहे. नागरिकांनी मास्क वापरणे, वेळोवेळी हात धुणे तसेच सामाजिक अंतर पाळण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

**– तानाजी कांबळे,**
जनसंपर्क अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका

## समुपदेशनातून कोरोनावर नियंत्रण

लॉकडाऊनच्या कालावधीत संपूर्ण देश बंद होता. त्यास जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुका अपवाद नव्हता. कोणीही घराबाहेर पडू नये, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उपकेंद्र तोरणाळा येथील आरोग्य सेविका वैशाली तुकाराम खंडारे यांनी गावी परतणाऱ्या नागरिकांचे क्वारंटाइनचे व्यवस्थापन उत्तम केले. काही जणांना गावात प्रवेश नाकारण्यात येत असे. त्यामुळे बऱ्याच व्यक्तींना शेतात किंवा शाळेत क्वारंटाइन करावे लागत असे. त्यासाठी या नागरिकांचे समुपदेशन त्यांनी केले. मुंबईत नोकरीला असलेल्या पोलीस खात्यातील एका मुलाला गावात प्रवेश मिळाला नाही तो रात्रभर टेकडीवर बसून राहिला. दुसऱ्या दिवशी सकाळी श्रीमती खंडारे त्या गावात पोहोचल्या आणि त्यांनी ग्रामस्थांचे समुपदेशन केले. त्यानंतर त्या मुलाला शेतात क्वारंटाइन केले व उपजिल्हा रुग्णालयात तपासणी केली.

या काळात जामनेर उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सुविधा वाढवल्या. सुरवातीला कोरोना विषाणूच्या तपासणीसाठी स्वॅब घेण्यासाठी पीपीई किट उपलब्ध नव्हते. अशा परिस्थितीतून मार्ग

काढला. एवढेच नव्हे, तर वाहतुकीची साधने उपलब्ध नसताना वेगवेगळ्या गावी पोहोचून कोणाला काही त्रास होतो आहे किंवा नाही याचे सर्वेक्षण केले. एकीकडे कोरोना विषाणूचे रुग्ण वाढत असताना दुसरीकडे नियमित येणाऱ्या रुग्णांची तपासणी करणे आवश्यक होते. त्यासाठी फत्तेपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे जामनेर उपजिल्हा रुग्णालयापासून दूर आहे. तेथे प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांना कोणतेही अहवाल उपलब्ध नसताना ५७ महिलांची सुखरूपपणे प्रसूती केली. तसेच लसीकरण नियमितपणे केले.



**वैशाली तुकाराम खंडारे,**
आरोग्य सेविका

जिल्ह्यात कोरोना विषाणूच्या रुग्णांची संख्या वाढल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र स्तरावर चाचण्या सुरू केल्या. सुरुवातीला आरटी-पीसीआर चाचणीला सुरवातीला नागरिकांचा विरोध होत असे. मात्र, अशा नागरिकांचे समुपदेशन करून त्यांना चाचणीस प्रवृत्त केले.

## खाकी वर्दीतील 'सावित्री'

संगीता ढोले या वाशिम दलातील महिला पोलीस शिपाई. सर्वसामान्य कुटुंबातून पोलीस दलात भरती झालेल्या या युवतीने गेल्या वर्षी लॉकडाऊन काळात असामान्य कामगिरी करून आपली सामाजिक बांधिलकी दाखवून दिली. पोलीस म्हटलं की, गुन्हेगारांना पकडणे, त्यांच्यावर वचक निर्माण करणे हे त्यांचे काम. पण या महिला पोलिसाने आपले कर्तव्य पार पाडलेच, पण त्यासोबतच भटकंती करून आयुष्याची गुजराण करणाऱ्या नाथजोगी समाजातील जवळपास ५० लेकरांच्या शिक्षणासाठी 'प्रवास प्रकाशाकडे...' हा उपक्रम सुरू केला. यामुळे वाशिम शहरातील मानमोठेनगर परिसरात पालावर राहणाऱ्या वंचितांच्या लेकरांना शिक्षणाचा मार्ग गवसला आहे...



**संगीता ढोले**
पोलीस शिपाई, वाशिम

संगीता ढोले या वाशिम पोलीस दलात कार्यरत आहेत. शिक्षणाची आवड असल्याने त्या अजूनही शिक्षण घेत आहेत. त्यांनी समाजकार्य विषयात पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण घेतली आहे. लॉकडाऊनंतर जिल्ह्यात चेकपोस्ट उभारण्यात आले. वाशिम शहरानजीक शेलूबाजार रोडवर उभारलेल्या चेकपोस्टवर संगीता यांची नेमणूक झाली. दिवसभर चेकपोस्टवर ड्युटी करायची, सोबतच पायी गावी निघालेल्या प्रवाशांना रोज आपल्या कुवतीनुसार अन्न, पाणी उपलब्ध करून द्यायचे, असा त्यांचा सुरुवातीचा दिनक्रम. या चेकपोस्ट जवळच असलेल्या मैदानावर भटकंती करणाऱ्या नाथजोगी समाजातील काही लोकांनी तात्पुरते निवारे उभारून आपले संसार थाटले होते. येथील महिला व पुरुष दिवसभर कामानिमित्त भटकंती करायचे, त्यांची ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलं झोपड्यांजवळ खेळताना दिसायची. यापैकी अनेक लहान-लहान वयाची मुलं सुपारी, मावा, तंबाखू यासारखे पदार्थसुद्धा खायची. या मुलांकडे पाहून संगीता त्यांच्या भविष्याबाबत, शिक्षणाबाबत विचार करायची. यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, नाहीतर ही मुले पुढे जाऊन काय करतील, असे प्रश्न त्यांना पडत होते.

संगीता यांनी एक दिवस ड्युटी संपल्यानंतर थेट या झोपड्यांमध्ये जावून येथील महिला, पुरुषांशी संवाद साधला. मुलांच्या शिक्षणाबाबत विचारपूस केली. तेव्हा त्यांना समजले की, या मुलांच्या शिक्षणाविषयी पालक उदासीन आहेत. मात्र, संगीता यांनी या मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचा मानस पालकांना सांगितला. कोणत्याही शाळेत न पाठवता आपल्या झोपड्यांच्या परिसरातच मुलांना शिक्षण मिळत असेल तरच आम्ही मुलांना शाळेत पाठवतो, असे पालकांनी सांगितले. त्यामुळे २७ मार्च २०२० पासून संगीता यांनी या नाथजोगी बांधवांच्या झोपड्यांच्या परिसरातच प्लास्टिकच्या कागदाचे आच्छादन उभारून मुलांना शिकवण्यास सुरुवात केली.

सुरुवातीला १० ते १५ मुला-मुलींच्या उपस्थितीत ही पालावरची शाळा भरू लागली. त्यांनी रोज शिकण्यासाठी यावे, यासाठी संगीता मुलांना खाऊ-बिस्कीट, कधी घरूनच खिचडी तर कधी पोहे करून घेऊन जात होत्या. हळूहळू मुलांची संख्या वाढून ४५-५० पर्यंत पोहोचली. मराठी भाषेसोबतच इंग्रजी भाषेचे धडे गिरवणे, अंकांची आकडेमोड करणे या मुलांना हळूहळू जमू लागले. ही मुले आता मानवी अवयवाची नावे इंग्रजीत सांगतात. संगणकांच्या सुट्या भागांची नावेसुद्धा ती पटापट इंग्रजीत सांगतात. विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान चांगले असून या विद्यार्थ्यांना राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री व राज्यपाल यांची नावेसुद्धा माहीत आहेत. तसेच त्यांना भारतीय संविधानाचीदेखील ओळख झाली आहे. मुलांना योगा व विविध प्रकारचे खेळ शिकवण्याचे कामही संगीता करते. त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली, तसेच संगीता यांच्याविषयी सुद्धा त्यांच्या मनात जिव्हाळा निर्माण झाला आहे. तुम्ही सुरू केलेल्या वर्गामुळे आता आमची मुले शिकू लागली आहेत. त्यामुळे तुम्ही आता रोज येऊन आमच्या मुलांना शिकवा, असे आता त्यांचे पालकही सांगतात.



लॉकडाऊन संपल्यानंतर शेलूबाजार रोड परिसरातील चेकपोस्ट हटवण्यात आली. त्यानंतरही संगीता आपली ड्युटी बजावून राहिलेल्या वेळेत या मुलांना विद्यादान करतात. संगीता यांनी मुलांना शिक्षणासोबतच स्वच्छतेचे धडेसुद्धा दिले. त्यामुळे आठवड्यातून दोन-तीन वेळा अंघोळ करणारी, केस वाढवून फिरणारी मुले आता नीटनेटकी राहत आहेत. गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही तिच्या कार्याची दखल घेऊन तिचे कौतुक केले. पोलीस अधीक्षक वसंत परदेशी यांनी तिला या उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले.

**– विवेक खडसे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम

## मातृतुल्य

**औरंगाबाद येथील घाटी रूग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपला एक मानदंड निर्माण केला आहे. स्त्रियांच्या आरोग्यप्रश्नासंदर्भात त्यांनी केलेले कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. कोविड-१९ च्या लढ्यात त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.**

वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय शिक्षक म्हणून बी.सी.रॉय पुरस्काराने तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आलेल्या डॉ. काननबाला येळीकर म्हणजे स्त्रीरोग क्षेत्रातील एक नामांकित नाव आहे. डॉ. येळीकर गेल्या चार वर्षांपासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद अर्थात घाटी येथे अधिष्ठाता म्हणून कार्यरत आहेत. ६० वर्षांचा इतिहास लाभलेले घाटी हे जुने वैद्यकीय महाविद्यालय असून, पूर्णवेळ नियमितपणे अधिष्ठाता पदावर डॉ. येळीकर यांच्या रूपाने प्रथमच महिला अधिष्ठाता या महाविद्यालयास लाभल्या आहेत. आपल्या चार वर्षांच्या या कार्यकाळात सहा महत्त्वपूर्ण विषयांतील वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षणाचे अभ्यासक्रम डॉ. येळीकर यांनी सुरू केले असून, यामध्ये त्वचा व गुप्तरोग शास्त्र विभाग, मनोविकृतिशास्त्र विभाग, वार्धक्यशास्त्र विभाग (देशात तिसरे), किरणोपचारशास्त्र विभाग , नवजात शिशुशास्त्र विभाग, कर्करोग शल्यचिकित्साशास्त्र हे अभ्यासक्रम सुरू केले असून महाराष्ट्रातील सरकारी संस्थांमध्ये कर्करोग शल्यचिकित्साशास्त्र अभ्यासक्रम सुरू करणारे घाटी हे पहिले महाविद्यालय आहे.


**डॉ. काननबाला येळीकर**

### ध्येय एकच स्त्रियांच्या आरोग्यात सुधारणा

स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विभागामध्ये रुग्णसेवा देत असताना स्त्रियांच्या आरोग्यात सुधारणा हे एकमेव ध्येय निश्चित झाले. स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून रुग्णसेवा देत असताना ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्यांच्या समस्या अवगत झाल्या. त्यांचे निराकरण करण्याच्या तळमळीतून अनेक उपाय शोधण्याचा कृतिशील प्रयत्न त्यांनी केला आहे. महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरक्षित मातृत्व व्यापक प्रमाणावर ग्रामीण भागात जनजागृती घडवून सदर प्रकल्प यशस्वीपणे राबवला, या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील २०० वैद्यकीय अधिकारी व ३०० परिचारिका यांना स्त्रियांचे आरोग्य व गरोदर मातांचे आरोग्य या संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात आला. या प्रशिक्षणामुळे स्त्रियांच्या आरोग्याबाबत ग्रामीण भागात जनजागृती करण्यास मदत झाली. तसेच गरोदर काळात मातांच्या करावयाच्या तपासण्या जसे की, नेमिया चाचणी, हिमोग्लोबिन, रक्तांच्या चाचण्या व सोनोग्राफी या ग्रामीण भागात होऊ लागल्या यांची फलश्रुती म्हणजे प्रसूतीदरम्यान होणाऱ्या गुंतागुंतीचे प्रश्न यामध्ये मोठ्या प्रमाणात घट होऊन माता व बालमृत्यू दरात घट झाली.

### संघाला महत्त्व

कुणाकडून काही अपेक्षा न ठेवता, स्वत:शी प्रामाणिक राहत, आपल्यापरीने उत्कृष्ट देण्याची वृत्ती आपल्याला बाह्य नकारात्मक गोष्टींच्या दुष्प्रभावापासून सुरक्षित ठेवते. चांगल्या कर्माची फळे ही चांगलीच असतात, यावर विश्वास ठेवणाऱ्या डॉ. येळीकर यांना इतरांच्या गुणांची, कष्टांची दखल घेणे, कौतुक करणे विशेष आवडते. त्यातूनच घाटीमध्ये कोविड काळात उत्कृष्ट काम केलेल्या प्रत्येकाचे कौतुक करण्याचा, जोखिमेच्या वेळी कामाला प्राधान्य देत उत्तम सेवा बजावणाऱ्या त्यांच्या टीम मेंबरच्या कामाची भरीव दखल घेण्याचा स्तुत्य प्रयत्न डॉ. कानन येळीकर यांनी कोविड कामगिरीच्या पुस्तिकेच्या रूपातून केला आहे. विविध विभागांच्या प्रमुखांपासून ते वॉर्डबॉय, शिपाईपर्यंत सर्वांनी केलेल्या कामाचे कौतुक त्यांच्या छायाचित्र आणि संक्षिप्त माहितीसोबत या पुस्तिकेत अंतर्भूत आहे.

मराठवाड्याच्या आरोग्य सेवेच्या आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घाटी या महाविद्यालय व रुग्णालयात गेली ३५ वर्षे सेवा देणाऱ्या डॉ. येळीकर यांनी या संस्थेत प्राध्यापक, डॉक्टर आणि आता अधिष्ठाता अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत. यामध्ये रुग्णांची प्रत्यक्ष सेवा, उपचार करण्याची डॉक्टरची भूमिका त्यांना विशेष आवडते. कुटुंबवत्सल असलेल्या डॉ. येळीकर या आपल्या कार्यक्षेत्रालाही आपल दुसरे कुटुंबच मानतात. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वात सर्व सहकारी गेल्या वर्षभरापासून कोविड संकटात त्याच उत्साहाने तळमळीने खिंड लढवत आहेत. त्या सर्वांच्या अथक प्रयत्नामुळे राज्यात घाटी कोविडच्या गंभीर स्थितीतील रुग्णांना बरे करण्यात अव्वल स्थानावर आहे. या संकटाच्या काळात कॅप्टन म्हणून आपल्यातील टीमस्पिरिट आणि कुटुंबप्रमुखांची, कॅप्टनची भूमिका प्रभावीपणे सांभाळणाऱ्या कानन येळीकर म्हणूनच घाटीच्या मदर फिगर अधिष्ठाता म्हणून लोकप्रिय आणि लक्षवेधी ठरतात.

**– वंदना थोरात,** माहिती अधिकारी, औरंगाबाद

## वॉर रूम हेच घर

महापालिकेचे नियमीत चालणारे काम प्रचंड असते त्यातच हे कोरोनाचे संकट ओढवल्याने खूप मोठी जबाबदारी पालिकेवर येऊन पडली. पनवेल महापालिकेची स्थापना होऊन थोडाच काळ झाल्याने कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित असल्याने कामाचे नियोजन करणे अवघड होत होते. असे असताना देखील पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली प्रशासन अधिक गांभीर्याने कोरोना काळात आघाडीच्या सैन्यफळीसारखे लढायला लागले. त्यातच प्रामुख्याने नव्याने रूजू झालेल्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनीही कामाला जोमाने सुरुवात केली. याआधीचा कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई महानगरपालिकेतील प्रशासकीय अनुभव त्यांच्या गाठीशी होता, तो या ठिकाणी उपयोगी आला.



**तृप्ती सांडभोर**
अतिरिक्त आयुक्त,
पनवेल, मनपा

आयुक्तांच्या सूचना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवत त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी जातीने लक्ष दिले. एका बाजूला नियम राबवायचे त्याचबरोबर नागरिकांत असंतोष पसरू नये, याची काळजी घ्यायची, अशा दुहेरी भूमिका त्यांना पार पाडाव्या लागत होत्या. पनवेल हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. पूर्ण रायगड जिल्ह्याचा कोरोना रुग्णांचा भार पनवेल महापालिकेवर होता. त्यामुळे इथे घेतलेला निर्णय कोकणच्या एकूण आरोग्याशी निगडीत होता, हे ओळखून पनवेल महापालिकेने अत्यंत जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने कार्य केले.

श्रीमती सांडभोर यांनी त्या त्या स्तरावर महापालिकेतील सर्वच विभागांशी समन्वय साधून नागरिकांची गैरसोय होणार नाही, याकडे विशेष लक्ष दिले. आयुक्त सुधाकर देशमुख यांनी प्रशासनाला एक टीम म्हणून अधिक गतिमान तर केलेच परंतु या टिमला प्रोत्साहीत करण्याचे, त्यांचा उत्साह वाढवण्याचे काम तृप्ती सांडभोर यांनी अगदी लीलया केले. रुग्णांचे संपर्क, चाचणी, ट्रेसिंग, डिस्चार्ज यांच्या व्यवस्थापनावर त्यांनी विशेष भर दिला. कोरोनाचे व्यवस्थापन करण्यासाठी 'वॉर रूम' हेच त्यांचे कार्यालय आणि घर झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालय यंत्रणा, पालिका आणि इतर विविध विभागांशी समन्वय साधण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. याचबरोबरीने रूग्णांची माहिती अद्ययावत करणारे सॉफ्टवेअर वापरून रूग्णांसाठी बेडस् उपलब्ध करण्याचे अतिशय क्लिष्ट काम त्यांनी हाताळले. त्यामुळे अधिकाधिक रूग्णांना सहज बेड्स उपलब्ध होऊ लागले, पर्यायाने रुग्णांचे होणारे कष्ट कमी झाले.

'माझे कुटुंब माझी जबाबदारी' लोकांमध्ये रूजण्यासाठी घरोघरी जाऊन आरोग्य तपासणीचे नियोजन केले. त्याचा सातत्याने आढावा घेण्याचे काम श्रीमती सांडभोर यांनी केले. विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन नागरिकांमध्ये जनजागृतीचे काम त्यांनी केले. विशेषत: कोरोना पॉझिटिव्ह येणाऱ्या रुग्णांची संख्या ज्या ठिकाणी जास्त आहे अशा इमारती सील करून कोरोनाची साखळी तोडण्यावर त्यांनी भर दिला. हे सगळे काम करताना स्वत:ला आणि आपल्या कुटुंबाला कोरोनाची लागण होऊनही कच न खाता, न डगमगता त्यातून बाहेर पडून त्यांनी अधिक उत्साहाने पुन्हा काम सुरू केले.

कोरोनाचा संसर्ग आटोक्यात येतानाच पनवेल शहरातील विकासकामे जलदगतीने सुरू करून पूर्ण करायचे लक्ष्य त्यांच्यासमोर होते. शासनाची अमृत योजना, प्रधानमंत्री आवास योजना यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी हाताळले. महानगरपालिकेचे बांधकाम विभागाचे विविध प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्यासाठी नियोजन करून कामाची गुणवत्ता आणि गती यातील योग्य मेळ त्या साधत आहेत. सामाजिक भान राखत महिला व बालकल्याण विभागाचे धोरण त्यांनी आखले आहे. अजूनही कोरोना नियंत्रणाबरोबरच आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका टीमला सोबत घेऊन इतर विकासकामे प्रगतिपथावर नेण्याचे श्रीमती सांडभोर यांचे अविरत प्रयत्न सुरू आहेत.

**– व्ही.पी. कुलकर्णी,**
जनसंपर्क अधिकारी, पनवेल महानगरपालिका


**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व**
**अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन**
**तक्ता – ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : अनिल आलूरकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : अनिल आलूरकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : डॉ. दिलीप पांढरपट्टे |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी अनिल आलूरकर असे जाहीर करतो की,
माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**अनिल आलूरकर**
**मुद्रक व प्रकाशक**

**कोरोना संकटात लॉकडाऊन काळात शाळा बंद होताच मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी प्रयोगशील शिक्षकांनी विविध मार्गांचा अवलंब करून शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवली. कुणी ऑनलाईन शिक्षणाचे प्रयोग केले तर कुणी शिक्षण साहित्य वाटून फोनवरून संपर्क करत शिक्षण सुरू ठेवले. अशा प्रयोगशील शिक्षिकांची प्रातिनिधिक ओळख...**

# शिक्षण अखंड सुरू

**संतोष मुसळे**

नाशिक इगतपुरी रस्त्यावर वसलेले साडेतीन हजार लोकसंख्येचे विल्होळी हे गाव. येथील शाळेतील शिक्षकांनी आपल्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या आधारे गावातच शैक्षणिक नंदनवन तयार केले आहे. लॉकडाऊनच्या काळात मात्र शाळा दुरावणार हे लक्षात येताच उपक्रमशील शिक्षिका शीतल शिंदे यांनी इयत्ता चौथीतील मुलांना दररोज शिकण्यात गुंतवून चार महिने मुलांना ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षण दिले.



शीतल शिंदे

१७ मार्चपासून शाळा बंद झाल्या. मात्र श्रीमती शिंदे यांच्यासमोर एक नवीनच प्रश्न उभा राहिला. त्या ज्या तिसरीच्या वर्गाला शिकवत होत्या तो सेमी इंग्रजी माध्यमाचा वर्ग होता. वर्षभर मुलांना इंग्रजी भाषेची गोडी त्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून लावली होती. मात्र आता परत मुले शिक्षणापासून दुरावतील अशी भीती त्यांना वाटत होती.

दरम्यान ऑनलाईन शिक्षणाचे वारे वाहायचेच होते त्यापूर्वीच त्यांनी सुरुवातीलाच आपल्या वर्गाच्या मुलांचा व्हॉट्सॲप समूह तयार केला होता. याचा आधार घेऊन वर्गातील २९ विद्यार्थ्यांपैकी २५ मुलांच्या पालकांकडेच अँड्रॉइड फोन होते. या मुलांना त्या १७ मार्चपासून दररोज होम वर्क देत होत्या.

दररोज मुलांनी केलेला गृहपाठ त्या व्हॉट्सॲपवर तपासून त्यात असलेल्या चुका मुलांच्या लक्षात आणून देत होत्या. ज्या मुलांकडे अँड्रॉइड फोन नाही अशा पालकांच्या फोनवर फोन करून मुलांनी सोडवलेल्या गृहपाठाचे वाचन करायला लावून त्यातील चुका मुलांना समजावून सांगून मुलांच्या आईंशी मुलांच्या प्रगतीबाबत चर्चा करत होत्या.




पालकांच्या सहकार्याने १८ जूनपासून 'गुगल मीट' या ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून शिक्षण देणे सुरू केले. यात मुले व शिक्षिका एकमेकांना दिसत असल्यामुळे मुलांना शाळेचा अनुभव येत होता. मुलांना ऑनलाईन क्लासचा कंटाळा येऊ नये म्हणून कोलाज काम, चित्रकला स्पर्धा, गणपती तयार करणे, राखी बनवणे असे विविध उपक्रमदेखील त्यांनी घेतले. करसिव्ह रायटिंग व पाढे पाठांतर करणे हे उपक्रमदेखील सुरू आहेत. त्यामुळे मुले अगदी आनंदाने नियमितपणे क्लासला जॉईन होतात.



मंगल आहेर गावडे

## खुरपणी करताना शिक्षण

महाराष्ट्रात लॉकडाऊननंतर शाळा बंद झाल्या. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी येथील महात्मा फुले विद्यालयात काम करणाऱ्या मंगल आहेर गावडे यांनी या काळात ऑनलाइन शिक्षणासाठी केलेले काम नजरेत भरावे असे आहे. लॉकडाऊन सुरू होताच त्या कुटुंबासह गावी राहण्यास आल्या. गावाकडे शेतीची कामे सुरू होती. श्रीमती आहेर इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती वर्गाला गेल्या २३ वर्षांपासून अध्यापन करत आहेत. शिष्यवृत्तीसाठी ग्रामीण जीवनाशी संबंधित बराचसा पाठ्यभाग आहे.

शेतीची कामे करता-करता त्यांनी पाठ्यभागाशी संबंधित माहितीचे मोबाईलच्या साहाय्याने

## ‘स्मार्ट पाटी’च्या माध्यमातून शिक्षण

जिल्हा परिषद शाळा आगवन शिशुपाडा तालुका डहाणू जिल्हा पालघर शाळेतील १० टक्के पालकांकडेही स्मार्ट फोन नाही मग इंटरनेटचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशा वेळी आपण आपल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा चालू ठेवणार यावर विचार करताना शिक्षिका वरुणाक्षी आंद्रे यांनी इयत्ता दुसरीच्या वर्गासाठी केलेल्या ‘स्मार्ट पाटी’ या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांचे शिक्षण चालू ठेवले.



वरुणाक्षी आंद्रे



लॉकडाऊन काळात शाळा बंद पण शिक्षण चालू ठेवण्यासाठी श्रीमती आंद्रे यांनी पालकांना तांदूळ वाटप करताना विद्यार्थ्यांनाही स्केचपेन व स्मार्ट पाट्यांचे वाटप केले आहे. स्मार्ट पाटीला लॅमिनेशन असल्यामुळे आपण पाटीस साबणाने सॅनिटायझरने धुऊन घेऊ शकतो. त्यामुळे स्मार्ट पाटी एकमेंकाकडे हस्तांतरण केल्यास कोणताही धोका निर्माण होणार नाही.

मराठी भाषा विषयाच्या आकलनासाठी लेखनवाचन कौशल्य आत्मसात करण्यासाठी कोणकोणत्या बाबींचा सराव आवश्यक आहे याचा अभ्यास करून यावर आधारित सर्व घटक पेजवर लिहून त्याच्या प्रिंट काढण्यात आल्या. यात प्रामुख्याने वाचन-लेखनाचा सराव व्हावा याचा विचार करूनच मुळाक्षरांचे अवयव, मुळाक्षरे गिरवणे, चौदाखडी अक्षरापासून शब्द तयार करणे, अक्षरकोडी सोडवणे, वाक्य तयार करणे अशा प्रकारच्या पाट्या तयार करून घेतल्या. काही पाट्यांची पुढील बाजू लिहिलेली व मागील बाजू सरावासाठी कोरी ठेवण्यात आलेली आहे. लॅमिनेशन केलेल्या पाटीवर विद्यार्थी सूचनापूर्वक स्केचपेनने गिरवणे, मागच्या बाजूला लिहिलेले पाहून लिहिणे, अक्षरापासून शब्द तयार करणे, शब्द कोडी सोडवणे, चौदाखडी गिरवणे व मागील बाजूस पाहून लेखन करणे अशा प्रकारे स्वयंअध्ययन करतात. लॅमिनेशनमुळे स्केचपेनचे लिहिलेले सहज पुसले जाते. या उपक्रमामुळे विद्यार्थांच्या संपादणुकीत सकारात्मक बदल झाल्याने हा उपक्रम सद्य:स्थितीत देखील सुरू आहे.

शूटिंग करून घेऊन त्यांच्या साहाय्याने काही पाठ तयार केले. हेच पाठ यू-ट्युबवर यशोदीप शिष्यवृत्ती मार्गदर्शन या यू-ट्युब चॅनेलद्वारे स्वत:च्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात केली. यामध्ये त्यांनी खुरपणी करताना, खते व बियाणांची माहिती देणे. सिंचनाच्या पद्धती, नद्या व धरणे व नद्यांची उगमस्थाने प्रत्यक्ष धरणाच्या सान्निध्यातून सांगणे, वनस्पतींचे प्रकार, वनस्पतींचे अवयवानुसार वर्गीकरण, प्राण्यांचे अधिवास, शेती अवजारे, सुधारित शेतीच्या पद्धती हे पाठ त्यांनी प्रत्यक्ष वस्तू आणि प्राणी दाखवून त्याचे व्हिडिओ बनवले, तर स्वाध्यायाची उत्तरे व्हॉट्सॲपचा वापर करून विद्यार्थ्यांकडून घेतली.

पुढे त्यांनी शेतातील आंब्याच्या झाडाला व्हाईटबोर्ड लावून त्यावर गणिताच्या पाठांचे व्हिडिओ तयार केले. हे त्यांचे व्हिडिओ त्यांच्या स्वत:च्या वर्गासाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत. त्यांचा शेतात खुरपणी करताना अध्यापनाचा व्हिडिओ महाराष्ट्रात प्रचंड व्हायरल झाला होता.

### समस्येवर तोडगा, वर्ग सुरू

लॉकडाऊन काळात ऑनलाइन शिक्षणाचे वारे वाहू लागले. मात्र स्मार्ट फोन नसणाऱ्या गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचे काय हा मोठा प्रश्न निर्माण झाला. यावर दौंड तालुक्यातील नांदूर शाळेतील शिक्षिका रोहिणी लोखंडे यांनी एक वेगळा मार्ग काढला. या शाळेत ऊसतोडीवाल्यांची मुले शिकतात. शाळा बंद असल्यामुळे इयत्ता सातवीतील २ मुले ऊसतोडणी करण्यासाठी जाऊ लागली. श्रीमती लोखंडे यांनी त्या मुलांच्या पालकांशी फोनवर बोलून त्यांच्या साध्या मोबाइलवरही शिक्षण देता येईल हे पटवून सांगितले.



रोहिणी लोखंडे

संध्याकाळी ही मुले ऊसतोडीवरून घरी आल्यावर त्यांचा फोनवर वर्ग सुरू होत असे. पाठ्यपुस्तके त्यांना मिळाली होती. एकाच वेळी पाठ्यपुस्तकातील एकेका पानाचे वाचन त्या घेत. छोटे छोटे घटक पाडून त्यांना समजावून सांगत. आशयाचे स्पष्टीकरण दिल्यावर प्रश्न विचारत. दोघेही त्याची उत्तरे देत. वहीत प्रश्न लिहायला सांगत, त्या त्यांची उत्तरे पाहू शकत नसल्या तरी त्यांनी लिहिलेली उत्तरे वाचायला सांगत. अशा प्रकारे दररोज एक तास फोनवर ही अनोखी शाळा चालत आहे.

आजघडीला प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. आहे त्या परिस्थितीत, उपलब्ध साधनांच्या माध्यमातून त्या आपले क्षितिज वाढवत आहेत. कुटुंबाची आर्थिक घडी बसवत आहेत. कृषी, उद्योग, लघुउद्योग, सेवा, शिक्षण, व्यवसाय आदी क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप महिला पाडत आहेत. मिळून साऱ्या जणी... म्हणावे असे एकमेकींची प्रेरणा घेऊन त्या नवे विश्व तयार करताना दिसत आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त काही प्रातिनिधिक यशकथा...

# उंच माझा झोका...



## 'तेजस्वी' ऊर्जा

**वर्धा जिल्ह्याच्या कवठा झोपडी येथील महिलांनी वेगळी वाट धरत उद्यमशीलतेत नवा आध्याय लिहिला आहे. अपारंपरिक ऊर्जेला बळ देतानाच गावातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा या महिला बचत गटाचा मार्ग राज्यातील इतर महिला गटांसाठी निश्चितच अनुकरणीय आहे.**

***सर्वांगीण एकतानता ! तिजसीच घडे एकात्मता !***
***जे जे ठरविलं ते सर्वथा ! करूनी सोडील माऊली ती !!***

महिलोन्नती या अध्यायातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या या ओळी वर्धा जिल्ह्याच्या कवठा झोपडी येथील महिलांनी अगदी खऱ्या करून दाखवल्या आहेत.

अपारंपरिक ऊर्जास्रोत म्हणून सौरऊर्जेचा वापर जगभरात झपाट्याने वाढत आहे. यात लागणारे सोलर पॅनेल हे अगदीच विदेशात किंवा मोठमोठ्या कंपन्यांमध्ये अतिउच्च शिक्षण घेतलेले लोकच तयार करत असतील हा आपल्यापैकी अनेकांचा समज असेल, मात्र वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्याच्या कवठा झोपडी येथील बचतगटाच्या २१४ महिलांनी सोलर कंपनी स्थापन करून एखाद्या निष्णात अभियंत्याप्रमाणे सोलर पॅनल तयार करून कंपनीचा टर्न ओव्हर ४० लाखांपर्यंत वाढवत हा समज खोटा ठरवला आहे. मागासवर्गीय महिलांद्वारे संचालित तेजस्वी सोलर पॅनल कंपनी ही अशा प्रकारची देशातील दुसरी आणि महाराष्ट्रातील पहिलीच कंपनी आहे.

### जेमतेम शिक्षण, पण उच्च ध्येय

शेतीची कामे करणाऱ्या, इयत्ता दहावीपर्यंतचे जुजबी शिक्षण झालेल्या कावठा झोपडी या गावातील बचतगटाच्या २१४ महिला सध्या सर्वांच्या चर्चेचा विषय ठरल्या आहेत. हरित ऊर्जा, महिला सक्षमीकरण आणि मागासवर्गीयांचे कल्याण या सर्वच बाबी एकाच प्रकल्पात या महिलांनी साध्य केल्या आहेत. कवठा झोपडी या गावाची लोकसंख्या १०६३ असून, ९० टक्के लोकसंख्या अनुसूचित जातीची असून मागासवर्गीय महिलांनी महिलांच्या सक्षमीकरणाला या कार्याद्वारे एक नवीन आयाम दिला आहे.

गावातील तेजस्वी सोलर एनर्जी मागासवर्गीय संस्था म्हणजे स्वतः महिलांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी बनवलेली एक महिला औद्योगिक को-ऑपरेटिव्ह कंपनी आहे. तेजस्वी सोलर एनर्जीची सुरुवात मार्च २०१८ मध्ये झाली. त्यामध्ये २१४ महिला २२० रुपयेप्रमाणे समभागधारक आहेत. त्यापैकी २०० महिला या मागासवर्गीय आहेत.

राज्य सरकारच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका मिशन (एसआरएलएम) द्वारा संचालित, उमेद अभियानाने आयआयटी-मुंबईच्या सहकार्याने या महिलांना मदतीचा हात दिला. आयआयटी-



केली जातात.

आयआयटी-मुंबईचे अमित देशमुख सांगतात की, डुंगरपूर आणि कवठा हे दोन्ही प्रकल्प खूप कठीण होते कारण ग्रामीण भागातील अगदी जुजबी शिक्षण झालेल्या महिलांना तांत्रिक ज्ञान देऊन त्यांना त्यात तज्ज्ञ करणे सोपे नव्हते. परंतु थोड्या मदतीने अशी अत्याधुनिक ऑपरेशन्स महिला करू शकतात, हे येथील महिलांनी सिद्ध केले आहे. दोन्ही प्रकल्प स्थानिक आणि स्थानिकांसाठी शाश्वत ऊर्जेचे स्थानिकीकरण करण्याचे ध्येय साध्य करण्याच्या उद्देशाने आहेत. देशमुख यांनी दोन प्रकल्पातील एक प्रमुख फरक निदर्शनास आणून दिला. डुंगरपूर, येथे चिनी मशीन्स तैनात केल्या आहेत, मात्र आत्मनिर्भर भारताच्या नव्या विचारसरणीचा एक भाग म्हणून कवठामध्ये भारत-निर्मित मशीन्स वापरल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईचे प्रकल्प संचालक अमित देशमुख यांनी ४४ महिलांना सौर पॅनेलच्या निर्मितीसाठी आवश्यक प्रशिक्षण दिले. सुरुवातीला या प्रकल्पातील १२ महिलांना दुर्गा सोलर एनर्जी (डुंगरपुर, राजस्थान) येथे सोलर पॅनल निर्मितीचे प्रशिक्षण दिले.

### वर्षभरात झाल्या अभियंता

वर्षभर अमित देशमुख यांनी कवठा झोपडी गावात राहून महिलांना विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले. यात प्रारंभिक चाचणी, कटिंग, टॅबिंग आणि स्ट्रिंग, इंटर कनेक्शन, व्होल्टेज-करंट तपासणी, ले-अपिंग, लॅमिनेशन, स्लाइसिंग, जंक्शन बॉक्स फ्रेमिंग आणि अंतिम चाचणी यांसारख्या प्रक्रियांचा समावेश आहे. काही प्रक्रिया थेट संगणकाद्वारे केल्या जात असल्यामुळे काही महिलांनी संगणकाचे ज्ञानही अवगत केले. खरेतर एका वर्षात महिलांना एक प्रकारे अभियंता घडवण्याचे अतिशय कठीण काम होते, असे देशमुख सांगतात.

शिवाय कंपनी चालविण्यासाठी लागणारे कौशल्य, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक व्यवस्थापन, अकाऊंट, टॅली, कच्चा माल ऑनलाइन मागवणे, उत्पादित माल विक्रीसाठीचे कौशल्य आदी बाबींही महिला स्वतः हाताळतात. गावातच ५००० चौ.फूट क्षेत्रामध्ये पसरलेले, संपूर्ण वातानुकूलित सोलर पॅनल निर्मिती युनिट वार्षिक २.५ मेगावॅट क्षमतेसह सौर पॅनेल तयार करत आहेत. यात २.५ वॅट ते १०० वॅट क्षमता असलेले पॅनेल तयार केले जात आहेत. गटातील चार-पाच महिलाच पदवीधर आहेत. त्यापैकी एक संगीता वानखेडे सांगतात, बहुतेकींचे शिक्षण दहावी-बारावीपर्यंतचे आहे, तरीही अत्याधुनिक आणि तांत्रिक प्रावीण्यता मिळवून त्या एखाद्या अभियंत्याप्रमाणे काम करत आहोत. या कामामुळे आम्हाला खूप आत्मविश्वास मिळाला आहे. संपूर्ण युनिट २५ ते ४० वर्षे वयोगटांतील २५ महिलांच्या गटाद्वारे चालवले जाते. यात सौर पॅनेल तयार करण्यापासून लेखा ठेवण्यापर्यंत सर्व कामे

### दिशा देणारा प्रकल्प

तेजस्वी सौर ऊर्जा कंपनीला जिल्ह्यातील आठ तहसीलांमधील ४४ ग्रामपंचायतींसाठी २०० पथदिवे संपूर्ण युनिटसह तयार करण्यासाठी ४० लाख रुपयांचे काम मिळाले आहे. त्यांच्या या कार्याची दखल उपमुख्यमंत्र्यांनी घेतली असून, त्यांच्या उत्पादनाची गुणवत्ता तपासून त्यांना राज्यातील अपारंपरिक ऊर्जाक्षेत्रातील कामे देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला आहे.

अनेक अडचणींवर मात करून या महिलांनी हे यशाचे शिखर गाठले आहे. हा प्रकल्प राज्याला दिशा देणारा ठरला असून या महिलांनी एकाचवेळी बेरोजगारी, ग्रामीण भागातून होणारे स्थलांतरण, ऊर्जा निर्मितीसाठी होणारे प्रदूषण यासारख्या गंभीर समस्यांना ग्रामीण औद्योगिकरणाचा एक प्रभावी पर्याय दिला आहे.

**– मनीषा सावळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

## बहिणी–बहिणींची शेती !

जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर शेतीही फायदेशीर होऊ शकते हे दाखवून दिले आहे बनचिंचोली (ता. हदगाव, जि. नांदेड) येथील दोन बहिणींनी. पूजा (वय १७) आणि धनश्री (वय १९) या मुलींनी शेतीलाच शाळा करून त्यातून आपल्या आई-वडिलांना आर्थिक आधार दिलाच त्याशिवाय शेती ही व्यावसायिक पद्धतीने केली तर फायद्याची ठरते याचा वस्तुपाठ घालून दिला.

बनचिंचोली हे अवघ्या साडेतीन हजार लोकसंख्येचे गाव. या गावातील शेतकरी कुटुंबापैकी एक असलेले कुटुंब पऊळ यांचे.

पिढीजात असलेली नऊ एकर शेती परवडेनाशी झाल्याने गणेश पऊळ वाहनचालकांची खासगी नोकरी पत्करून कसाबसा संसार सावरत होते. त्यांची होणारी आर्थिक ओढाताण त्यांच्या दोन मुली पूजा आणि धनश्री जवळून पाहत होत्या. आठवीपर्यंच शिक्षण घेऊन त्यांनी पुढे शेतीलाच शाळेचे स्वरूप दिले. घरचीच शेती असल्यामुळे पेरणीपासून वखरणीपर्यंत नांगरणीपासून तण काढेपर्यंतची सारी कामे त्यांनी शिकून घेतली होती. यात एक नैपुण्य जे लागते ते त्यांनी स्वत: शेतात राबवून हाती घेतले.

### ठिबकचा फायदा

पऊळ यांना पाच अपत्ये असून चार मुली व एक मुलगा आहे. पत्नीसह सात जणांची जबाबदारी कुटुंबप्रमुख म्हणून त्यांची आहे. परिस्थिती बेताचीच असल्याने लोक काय म्हणतील, याकडे लक्ष न देता पूजा व धनश्री यांनी शेतीकडे वळणे अधिक सुरक्षित मानले. मुलीचे हे धाडस पाहून कुटुंबातील इतर सदस्यही शेतीकडे वळले. घरचेच मनुष्यबळ शेतीसाठी उपलब्ध झाल्यामूळे त्यांचा मजुरीसाठी



द्यावा लागणारा खर्च वाचला. त्यांच्या शेतीपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावरून पैनगंगा नदी वाहत असल्याने त्याचा अप्रत्यक्ष लाभ झाला. या परिसरात विशेषत: त्यांच्या शेतात कूपनलिकेला चांगले पाणी लागले. पाण्याची उपलब्धता झाल्यामूळे पूजा व धनश्री यांनी त्यांच्या शेतामध्ये ऊस, कापूस, सोयाबीन, हरभरा, टरबूज, मिर्ची या पिकांचे प्राधान्याने उत्पादन घेण्याला पसंती दिली. वडिलांचा उपलब्ध असलेला वेळ घेत त्यांनी या पिकांचे नियोजन स्वत: करून दाखवले. उपलब्ध असलेले पाणी सर्व पिकांना व विशेषत: नोव्हेंबर ते जुलैपर्यंत पुरावे यासाठी ठिंबक सिंचनचा पर्याय त्यांनी निवडला. या तंत्रज्ञानामुळे पिकांना आवश्यक तेव्हा ताण देणे हेही शक्य झाले. पाण्याचा या आधुनिक व्यवस्थापनासमवेत त्यांनी पारंपरिक पेरणीला छेद देत सरीवंरबा पद्धतीचा वापर करून मल्चिंग पद्धतीचा वापर केला. पेरणीला जे बियाणे निवडले ते अर्धा तास कोमट पाण्यात भिजवून नंतर दीड इंच जमिनीत पेरले.

इतर पिके घेताना हवामानाचा व वातावरणाचा अभ्यास करून पिकांची लागवड करण्याचे कसब या दोन बहिणींनी आत्मसात केले. पिकावर कीड, रोग पसरू नये म्हणून फवारणी करण्यासाठी निमअर्क, निमोल यांचा त्यांनी प्राधान्याने वापर केला. जास्तीत जास्त सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करून नवनीवन तंत्रज्ञान शिकून शेतात नवीन उपक्रम राबवण्यात या भगिनींचा हातखंडा बनला आहे. दशपर्णी, अर्क, जीवामृत स्वत: तयार करून सेंद्रिय जिवाणू, गांडूळ खत तयार करून निसर्गपूरक शेतीला आता त्यांनी प्राधान्य दिले आहे.

पिकांची लागवड करताना प्रामुख्याने त्यांनी आता 'जे विकेल तेच पिकेल' या धोरणाला जवळ केल्यामूळे शेती उत्पादनाला बाजारपेठेची जास्त अडचण त्यांच्या पुढे निर्माण झाली नाही. पारंपरिक पिकाला छेद देत त्यंनी वर्षातून दोन वेळेस टरबुजाचे पीक घेतले. ६५ दिवसांचे हे पीक असल्यामुळे बाजारात ज्या महिन्यामध्ये याला मागणी असते तो काळ निवडला. त्यांनी टरबूज पीक व मल्चिंगसाठी शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे. टरबुजाची बाजारपेठ लक्षात घेऊन त्यांनी हा शेतमाल विक्री करण्यासाठी नांदेड, हैद्राबाद, मुंबई, दिल्ली हरियाणा, पंजाब येथील बाजारपेठा निवडल्या.

### बाजाराचा अभ्यास हवा

पूजा पऊळ यांना शेती फायद्याची आहे की तोट्याची असे विचारले असता वर्षाला एकरी एक लाख रुपये उरतात. भाव चांगला मिळाला तर आणखीही फायदा होतो, असे तिने स्पष्ट केले. त्यामुळे शेतीत स्वत: लक्ष देऊन, जीव ओतून केल्यास कधीही तोटा होणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. बाजाराचा अभ्यास करूनच विकते तेच पिकवले पाहिजे, असे तिने सांगितले. शेतकऱ्यांनी शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणून पशुपालन किंवा मधुमक्षिकापालन करायला पाहिजे, असेही तिचे म्हणणे आहे. यासाठी शासनाच्या योजनांचा फायदा घेतल्यास जास्त नफा मिळतो. या कुटुंबाने घरच्या दुधासाठी गाय व म्हशी विकत घेतलेल्या आहेत. या दोघी बहिणींना शेतीच्या उत्कृष्ट नियोजनासाठी कृषी विभागाने गौरवले आहे. आजवर धनश्रीची मला शेती करताना खूप खंबीर साथ राहायची. तिचे नुकतेच लग्न झाल्यामुळे आता मी माझ्या शाळेतील बहिणीला सोबत घेऊन शेती करण्यासाठी प्रवृत्त करत असल्याचे पुजाने सांगितले. आधुनिक शेतीसाठी प्रगतशील शेतकरी म्हणून कृषी खात्याचा या दोघींना एक पुरस्कार मिळाला आहे.

**– अलका पाटील,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

## खडतर प्रवास करून चमकलेली दामिनी

जालन्याच्या पोलीस अधिक्षक कार्यालयात दामिनी पथक म्हणून कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पल्लवी भाऊसाहेब जाधव यांचा प्रवास खडतर होता. अल्पशिक्षित आणि तुटपुंज्या साधनावर संसार चालवणाऱ्या आई-वडिलांच्या पोटी जन्मलेल्या पल्लवी यांनी जिद्दीने शिक्षण घेतले आणि पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले. आई-वडिलांनीही तिच्या स्वप्नांना बळ दिले.

औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील रेलगाव या हजार ते बाराशे लोकसंख्या असलेल्या दुर्गम गावात पल्लवीचा अल्पभूधारक व शेतमजूर कुटुंबात जन्म झाला. त्यांना हातभार लागावा म्हणून अगदी बालपणापासूनच तीही रोजंदारीने मजुरी करी. पण शिक्षणाचा वसा सोडला नाही, रेलगावात चौथीपर्यंतच शाळा पुढे गावापासून तीन किलोमीटर दूर असलेल्या कनकावतीनगर येथे रोज पायी जाऊन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. बारावीनंतर कन्नड



**पल्लवी जाधव**
पोलीस उपनिरीक्षक, जालना

येथील शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेऊन मानसशास्त्र विषयात बी.ए. पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी औरंगाबाद येथे जाण्याची इच्छा होती; परंतु गावातील माझ्या सर्व वर्गमैत्रिणींचे विवाह झाल्याने आई-वडीलदेखील तिचे लग्न लावून देण्यावर ठाम होते. अशातच पाहुण्यातील एका आजोबांनी तिच्या महत्त्वाकांक्षेला खतपाणी घातले आणि आई-वडिलांचे मन वळवले. एमपीएससी करण्याचाही त्यांचाच सल्ला तिने मानला. पुढे तिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेतला व एमपीएससीचा अभ्यास सुरू केला. त्या वेळी बचतगटाचे कर्ज काढून माझ्या कुटुंबीयांनी मला ५ हजार रुपये दिले. ‘कमवा आणि शिका’ या योजनेत काम करून २०१५ मध्ये ८० टक्के गुण मिळवून एम.ए. मानसशास्त्र केले आणि याच वर्षी दुसऱ्या प्रयत्नात पीएसआय परीक्षेत यश मिळाले. प्रोबेशनरी ऑफिसर असताना झालेल्या ट्रेनिंगमध्ये पुणे येथे मैदानी व लेखी चाचणीमध्ये महिला अधिकाऱ्यांमधून प्रथम येण्याचा मान त्यांना मिळाला. कदीम जालना पोलीस ठाण्यात अडीच वर्ष काम केल्यानंतर जिल्ह्यातील दामिनी पथक प्रमुख म्हणून नियुक्ती मिळाली.

दामिनी पथकात काम करताना महिला व मुलींसाठी विशेष काम करण्याची संधी मिळाली. महिलांचे अधिकार, महिलाविषयक कायदे, बालकांचे अधिकार, बालकांचे कायदे यावर जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम त्या आता घेत आहेत. तसेच स्वसंरक्षण प्रात्यक्षिके शिबिरे राबवत जालना जिल्ह्यातील हजारो विद्यार्थिनींना व मुलींना स्वसंरक्षणाचे धडे त्यांनी दिले आहेत. तसेच मागील दोन महिन्यांत ८ बालविवाह थांबवून पालकांना बालविवाह प्रतिबंध कायद्याची माहिती देऊन जनजागृती कार्यक्रम घेतले. कोविड काळात कोविड सेंटरला कर्तव्य बजावत कोविड जनजागृतीही केली.

या कामाची दखल घेत परिवर्तन फाऊंडेशन वाशी, मुंबई यांनी २०२० च्या कणखर सावित्री गुणगौरव पुरस्कारासाठी त्यांना नामांकन दिले आहे. तसेच महिला दिनानिमित्त मेहकर बुलडाणा येथील मर्दानी संस्थेकडून मी मर्दानी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला, तर दैनिक लोकमत व क्लब माय इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने शौर्य क्षेत्रातील तेजस्वी स्त्रीरत्न २०२० हा पुरस्कार देऊन त्यांनी सन्मानित केले आहे. शासकीय खात्यात नोकरी करताना अभिनय क्षेत्रात काम करण्याची आवड असल्याने त्यांना, लॉकडाऊन व पासवर्ड या दोन सामाजिक कथा असलेल्या लघुपटात देखील काम केले आहे.

## ग्लॅमॉन मिस इंडिया



खाकी वर्दीतील नोकरी सामान्यपणे रूक्ष मानली जाते. मात्र आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून जीवनातील इतर क्षेत्रातही यश मिळवता येते, याचा वस्तुपाठही उपनिरीक्षक जाधव यांनी घालून दिला आहे. राजस्थानमधील जयपूरमध्ये पार नुकत्याच पार पडलेल्या ‘ग्लॅमॉन मिस इंडिया-२०२०’ या स्पर्धेत उपविजेता होण्याचा बहुमान त्यांनी पटकावला आहे. ही स्पर्धा जयपूरमध्ये फेब्रुवारी २०२० मध्ये पार पडली. या स्पर्धेत फर्स्ट रनर अप किताबसोबतच ‘मिस फोटोजेनिक ऑफ ग्लॅमॉन मिस इंडिया २०२०’ हा पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

**महिलांना आर्थिक आणि प्रशिक्षणाची ताकद दिली तर त्या आपल्या कुटुंबाचाच आधार होत नाहीत तर त्या समाजाच्या आर्थिक प्रगतीच्या कारक ठरतात. महिला आर्थिक विकास महामंडळ अर्थात माविमने साथ दिल्याने महिलांनी केवळ स्वयंरोजगार निर्माण केले नाहीत, तर राज्याच्या विकासात एका अर्थाने आपला वाटा उचलला आहे.**

# स्वयंपूर्णतेचा मार्ग

महाराष्ट्र शासनाने राज्यात प्लास्टिकबंदी लागू केली आहे. प्लास्टिक बॅग्जपासून होणारे पर्यावरणाचे नुकसान सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळे कापडी पिशव्या बनवणे या व्यवसायास महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु राज्यात कापडी पिशव्यांच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी आहे. हे लक्षात घेता सप्टेंबर २०१९ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा कार्यालय ठाणे अंतर्गत अनगाव येथील क्रांतिज्योती लोकसंचालित साधन केंद्र व जिल्हा नियोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने तेजस्विनी गारमेंट युनिट सुरू करण्यात आले.

भिवंडी परिसरात अनेक बड्या खासगी कंपन्याचे तयार कपडे शिवणारी (गारमेंट) युनिट्स असून, येथे आसपासच्या परिसरातील टेलरिंग कामात कुशल असलेल्या महिला मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. गेली अनेक वर्ष कंपनीने दिलेल्या ऑर्डरची पूर्तता करताना आपल्या मनातील चांगली डिझाईन दुर्लक्षित ठेवण्याची वेळ त्यांच्यावर सातत्याने येत होती. परंतु या महिलांना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या मदतीमुळे स्वयंपूर्णतेचा मार्ग गवसला आहे. भिवंडीतील अनगावमध्ये सप्टेंबर २०१९ महिन्यात सुरू झालेल्या या उद्योगाने व्यवसायाचे सर्वेक्षण केले. त्या वेळी या भागातील ६ हजार महिलांपैकी सुमारे एक हजार ४०० महिला शिवणकामात पारंगत असल्याचे समजले. तेव्हा या महिलांना गावातच कपडे, पिशव्या तयार करण्याचे युनिट उभारून देण्याचे प्रयत्न सुरू झाले. जिल्हा नियोजन विभाग आणि महिलांनी स्वतःची घातलेली पुंजी एकूण २० लाखांची गुंतवणूक या युनिटसाठी करण्याचे निश्चित केले गेले. त्या आधारे आनगाव येथील एका जीर्ण इमारतीची दुरुस्ती करून या महिलांनी तेजस्विनी गारमेंट युनिटची सुरुवात केली. त्यानंतर सर्व सोयींनीयुक्त असे २४ आधुनिक मशीन असलेले युनिट महिलांनी कार्यरत केले.

उद्योगाच्या पुढील टप्प्यामध्ये भिवंडीतील खासगी कंपन्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याकडून वेगवेगळ्या कामाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यास त्यांनी सुरुवात केली. एका खासगी कंपनीकडून मॉलमधील शूज विक्रीसाठीच्या बॅगची पहिली ऑर्डर त्यांना मिळाली. त्यानंतर लॅपटॉप, टिफिन बॅग, ज्यूट बॅग बनवण्यास त्यांनी सुरुवात केली. अशा मागण्या वाढू लागल्या. त्यानंतर महिलांनी वारली पेंटिंगच्या उद्योगाचा यामध्ये समावेश करत तयार बॅगवर वारली पेंटिंग काढणे, पॉट आणि फ्रेमस बनवण्यासही सुरुवात केली. रेमंडसारख्या आता मोठ्या खासगी कपंन्यांबरोबर व्यवसाय सुरू केला असून, त्यातून येथील महिलांना 'स्वयंपूर्णतेचा धागा' मिळाला आहे.



महिला आर्थिक विकास महामंडळ ही राज्यातील महिला सबलीकरणाचे कार्य करणारी शिखर संस्था असून या माध्यमातून राज्यात बचतगटांची स्थापना करण्याची व्यापक चळवळ राबवण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील अशाच बचतगटांचे एकत्रीकरण करून त्यांच्या फेडरेशनची निर्मिती करण्यात आली. या संस्थांच्या माध्यमातून प्रामुख्याने कृषी व्यवसायावर भर देण्यात आला.

## उत्तम प्रतिसाद

महिला आर्थिक विकास महामंडळाने भिवंडीतील महिलांच्या कंपनीने या महिलांना कामे देण्याची तयारी सुरू केली आहे. युनिटमधील महिलाच कच्चा माल आणण्यापासून ते तयार माल ऑर्डरप्रमाणे पोहोचवण्याचे काम करतात, रोजचा हिशोब ठेवणे, हजेरी घेणे, युनिटमधील सर्व साहित्य व्यवस्थित सांभाळणे इ कामे त्या त्यांच्या लोकसंचालित साधन केंद्राच्या (फेडरेशन) व्यवस्थापिका अरुणा गायकवाड व लेखापाल संदीप शिंदे यांच्या मदतीने करतात.

सध्या या युनिटमध्ये २० हायटेक शिलाई मशीन, दोन ओव्हर लॉक मशीन, एक कटिंग मशीन, एक सिलेंडर बेड मशीन अशा एकूण २४ मशीनवर काम सुरू आहे. या युनिटमध्ये २४ महिला मशीनवर, तर सहा महिला पॅकिंग आणि लेबलिंगची कामे करतात. या महिलांना कुटुंब सांभाळून उद्योगातून चार ते सहा हजारापर्यंत मासिक उत्पन्न

## प्रगतीचे नवे साधन ई-रिक्षा



विकासापासून वंचित अशी भंडारा जिल्ह्याची ओळख आहे.रस्त्यांबरोबरच वाहतुकीची साधनेही प्रगतीचे कारक असतात. भंडारा जिल्ह्यात याचीच कमतरता असल्याने हा जिल्हा मागासलेला राहिला आहे. गावकऱ्यांना तालुका किंवा बाजारपेठेत जाण्यासाठी २ ते ५ कि.मी.ची पायपीट करावी लागत होती. आपत्कालीन परिस्थितीतही वाहतुकीचे साधन उपलब्ध नाही. या सर्व अडचणी लक्षात घेऊन भंडारा जिल्ह्यातील माविमने ई-रिक्षाची संकल्पना मांडली आणि प्रत्यक्षातही उतरवली.

माविमतर्फे यासंबंधीचा प्रस्ताव तयार करून जिल्हा नियोजन विभागास पाठवून १ कोटी १५ लाखांचा निधी मंजूर करवून घेतला गेला व ५० बचतगटांना ५० ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले. यात लाभार्थ्यांनी १० टक्के गुंतवणूक केली.या व्यवसायामुळे महिला व कुटुंबात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांचे जीवनमान उंचावले. महिलांना दररोज ३०० ते ५०० रुपयांचा रोजगारही उपलब्ध झाला आणि ग्रामस्थांना प्रवासाचे साधन प्राप्त झाले. कष्ट व वेळेची बहुमोल बचतही झाली.

या ई-रिक्षांच्या माध्यमातून महिला रिक्षाचालकाचे काम आत्मविश्वासाने करू लागल्याने त्यांच्याबद्दल आदरभावनाही वाढीस लागली. महिलांकडे पाहायचा ग्रामस्थांचा दृष्टिकोनही बदलला. ई -रिक्षांमुळे वाहतुकीचे सुलभ साधन तर उपलब्ध झालेच परंतु पर्यावरण रक्षणाचेही महत्त्वाचे कार्य यानिमित्ताने झाले.

मिळते. आपल्या मनाप्रमाणे काम करण्याचे स्वातंत्र्य त्यांना या माध्यमातून मिळते. कोविडच्या काळात याच महिलांनी मास्कही तयार करून त्यांची विक्री केली.

## तेजस्विनींनी पिकवले मोती!

शुभ्र मोत्याची माळ आणि स्त्रियांचे भावनिक नाते घरोघरी बघायला मिळते. मोती समुद्रात मिळतात असाच सार्वत्रिक समज आहे. परंतु, मोती उगवतासुद्धा येऊ शकतात! होय, मोत्यांची शेती पिकवता येते. ही शेती बघण्यासाठी फार दूर जायचेही काम नाही. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी येथील दुर्गामाता बचतगट चक्क शिंपल्यातील मोती पिकवत आहेत. अर्थात ही शेती मातीत करायची नसून, गोड्या पाण्यातील आहे.

विदर्भ विकास मंडळ, नागपूर व माविम, यवतमाळ यांच्या साहाय्याने मानव विकास कार्यक्रमांतर्गत 'मोती संवर्धन प्रकल्प' ही योजना तेजस्विनी लोक संचालित साधन केंद्राद्वारे, आर्णी येथील दुर्गामाता महिला बचतगटाला ऑगस्ट २०२० मध्ये मिळाली. या बचतगटात १० महिला लाभार्थी आहेत. योजनेकरिता तेजस्विनी लोक संचालित साधन केंद्राने व दुर्गामाता महिला बचतगटाने प्रत्येकी पाच टक्के निधी भरला. उर्वरित ९० टक्के अनुदान शासनाकडून प्राप्त झाले आहे. या योजनेतून वार्षिक उत्पन्न घेतले जाणार आहे. दुर्गामाता महिला बचतगटातील प्रत्येक लाभार्थी महिलेला वार्षिक अंदाजे ४५ ते ५० हजार रुपयाचे उत्पन्न अपेक्षित आहे. मोती संवर्धन प्रकल्पामुळे ग्रामीण महिलांना नवीन शेतीपूरक व्यवसायाची संधी मिळून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतील आणि पर्यायाने लोक संचालित साधन केंद्राच्या उत्पन्नात आर्थिक भर पडेल. जिवंत शिंपले व मृत शिंपले यातील फरक ओळखणे, मोत्याची शिंपल्यात लागवड, शस्त्रक्रिया करणे यांसारख्या प्रत्येक गोष्टीची बारकाईने या महिला माहिती घेत असतात. त्यामुळे आत्मविश्वासाने या प्रकल्पातून महिला उत्पन्न घेत आहेत.

मोत्यांचे दागिने घातले जातात किंवा सोन्यांच्या दागिन्यात मढवलेले मोती असतात त्या मोत्यांचे नैसर्गिक, संवर्धित आणि कृत्रिम असे तीन प्रकार आहेत. दुर्गामाता महिला बचतगट आर्णीत शेततळ्यात संवर्धित शिंपल्याचे पीक घेत आहेत. यातला संवर्धित मोती हा संवर्धित करावयाच्या शिंपल्यात एक छोटीशी शस्त्रक्रिया करून 'न्युक्लिअस'चे (ठरावीक शिंपल्याचा एक तुकडा किंवा भुकटी) रोपण करून गोड्या पाण्यात तो शिंपला ठेवला जातो. या शिंपल्यात तयार झालेला मोती संवर्धित मोती होय. हा मोती नैसर्गिक मोत्यासारखा आणि तितकाच गुणवत्तापूर्ण असतो. अशा पद्धतीने तयार झालेल्या गुणवत्तेच्या खऱ्या मोत्यांना प्रचंड मागणी असून त्याची किंमतही मोठीच मिळते. आतापर्यंत मोती संवर्धनाचा व्यवसाय खासगी व्यक्ती, संस्थापुरताच मर्यादित होता. मात्र आत्महत्याग्रस्त शेतकरी जिल्हा अशी वेदनादायी ओळख असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील बचतगटाच्या महिलांनी या प्रकल्पासाठी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांना जगावेगळ्या आणि हमखास उत्पन्नाच्या शेतीची प्रेरणादायी वाट दाखवली आहे.

**महिला आर्थिक विकास महामंडळ**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयांचा थोडक्यात आढावा.

# मंत्रिमंडळात ठरले !

## मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रम

राज्यात मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रम राबवण्यास मान्यता देण्यात आली. याद्वारे जलस्रोतांची दुरुस्ती करून सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात येईल. यासाठी १३४०.७५ कोटी रुपये निधी लागेल. हा कार्यक्रम एप्रिल २०20 ते मार्च २०२३ या कालावधीत राबवण्यात येईल.



सिंचनातून समृद्धी वाढवण्यासाठी सिंचन प्रकल्प कार्यक्षम पद्धतीने कार्यरत राहणे आवश्यक आहे. जलसंधारण यंत्रणेमार्फत विकेंद्रित व राज्याच्या सर्वदूर भागात पाणी साठे निर्माण केलेले आहेत. या योजनांचा फार मोठा लाभ शेतीला संरक्षित सिंचन उपलब्ध करून देण्यात झाला तसाच पाणीपुरवठा योजनांसाठीही झालेला आहे. मागील ३० ते ४० वर्षात दुष्काळ निवारणार्थ रोजगार हमी योजना व इतर योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जलस्रोतांची निर्मिती करण्यात आली. परंतू या जलस्रोतांची नियमित देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे त्याचा पुर्ण कार्यक्षमतेने वापर करण्यात येत नाही. अशा पूर्ण झालेल्या योजनांपैकी ७९१६ योजनांची विशेष दुरुस्ती करून जलसाठा व सिंचन क्षमता पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे. या योजनांचे पुनरुज्जीवन केल्यास पूर्ण क्षमतेने पाणीसाठा उपलब्ध होईल.

## जलस्रोतांची विशेष दुरुस्ती

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या मर्यादितील पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, सिंचन तलाव. लघु पाटबंधारे तलाव, साठवण बंधारे, कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे, माजी मालगुजारी तलाव, सिमेंट नाला बांध, माती नालाबांध, वळवणीचे बंधारे इ. जलस्रोतांची विशेष दुरुस्ती करून सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याकरिता हा कार्यक्रम मृद् व जलसंधारण विभागामार्फत हाती घेतला जाईल. कालव्याच्या भरावाची व कालव्यावरील बांधकामाची तुटफूट झालेली असल्याने सिंचनासाठी कालव्यातून जाणारे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाते. त्यामुळे या कालव्यांच्या दुरुस्तीची कामे घेण्यात येतील.

मृद् व जलसंधारण विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण पथकामार्फत प्रगतिपथावरील, पूर्ण झालेल्या दुरुस्ती कामांची वेळोवेळी तपासणी करण्यात येईल. राज्यस्तरावर व आयुक्त स्तरावर प्रकल्प कार्यान्वयन कक्षाची स्थापना करून प्रकल्पाचे संनियंत्रण केले जाईल. मुख्य अभियंता तथा सह सचिव हे प्रकल्प कार्यान्वयन कक्षाचे प्रमुख राहतील.

## पूर्वीचा निर्णय मागे

नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम बरखास्त करण्याबाबत पूर्वी घेतलेला निर्णय मागे घेण्यास मान्यता देण्यात आली. नागपूर सुधार प्रन्यास ही स्वायत्त संस्था बरखास्त करण्यासंदर्भात यापूर्वी २७ डिसेंबर २०१६ आणि १३ ऑगस्ट २०१९ रोजी मंत्रिमंडळाने निर्णय घेतले होते. सध्याच्या परिस्थितीत याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता नसल्याने हे निर्णय मागे घेण्यास मान्यता देण्यात आली.

## तुकाई उपसा सिंचन योजना

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तुकाई उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापराबाबत मान्यता देण्यात आली. आता या योजनेत २४ पाझर तलाव व ३ लघुपाटबंधारे तलावांमध्ये पाणी सोडून त्यानंतर या पाण्याचा सिंचन आणि पाण्यासाठी उपयोग करण्यात येईल. तसेच यासाठी



येणाऱ्या वाढीव ५ कोटी ७९ लाख ८७ हजार ६०६ इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## कोविडविषयक सादरीकरण

कोविडचे लसीकरण वेगाने सुरू आहे. परंतु ब्रिटन, ब्राझीलमध्ये ज्या पद्धतीने कोरोनाचा संसर्ग फैलावत आहे आणि मृत्यू होत आहेत ते पाहता आपण बेसावध न राहता अधिक सावधगिरी बाळगण्याची गरज आहे असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या



## रुग्णालयास मान्यता

नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्न ४३० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक संलग्नित या महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठीच्या पायाभूत सुविधांच्या आधारावर पदव्युत्तर पदवी संस्था स्थापन करण्यास तसेच त्यामध्ये १५ विषयांमध्ये एकूण ६४ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नवीन जागा निर्माण करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

हे वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अधिनस्त पूर्णत: स्वायत्त संस्था असणार आहे. या महाविद्यालय व रुग्णालयासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांप्रमाणे आवश्यक जागा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परिसरामध्ये उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी सुमारे ६२७ कोटी ६२ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियमाच्या तरतूदीनुसार अभ्यासक्रमांचे व इतर शुल्क निश्चित करून आकारणी करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

बैठकीत कोरोना सादरीकरणाच्यावेळी सांगितले.

## कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण

पर्यटन धोरण-२०१६ मधील तरतूदीनुसार तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षित पयर्टनाच्या दृष्टीने पर्यटक खासगी वाहनाने प्रवासास प्राधान्य देत आहेत हे पाहता, कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्क या सुविधा पर्यटकांना उपलब्ध करून देण्यासाठी कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण राबवण्यास मान्यता देण्यात आली. कॅरॅव्हॅन पार्क आणि कॅरॅव्हॅन असे दोन भाग या धोरणात असून, यामुळे राज्यातील वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्याचा लाभ सहजपणे पर्यटकांना घेता येईल. तसेच रोजगार देखील वाढेल.

पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत उपलब्ध प्रोत्साहने जसे की, मुद्रांक शुल्कामध्ये सूट, राज्य वस्तु व सेवा कराचा परतावा, विद्युत शुल्कामध्ये सूट इ. कॅरॅव्हॅन पार्क / कॅरॅव्हॅन पर्यटनाकरिता लागू राहतील. पर्यटन संचालनालयाकडे कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्कची नोंदणी आवश्यक राहील. कॅरॅव्हॅन व कॅरॅव्हॅन पार्क व्यावसायिकांना पर्यटन संचालनालयामार्फत मार्केटिंग, स्वच्छता, व्यवस्थापन यांचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच त्यांची प्रसिद्धी देखील करण्यात येईल.

या पर्यटन संकल्पनेमुळे पर्यटकांना राहण्याची सुविधा तसेच खासगी गुंतवणुकीसही प्रोत्साहन मिळेल. कौटुंबीक सहलींचे आयोजन, हॉटेल्स आणि रिसॉर्ट या पारंपरिक निवास व्यवस्थेपेक्षा वेगळा अनुभव, ना विकास क्षेत्राचा योग्य वापर, दुर्गम भागातील पर्यटनाला चालना देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे यामुळे शक्य होणार आहे.



चित्र : प्रतिकात्मक

**कॅरॅव्हॅन पार्क** : यामध्ये मूलभूत सोयी सुविधांनी युक्त अशा जागेवर कॅरॅव्हॅन पार्क उभी करून मुक्काम करता येईल. यामध्ये लहान मोठ्या आकाराच्या कॅरॅव्हॅन उभ्या करता येतील. असे पार्क खासगी किंवा शासकीय जमिनीवर स्वत: जमीन मालक किंवा विकासक उभारू शकतील. वाहनतळाच्या ठिकाणी आवश्यक त्या

## उन्नत मेट्रो प्रकल्पास मान्यता



पिंपरी चिंचवड ते निगडी कॉरिडॉर क्र.१ ए या उन्नत मेट्रो मार्गिकेस मान्यता देण्यात आली. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकेमध्ये सुधारणा करून ही अतिरिक्त मार्गिका उभारण्यात येईल. यासाठी ९४६ कोटी ७३ लाख एवढा खर्च येणार असून, राज्य शासनावर १७० कोटी ३ लाख इतका खर्चाचा भार असेल.

या मार्गिकेची लांबी ४.४१ कि.मी. इतकी असून यात तीन स्थानके आहेत. या प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन या विशेष वहन हेतू (एसपीव्ही) मार्फत करण्यात येईल. यासाठी केंद्र शासनाचे एकूण खर्चाच्या १० टक्के सहभाग असून कर्जाच्या स्वरूपात देखील निधी उभारण्यात येणार आहे. राज्य शासनाचा एकूण ७९ कोटी ४ लाख तसेच ९० कोटी ६३ लाख रुपये परतफेड करावयाचे दुय्यम कर्ज असे एकूण १७० कोटी ३ लाख असा सहभाग असेल. निगडी ते स्वारगेट मार्गिकेसाठी २०२३ मध्ये ४.९५ लाख प्रवाशांची दैनंदिन वाहतूक होईल असा अंदाज आहे.

सुविधा तसेच स्वतंत्र पाणी, रस्ते व वीज जोडणी असेल. या ठिकाणी पर्यटक सुविधा केंद्र, उद्यानदेखील असेल. कॅरॅव्हॅन पार्क मालकांनी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विविध उपाययोजना करायच्या आहेत. याठिकाणी पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहे देखील असतील व विकलांगाकरिता देखील व्हीलचेअर वगैरे सुविधा असतील. यासाठीच्या आवश्यक त्या परवानग्या स्थानिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जातील.

एमटीडीसीच्या पर्यटक निवासांच्या परिसरात किंवा त्यांच्या मोकळ्या जमिनीवर तसेच कृषी पर्यटन केंद्रांच्या ठिकाणी देखील कॅरॅव्हॅन पार्क करता येतील.

**कॅरॅव्हॅन :** या व्हॅन्समध्ये बेडची सुविधा असलेले किचन, टॉयलेट, सोफा, टेबल असून विश्रांती आणि निवासाच्या दृष्टीने त्याची बांधणी केली असेल. सिंगल एक्सेल कन्व्हेंशल कॅरॅव्हॅन, ट्विन एक्सल कॅरॅव्हॅन, टेन्ट ट्रेलर, फोल्डिंग कॅरॅव्हॅन, कॅम्पर ट्रेलर अशा प्रकारचे कॅरॅव्हॅनचे विविध प्रकार असतील.

परिवहन आयुक्तांकडे या कॅरॅव्हॅनची नोंदणी करावी लागेल. कॅरॅव्हॅन पार्क व कॅराव्हॅन तसेच हायब्रीड कॅरॅव्हॅन पार्कची नोंदणी पर्यटन संचालनालयाकडे करावी लागेल. तसेच टूर ऑपरेटरची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर करता येईल. यासाठी नोंदणी शुल्क ५ हजार व नुतनीकरणासाठी २ हजार रुपये शुल्क असेल.

कॅरॅव्हॅन पर्यटन धोरणासंदर्भात राज्यस्तरीय समिती असून पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अध्यक्ष असतील.

## विधेयक मांडण्यास मान्यता

राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास व यासंदर्भातील विधेयक २०२१ विधिमंडळात मांडण्यास मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

सध्या भारतामध्ये आठ कौशल्य विद्यापीठांची स्थापना झाली आहे. त्यामधील सार्वजनिक कौशल्य विद्यापीठे राजस्थान, हरियाणा येथे प्रत्येकी एक याप्रमाणे स्थापन झाले आहे. आंध्र प्रदेशमध्ये दोन सार्वजनिक कौशल्य विद्यापीठे प्रस्तावित आहेत. राजस्थान, पश्चिम बंगाल, ओडिसा, महाराष्ट्र येथे प्रत्येकी एक खासगी विद्यापीठाची स्थापना झाली आहे. महाराष्ट्रात असलेले उद्योग समुहांचे मोठे जाळे व रोजगाराच्या प्रचंड संधी विचारात घेता राज्यात सार्वजनिक कौशल्य विद्यापीठाची स्थापना करणे आवश्यक होते.

उद्योगांच्या मागणीनुसार तांत्रिक क्षमता आणि विविध कौशल्यप्राप्त असे मनुष्यबळ निर्माण व्हावे असा कौशल्य विद्यापीठ स्थापनेचा उद्देश आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये प्रामुख्याने महानगरांमध्ये बँकिंग, वित्तीय सेवा, विमा, औषधे, आतिथ्य, तेल, वायू, खनिज, एफएमसीजी, ऊर्जा यांसारख्या अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच खासगी कंपन्यांची मुख्य कार्यालये कार्यरत आहेत.

मुंबई ही चित्रपट आणि दूरदर्शन उद्योगाचे माहेरघर म्हणूनही ओळखली जाते. त्यामुळे अशा सर्व क्षेत्रांशी संबंधित बँकिंग, वित्त, रचना, नावीन्य, संशोधन कौशल्य विकास क्षेत्रात पुढाकार घेऊन तसे मनुष्यबळ निर्माण केल्यास त्याचा राज्याला फायदा होईल.

विभागामार्फत राज्यात सहा विभागीय ठिकाणी सेंटर ऑफ एक्सलेन्स उभारण्याचे ही प्रस्तावित आहे. ही सहा केंद्रे राज्य कौशल्य विद्यापीठाची विभागीय केंद्रे म्हणून काम पाहतील. याकरिता अस्तित्वात असलेल्या विभागीयस्तरावरील आय.टी.आयचे रुपांतर देखील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये करून ही विभागीय केंद्रे काम करू शकतील. विद्यापीठाने मान्य

केलेले अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी राज्यात असणाऱ्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सर्व कौशल्य प्रशिक्षण संस्था या राज्य सार्वजनिक कौशल्य विद्यापीठाशी संलग्न होऊ शकतील. विद्यापीठ प्रशासन आणि इमारतीच्या खर्चापोटी दरवर्षी सुमारे ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली.

## शासकीय परिचर्या महाविद्यालय

नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे शासकीय परिचर्या (बी.



एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. या महाविद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ५० असणार असून यासाठी आवश्यक पदनिर्मितीस आणि खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

## अनुदानात वाढ

बाल संगोपन योजनेंतर्गत बालकांचे संगोपन करणाऱ्या पालकांना प्रतिबालक दरमहा देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानात ४२५ वरून ११०० रुपये इतकी तर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना सहायक अनुदानात प्रतिबालक ७५ वरून १२५ इतकी वाढ करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे प्रतिबालकास देण्यात येणारे अनुदान १ हजार २२५ रुपये इतके होईल.

## सातवा वेतन आयोग

महाराष्ट्र पशू विज्ञान व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आणि घटक महाविद्यालयातील शिक्षण व शिक्षक समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे विद्यापीठ आणि घटक महाविद्यालयातील शिक्षकांसोबत विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय पशुचिकित्सा परिषद, भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि राज्य शासन यांनी शिक्षक समकक्ष म्हणून घोषित केलेल्या पदांना लाभ होणार आहे. वेतनाचे स्तर, सुरुवातीचे वेतन आणि कुलगुरू यांचे वेतन निश्चित करण्यात येईल.

## सुधारित मान्यता

मुंबईतील महापौर निवासस्थान परिसरातील जागेवर स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारक प्रकल्पाच्या ४०० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाच्या कामाच्या प्राधान्यानुसार टप्पा- १ व २ स्वरूपात काम हाती घेण्याबाबत निश्चिती करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या टप्पा १ मध्ये सर्व इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून, यामध्ये स्थापत्य, विद्युत, वातानुकूलित यंत्रणा उभारणी, इमारतीची अंतर्गत व बाह्य सजावट, वाहनतळ उभारणी, बागबगिचा तयार करणे. रेनवॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामांचा समावेश आहे. टप्पा-१ करिता अंदाजित किंमत २५० कोटी रुपये (करांसहित) इतकी आहे. या प्रकल्पाच्या टप्पा-२ मध्ये तंत्रज्ञान, लेझर शो. डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा/गोष्टी सांगणे. चित्रपट, व्हर्च्युअल रिॲलिटी, ऑडिओ व्हिज्युअल आणि तांत्रिक घटक इत्यादी कामे इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास येत असताना हाती घ्यावयाचे प्रस्तावित आहे. टप्पा २ करिता १५० कोटी रुपये (करांसहित) खर्च अपेक्षित आहे.

मुंबईतील महापौर निवासस्थान परिसरातील जागेवर स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रीय स्मारक प्रकल्पासाठी लागणाऱ्या ४०० कोटी रकमेचा खर्च सुरुवातीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करणार आहे.

## अधिनियमात सुधारणा

कोविडच्या पार्श्वभूमीवर निवडणुका न झालेल्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये नियुक्त प्रशासकांना आणखी मुदतवाढ देण्यात येईल. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा



करण्यात येईल. राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने मुदत संपलेल्या व निवडणूक न झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३० एप्रिल २०२१ पर्यंत प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतू कोरोनाचा प्रादुर्भाव अजूनही कायम आहे. त्यामुळे प्रशासक नियुक्त काळात निवडणुका घेणे शक्य होणार नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने कळवले आहे. तसेच प्रशासकांना मुदतवाढ देण्याची विनंती आयोगाने केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारित तरतूद समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच अधिनियमातील प्रस्तावित सुधारणेसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२१ मध्ये विधेयक सादर करण्यासदेखील मान्यता देण्यात आली आहे.

**टीम लोकराज्य**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महा कृषी ऊर्जा अभियान

# कृषी समृद्धीसाठी मिळेल वीज जोडणी माझ्या शेत-शिवारात खेळेल दिवसाही पाणी



**कृषीपंपाला दिवसाही वीज मिळावी आणि सिंचनाची गरज भागावी या हेतूने महा कृषी ऊर्जा अभियानाची सुरुवात.**

**शक्य तेथे पारंपरिक वीजजोडणी. ६०० मीटरपेक्षा जास्त अंतर असेल तर सौरऊर्जा कृषिपंपाचा लाभ.**

वीज वाहिनीपासून ३० मीटरच्या आतील सर्व कृषिपंपाना त्वरित वीजजोडणी.

३० मीटर ते २०० मीटर अंतर असेल तर एरियल बंच केबलद्वारे वीजजोडणी.

६०० मीटरपर्यंत अतिउच्चदाब प्रणालीवरुन त्वरित वीजजोडणी.

पहिल्या वर्षात थकबाकी भरा व **६६ टक्केपर्यंत** सुधारित थकबाकीवर सूट मिळवत थकबाकीमुक्त व्हा !

**सप्टेंबर २०१५ पूर्वीच्या**
थकबाकीवरील व्याज व विलंब आकार १०० टक्के माफ.

**सप्टेंबर २०२० पूर्वीच्या**
थकबाकीवरील विलंब आकार १०० टक्के माफ.

शेतकऱ्यांना पडीक व नापीक जमिनीतून उत्पन्न मिळवण्याची सुवर्णसंधी.

सौरऊर्जा प्रकल्पास जमीन भाड्याने देऊन प्रतिवर्ष प्रतिएकर रु.३०,०००/- दराने मोबदला.

या दरात वार्षिक ३ टक्के वाढ.

**शेतकऱ्याने स्व:खर्चाने वीजजोडणी केल्यास १०० टक्के खर्चाचा परतावा.**

## आमचा ध्यास, शेतकऱ्यांचा महाविकास !



| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. उद्धव ठाकरे<br>मा.मुख्यमंत्री | श्री. अजित पवार<br>मा. उपमुख्यमंत्री | श्री. बाळासाहेब थोरात<br>मा. महसूल मंत्री | डॉ. नितीन राऊत<br>मा. ऊर्जामंत्री | श्री. प्राजक्त तनपुरे<br>मा. ऊर्जा राज्यमंत्री |

अधिक माहितीसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्यावी तसेच टोल फ्री क्र.१८००१०२३४३५/१८००२३३३४३५/१९१२ यावर संपर्क साधावा.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. मुद्रण प्रिंट एन पॅक प्रा.लि., ए-१८०/४, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०३ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे